उपराष्ट्रपतिपद निवडणुकीत तटस्थ राहणार बीजू जनता दल
वाचा पान ३ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष : ३१ | अंक : ३५ | मूल्य ४ रुपये | पृष्ठे ८+ ४ = १२ | जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प




आपले संघकार्य निरंतर वृद्धिंगत होत आहे. येथे सन्मान, अधिकार यासाठी वाद नाही. कारण येथे कार्यकर्ता ध्येयाप्रति समर्पित आहे आणि या कार्याकरिता तो आपली संपूर्ण शक्ती पणाला लावतो. यश असो किंवा अपयश याची सतत चिंतन प्रक्रिया सुरू असते. यापासून मला काय प्राप्त होत आहे? मला कोणती प्रतिष्ठा मिळत आहे? अशा प्रकारची भावना निर्माणच होत नाही.

**- डॉ. आबाजी थत्ते**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

## महत्त्वाचे

### सकारात्मक जागतिक संकेतांमुळे बाजारांत तेजी

**मुंबई** : सोमवारच्या अस्थिर सत्रात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी तेजीत बंद झाले. वाहन आणि



ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रात झालेली मजबूत खरेदी आणि सकारात्मक जागतिक संकेत यामुळे अस्थिरता असली, तरीही बाजार तेजीत बंद झाला. सत्राच्या शेवटच्या सत्रात गुंतवणूकदारांनी नफेखोरी केली असली, तरी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ७६ अंकांनी वाढून ८०,७८७ या पातळीवर स्थिरावला. निफ्टी ३२ अंकांनी वधारून २४,७७३ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात टाटा मोटर्सची सर्वाधिक खरेदी झाली. त्या पाठोपाठ महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा, मारुती, अदानी पोर्ट्‌स, बजाज फायानान्स आणि अल्ट्राटेक सिमेंट या कंपन्यांना सर्वाधिक फायदा झाला.

### ४० कोटी घेऊन लॉटरी विक्रेता फरार

**हैद्राबाद** : लॉटरी तिकिटाच्या नावाने जमा केलेले ४० कोटी रुपये घेऊन एक लॉटरी विक्रेता फरार झाल्याची घटना आंध्र प्रदेशातील आंबेडकर कोनासीमा जिल्ह्यात घडली आहे. पोलावरम मंडल येथील मुरमल्ला गावातील चिंतलापुडी वीरा शंकर राव यांनी ३० वर्षांपूर्वी लॉटरी तिकीटांचा हा धंदा सुरु केला होता. व्यवसायाच्या नावावर त्याने व्यापारी आणि प्रसिद्ध व्यक्तींचा विश्वास संपादन केला. त्यानंतर चिंतलापुडी वीरा शंकर राव याने पाच लाख ते एक कोटी रुपयांचे लॉटरी तिकीट विकू लागला. अनेक वर्षे धंदा करीत असल्याने अनेक लोकांनी वीरा शंकर राववर विश्वास ठेवून त्याच्याकडील लॉटरीची तिकिटे खरेदी केली. परंतू त्याने लोकांचे पैसे दिले नाहीत.

श्री क्षुधाशांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)
मंगळवार, दि. ९ सप्टेंबर २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा, उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रू.
वरण, बट्टी ३० रू.
सँडविच भाकरी २० रू. नग,
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रू
पार्सल मिळेल
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# नेपाळमध्ये ‘जनरेशन झेड’च्या संतापाचा उद्रेक; २० ठार

**२५० पेक्षा जास्त जखमी** | **भ्रष्टाचार, समाज माध्यम बंद केल्याने संताप** | **संसदेवर धडक, लष्कर तैनात** | **गृहमंत्री रमेश लेखक यांचा राजीनामा**



◆ **काठमांडू, ८ सप्टेंबर**

भ्रष्टाचार, सरकारने घातलेली समाज माध्यमांवरील बंदी, बेरोजगारीच्या विरोधात नेपाळमधील तरुणांच्या संतापाचा उद्रेक सोमवारी झाला. त्याने थेट नेपाळच्या संसदेवर चाल केली. यावेळी झालेल्या प्रचंड हिंसाचारात २० जणांचा मृत्यू झाला, तर २५० पेक्षा जास्त जखमी झाल्याचे वृत्त आहे. तरुणांनी ही उग्र निदर्शने ‘जनरेशन-झेड’ या बॅनरखाली केली. तरुणांनी घेतलेल्या रुद्रावतारामुळे सरकारला परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लष्कर तैनात करावे लागले. नेपाळचे गृहमंत्री रमेश लेखक यांनी मृत्यूंची नैतिक जबाबदारी स्वीकारत पदाचा राजीनामा दिला.

काठमांडूच्या मध्यभागी असलेल्या संसदेसमोर जनरेशन-झेडच्या बॅनरखाली शालेय विद्यार्थ्यांसह हजारो तरुण एकत्र आले आणि त्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करीत समाज माध्यमांवरील बंदी रद्द करण्याची मागणी केली होती. मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या नेपाळच्या माध्यमांनी २० सांगितली असली, तरी याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

काही निदर्शक संसदेच्या परिसरात घुसल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेली. पोलिसांनी त्यांना पांगवण्यासाठी लाठीमार केला तसेच अश्रुधुराचे गोळे डागले आणि रबरी गोळ्याही झाडल्या, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. काठमांडूतील हिंसाचारात किमान २० जण ठार झाले, असे वृत्त हिमालयन टाईम्स वृत्तपत्राने रुग्णालयाचा हवाला देत दिले.



### नोंदणी न केल्याबद्दल घातली बंदी

दिलेल्या मुदतीत दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणी न केल्याबद्दल सरकारने गुरुवारी फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, एक्स, इन्स्टाग्राम आणि युट्यूबसह २६ समाज माध्यमांवर बंदी घातली. समाज माध्यमांना नियमांखाली आणण्यासाठी बंदी घालण्यात आली होती, अशी भूमिका सरकारने स्पष्ट केली होती. परंतु, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला आणि यामुळे सेन्सॉरशिप लागू शकते, अशी जनतेमध्ये धारणा होती.



**सरकार नेहमीच विसंगती आणि अहंकाराला विरोध करेल आणि देशाला कमजोर करणारे कोणतेही कृत्य कदापि स्वीकारणार नाही. आमचा पक्ष समाज माध्यमांच्या विरोधात नाही. पण, नेपाळमध्ये व्यवसाय करतील, पैसे कमावतील आणि तरीही कायद्यांचे पालन करणार नाही, हे स्वीकारले जाऊ शकत नाही.**

**- के. पी. ओली शर्मा**
नेपाळचे पंतप्रधान

ऑपरेशन झेड निदर्शनांमधील मृतांची संख्या २० वर पोहोचली, असे वृत्त आरोग्य आणि लोकसंख्या मंत्रालयाच्या सूत्रांचा हवाला देताना खबरहब या वृत्तपत्राने दिले.

दोन सुरक्षा कर्मचाऱ्यांसह ४२ जण जखमी झाले, असे नेपाळ पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले. मात्र, जखमींची संख्या अनिश्चित आहे. सिव्हिल हॉस्पिटल आणि ट्रॉमा सेंटरसह रुग्णालये रुग्णांना दाखल करून घेण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

**महत्त्वाच्या ठिकाणांवर प्रतिबंधात्मक आदेश**

प्रतिबंधित क्षेत्रात लोकांची हालचाल, निदर्शने, बैठका, मेळावा किंवा धरण्यांना परवानगी दिली जाणार नाही, असे मुख्य जिल्हा अधिकारी छबी लाल रिजाल यांनी एका सूचनेद्वारे सांगितले. स्थानिक प्रशासनाने राष्ट्रपती भवन, उपराष्ट्रपतींचे निवासस्थान आणि पंतप्रधान कार्यालयाच्या आसपासच्या विविध भागांत प्रतिबंधात्मक आदेश लागू केला.

# उपराष्ट्रपतिपदासाठी आज निवडणूक

## सी. पी. राधाकृष्णन् आणि बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

देशाचा नवा उपराष्ट्रपती निवडण्यासाठी मंगळवारी निवडणूक होत आहे. रालोआचे सी. पी. राधाकृष्णन् आणि इंडिया आघाडीचे बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात उपराष्ट्रपतिपदाची लढत होत आहे.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी नवीन संसद भवनात सकाळी १० वाजतापासून मतदानाला प्रारंभ होणार असून, सायंकाळी पाच वाजेपर्यंत मतदान चालणार आहे. सायंकाळी ६ वाजता मतमोजणी होईल आणि त्यानंतर निकाल जाहीर केला जाणार आहे. रालोआचे उमेदवार असलेले राधाकृष्णन् महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. इंडिया आघाडीचे उमेदवार असलेले बी. सुदर्शन रेड्डी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आहेत. या निवडणुकीत रालोआचे उमेदवार राधाकृष्णन् यांचा विजय निश्चित मानला जात आहे. किती मताधिक्याने ते विजयी होतील, एवढाच फक्त मुद्दा आहे.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत लोकसभा तसेच राज्यसभेच्या खासदारांना मताधिकार असतो. ही निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होत आहे. यासाठी कोणत्याच राजकीय पक्षाला व्हीप जारी करता येत नाही. मात्र, पक्षीय धोरणानुसार मतदार मतदान करीत असतात.

या निवडणुकीत मतदान कसे करायचे यासाठी रालोआ आणि इंडिया आघाडीने आपापल्या खासदारांसाठी एक कार्यशाळा घेतली होती.

लोकसभेच्या ५४३ खासदारांना मतदानाचा अधिकार आहे, मात्र लोकसभेची एक जागा रिक्त असल्यामुळे प्रत्यक्ष ५४२ खासदार मतदानाचा अधिकार बजावतील. राज्यसभेत २३३ निर्वाचित आणि १२ नामनियुक्त अशा २४५ खासदारांना मतदानाचा अधिकार आहे. मात्र, राज्यसभेत सात जागा रिक्त असल्यामुळे प्रत्यक्षात २३८ खासदारच मतदान करू शकतील. दोन्ही सभागृह मिळून ७८० खासदारांना मतदानाचा अधिकार असल्यामुळे विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे. रालोआजवळ दोन्ही सभागृह मिळून ४२५ खासदार आहेत, त्यामुळे रालोआचे सी. पी. राधाकृष्णन् यांचा या निवडणुकीतील विजय निश्चित मानला जात आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीचे संख्याबळ ३२४ आहे. जगदीप धनकड यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिल्यामुळे उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणूक होत आहे.



### राधाकृष्णन् यांना वायएसआरचा पाठिंबा

वायएसआर काँग्रेसचे जगनमोहन रेड्डी यांनी रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांना पाठिंबा दिला आहे. वायएसआर काँग्रेसचे राज्यसभेत सात तर लोकसभेत ४ असे ११ खासदार आहेत. वायएसआर काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे रालोआचे संख्याबळ ४३६ झाले आहे. आपच्या राज्यसभा सदस्य स्वाती मालिवाल रालोआच्या बाजूने मतदान करू शकतात. भारत राष्ट्र समितीने कोणालाही पाठिंबा जाहीर केला नाही. त्यामुळे भारत राष्ट्र समिती ऐनवेळी काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.



# वाघाच्या हल्ल्यात पतीसमोरच पत्नी ठार

## सोमनाथ पर्यटनस्थळाजवळील धक्कादायक घटना

◆ **मूल, ८ सप्टेंबर**

अंगणात भांडी घासत असलेल्या महिलेवर वाघाने अचानक हल्ला करून ठार केले. हा बिकट प्रसंग बघताच वाघाच्या जबड्यातून पत्नीची सुटका करण्याचा प्रयत्न पतीने केला. मात्र, त्यांना यश आले नाही. ही घटना सोमनाथ पर्यटन स्थळाजवळील बाबा आमटे प्रकल्पाच्या वसाहतीत सोमवारी पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास घडली. अन्नपूर्णा बिलोणे असे मृतक महिलेचे नाव आहे.

अन्नपूर्णा आणि त्यांचे पती तुळशीराम बिलोणे हे बाबा आमटे प्रकल्पाच्या वसाहतीत वास्तव्याला आहेत. सोमवारी पहाटे अन्नपूर्णा आपल्या घराच्या अंगणात भांडी घासत होत्या. त्याचवेळी वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. अन्नपूर्णाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून पती तुळशीराम तातडीने बाहेर आला. तेव्हा वाघाने अन्नपूर्णाचा गळा जबड्यात पकडला होता. तरी घाबरून न जाता तुळशीरामने पत्नीला वाचवण्यासाठी वाघाशी दोन हात केले. त्याने अन्नपूर्णाचे पाय धरून खेचण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याने जवळच पडलेली एक काठी घेऊन वाघावर जोरदार हल्ला केला. या हल्ल्यानंतर वाघ तिथून पळून गेला. पण अन्नपूर्णाचा मृत्यू झाला होता.

घटनेची माहिती कळताच मेजर राष्ट्रपाल कातकर, धनराज नेवारे, वेदनाथ करंबे यांनी घटनास्थळाची पाहणी करून मृतदेह विच्छेदनासाठी मूल उप-जिल्हा रुग्णालयात पाठवला. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन मृत महिलेच्या पतीला तत्काळ २० हजार रुपयांची मदत दिली. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार विजय राठोड करीत आहे.

# पंतप्रधान आज पंजाबच्या दौऱ्यावर

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पंजाबच्या दौऱ्यावर जात आहेत. पंजाबमध्ये अतिवृष्टीने आलेल्या पुराने संपूर्ण राज्यात भयंकर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक संकटाने अनेकांचे बळी घेतले आहे आणि अनेकांना आपली घरेदारे सोडावी लागली आहेत. शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमिनीवर पिक नष्ट झाली आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी ९ सप्टेंबर रोजी पंजाबच्या पुरग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत. पंजाबसोबत मोदी उद्या ९ सप्टेंबर रोजी हिमाचल प्रदेशलाही भेट देणार आहेत. ते आधी हिमाचल प्रदेशात हवाई पाहणी करतील. नंतर दुपारी १.३० वाजता हिमाचल प्रदेशातील कांग्रा येथे अधिकाऱ्यांची उच्च स्तरिय बैठक घेतील. त्यानंतर पीडीत लोकांशी संवाद साधतील.

# मतदारयादीसाठी आधार वैध ओळखपत्र

● **नागरिकता सिद्ध करण्यासाठी नाही** ● **सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा**

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

मतदारयादीसाठी आधार हे वैध ओळखपत्र आहे, असे बिहार मतदार पुनरीक्षण प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले. मात्र, त्याला नागरिकत्वाचा पुरावा मानता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले.

आधार कार्डला १२ वा दस्तावेज मानला जावा. त्याच्या मदतीने मतदार मतदार यादीत नावाचा समावेश करू शकतील, असे न्यायालयाने बिहारमधील मतदार पुनरीक्षण प्रकरणावर सुनावणी करताना सांगितले.



निवडणूक आयोगाने पूर्वीच ११ दस्तावेजांची यादी सादर केली आहे. त्या आधारे मतदारयादीमध्ये आपल्या नावाचा समावेश करू शकेल. यापूर्वी दस्तावेजांच्या यादीत आधार कार्डचा समावेश नव्हता. आधार कार्ड स्वीकारण्याचा निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात यावा, असा आदेश न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला. मात्र, आधार कार्ड नागरिकतेचा पुरावा समजले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. निवडणूक आयोगाला आधार कार्डची वैधता जाणून घेण्याचा अधिकार असेल, असे न्यायालयाने आयोगाला दिलासा देताना सांगितले. केवळ खऱ्या मतदारांनाच मतदान करण्याची परवानगी असेल. बनावट दस्तावेजांच्या आधारे अस्सल असल्याचा दावा करणाऱ्या मतदारांना यादीच्या बाहेर ठेवले जाईल.

# १७ सप्टेंबरपूर्वी प्रमाणपत्र द्या : जरांगे

◆ **छत्रपती संभाजीनगर, ८ सप्टेंबर**

महाराष्ट्र सरकारने १७ सप्टेंबरपूर्वी मराठ्यांना जात प्रमाणपत्रे देण्यासाठी मागील आठवड्यात जारी केलेल्या जीआरची अंमलबजावणी करावी, अन्यथा पुन्हा कठोर निर्णय घ्यावा लागेल, अशी मागणी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सोमवारी केली.

आपल्या ९६ टक्के मागण्या पूर्ण झाल्या आहेत आणि मराठा समाजाला पूर्ण न्याय मिळावा यासाठी संघर्ष सुरूच राहील, असा दावा मनोज जरांगे यांनी केला. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांना निश्चितपणे आरक्षण मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

२ सप्टेंबर रोजी सरकारने मराठा समाजातील सदस्यांना त्यांच्या कुणबी वारशाचे ऐतिहासिक पुरावे असलेले कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली, या समितीने राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) वर्गात वर्गीकृत असलेल्या कुणबी वारशाचे ऐतिहासिक पुरावे असलेले कुणबी जात प्रमाणपत्र जारी करण्याची घोषणा केली.

कुणबी हा राज्यातील एक पारंपरिक शेतकरी समुदाय आहे आणि त्यांना नोकरी तसेच शिक्षणात सरकारी आरक्षणासाठी पात्र बनवण्यासाठी महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

# जिहादी मुस्लिम तरुणांकडून अमळनेरमध्ये दगडफेक

## हिंदू स्त्रियांना बघून असभ्य वर्तन; शहरात तणावपूर्ण शांतता

**दिनेश पालवे,**
**अमळनेर, ८ सप्टेंबर**

जिहादी मुस्लिम तरुणांकडून सोमवारी शहरात एकतर्फी दगडफेक करून हिंदू स्त्रियांबाबत त्यांनी असभ्य वर्तन केल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

येथे हिजरी महिन्यानुसार माव-लिद-उल नबी मुहम्मद यांचा जन्मदिवस उरुस काढून साजरा करण्यात येतो. त्यासाठी शहरातील मुस्लिम समाजबांधव एकत्र येऊन दिवसभर मोठी मिरवणूक काढतात. अशीच मिरवणूक सोमवारी काढण्यात आली. असेच गतवर्षीच्या मिरवणुकीत दगडी दरवाजावर पाकिस्तानचे झेंडे व मिरवणुकीत गावठी बनावटीच्या बंदुकीतून गोळीबार करण्यात आला होता. तशीच उरुस मिरवणूक याही वर्षी काढण्यात आली. उरुस मार्ग



शालमनगर, कसाली मोहल्ला, दगडी दरवाजामार्गे गांधलीपुरा पोलिस चौकीमार्गे काढण्यात आली. मिरवणूक मार्गात धर्मांध मुस्लिम जिहादी तरुणांनी ‘लव जिहाद’चा आरोपी व मध्य प्रदेशातील गुंड रऊफ लाला यांचे मोठे फोटो आदर्श म्हणून ठेवले. यावरच न थांबता उरुस मिरवणुकीत त्यांचे व टिपू सुलतानचे मोठे कटआउट लावून फिरवले. एवढ्यावरच न थांबता मिरवणूक मार्गातील गुरव यांच्या घराजवळ हिंदू स्त्रियांकडे बघून असभ्य वर्तन केले. एवढ्यावरच न थांबता जिथे-जिथे हिंदू वस्त्या होत्या, तेथे दगडफेकही केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थितीवर मिळवले.

दरम्यान, दगडफेकीच्या घटनेमुळे शहरात तणावपूर्ण शांतता असून, अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांकडून शहरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अमळनेर पोलिस ठाण्यात शहरातील दोनशे ते अडीचशे हिंदू तरुण व महिला एकत्रित आल्या आहेत. मात्र, रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

### अमळनेर पोलिसांना झाले तरी काय?

गतवर्षी अशाच उरुस मिरवणुकीवेळी दगडी दरवाजावर पाकिस्तानचे झेंडे फडकवीत गावठी बनावटीच्या बंदुकीने गोळीबार करण्यात आला होता. असे असताना या उरुसला परवानगी दिलीच कशी? मुस्लिम समाजातील तरुणांकडून दगडफेक सुरू असताना महिला पोलिस अधिकारी हिंदू तरुणांना लाठी मारण्यात व्यस्त होत्या. ज्यांनी या उरुस मिरवणुकीसाठी परवानगी घेतली असेल, त्यांच्यासह टिपू सुलतानचे फोटो मिरवणाऱ्यांवर, अश्लील इशारे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होतील का? फक्त शांततेची कबूतर उडवले जातील. सीसीटीव्ही कॅमेरे नावालाच आहेत का, असे प्रश्न सुज्ञ नागरिक विचारत आहेत.

# पाच महिन्यांत १३ रेल्वे कर्मचारी निलंबित

**मुंबई** : मागील पाच महिन्यांत मुंबई आणि ठाण्यातील एका वरिष्ठ निरीक्षकासह १३ कर्मचाऱ्यांना स्थानकांवर प्रवाशांकडून पैसे उकळल्याबद्दल निलंबित करण्यात आल्याचे सरकारी रेल्वे पोलिसांनी सोमवारी सांगितले. मुंबई आणि आसपासच्या रेल्वे स्थानकांवर हे एक संघटित खंडणी रॅकेट कार्यरत असल्याचे आढळून आले आहे. आरोपींनी विशेषतः मुंबई सेंट्रल, दादर, कुर्ला, वांद्रे टर्मिनस, बोरिवली, ठाणे, कल्याण आणि पनवेल यासारख्या स्थानकांवर लांब पल्ल्याच्या रेल्वे प्रवाशांना लक्ष्य केले. ते मौल्यवान वस्तू घेऊन जातात आणि तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ करतात, असे जीआरपीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. पीडितांना वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटण्यास सांगण्यात आले आणि प्लॅटफॉर्मवरील जीआरपी परिसरात नेण्यात आले. त्यानंतर प्रवाशांना रोख रक्कम किंवा दागिने खरोखर त्यांचे आहेत हे सिद्ध करण्यास सांगण्यात आले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धा

**पिंपळनेर (साक्री)** : सामोडे येथील अनुदानित आश्रमशाळेत क्रांतिकारक वीर भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त होणाऱ्या जनजाती गौरव वर्षाचे औचित्य साधून मराठी विभागातर्फे प्रा. राजेंद्र सोनवणे यांच्या सहकार्याने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना 'मला समजलेले आदिवासी क्रांतिकारक' हा स्पर्धेचा विषय होता. प्राचार्य मनेष माळी अध्यक्षस्थानी होते. प्राथमिक विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका छाया साखरे प्रमुख पाहुण्या होत्या. सर्वप्रथम वीर क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षक शरद सूर्यवंशी यांनी जनजातीय गौरव वर्षाचे महत्त्व सांगत क्रांतिकारक वीरांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. प्रा. प्रवीण पगारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विजय ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षक संदीप पवार यांनी आभार मानले. परीक्षक म्हणून प्रा. वसंत गावित, प्रा. पौर्णिमा भामरे, शिक्षिका चारुशीला पवार, शिक्षिका आशा लाडे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. राजेंद्र सोनवणे, प्रा. गणेश भावसार, प्रा. भिकन पारधी, शिक्षक संदीप पवार आदींनी सहकार्य केले.




### देवरे अभियांत्रिकीत स्टार्टअप संकल्पना सादरीकरण स्पर्धा

**धुळे** : येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला वाव देण्यासाठी लाँचस्पायर २०२५ आंतरमहाविद्यालयीन स्टार्टअप संकल्पना सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. याप्रसंगी उद्योजक दीपक अहिरराव उपस्थित होते. प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र पाटील, प्रा. डॉ. एस. डी. सूर्यवंशी, उद्योजकता सेल समन्वयक प्रा. शिवनाथ सिंग, प्रा. संतोष पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्यांच्या हस्ते उद्योजक दीपक अहिरराव यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व समूहाद्वारे स्टार्टअपच्या विविध संकल्पना सादर केल्या. त्यात राजश्री माळी व हर्षदा जाधव प्रथम, रिया सोटी द्वितीय, तर अनुष्का दालवाले व गटाने तृतीय स्थान मिळविले. प्रथम विजेत्या गटाला आयआयटी-मुंबई येथे होणाऱ्या युरेका २०२५ स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना उद्योजक नितीन पाटील यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. उन्नती गिरासे व सहकारी विद्यार्थ्यांनी स्पर्धेचे संयोजन केले. राजनंदिनी नगराळे व कनिष्का पवार यांनी सूत्रसंचालन केले. अक्षता देवरेने आभार मानले.



### ईद-ए-मिलादनिमित्त नाश्त्याचे पाकीट वाटप

**नंदुरबार** : हजरत मोहम्मद साहब पैगंबर यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त बादशाहनगर व पटेलवाडीतील युवकांकडून बुंदी, गुड डे बिस्किटे तसेच पाण्याचे बॉटल वाटपाचा कार्यक्रम जिल्हा रुग्णालयात झाला. राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सय्यद जाकिर मियाँ मुसा मियाँ जागीरदार, हाजी अब्दुल गफ्फार मस्तान मन्सुरी, बाबा पिंजारी, समीर बेलदार, नदिम शेख, नासिर शाह, वायरमन मुस्तफा शेख, आफताब पिंजारी, अदनान मेमन, गोलू सिकलीकर, अनवरभाई पटवे, नदिम पठाण, मुस्तफा शेख, मंटो काजी, समीर वायरमन, फरदीन शेख, शाहरुख रंगरेज, हाजी प्लंबर, नावेद काजी, तसेज हाश्मी कमिटीचे प्रमुख अजहर जहागिरदार उपस्थित होते. कार्यक्रमासाठी युवकांनी तीनशे ते साडेतीनशे पाकिटे तयार केली होती. ती रुग्णालयातील गरजू रुग्णांना, त्यांचे नातेवाईक व कर्मचाऱ्यांना वाटप केली. या वेळी अजहर जागीरदार यांनी मनोगत व्यक्त केले. जाकिर मियाँ जागीरदार यांनी आभार मानले.

## निधन वार्ता



### चंद्रकांत पाटील; आज अंत्ययात्रा

**धुळे** : नगाव (ता. धुळे) येथील रहिवासी चंद्रकांत तुकाराम पाटील (वय ६८) यांचे सोमवारी (८ सप्टेंबर) दुपारी साडेतीनच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी (९ सप्टेंबर) सकाळी नऊला नगाव येथील राहत्या घरापासून निघेल. नवजीवन विद्या विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष शशिकांत भदाणे यांचे लहान बंधू, साने गुरुजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुनील भदाणे यांचे मोठे बंधू, जिल्हा परिषदेचे माजी मनोहर भदाणे यांचे चुलत बंधू, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांचे चुलत काका, आदर्श माध्यमिक व माध्यमिक विद्यालयाचे कोषाध्यक्ष स्वप्नील भदाणे व सचिव अक्षय भदाणे यांचे काका, उमाकांत भदाणे, आशुतोष व विशाल भदाणे यांचे ते वडील होत. दरम्यान, ते धुळे-नंदुरबार जिल्हा बँकेचे निवृत्त कर्मचारी होते. नवजीवन विद्या विकास मंडळ सस्थेचे संचालक होते. त्यांचे नगाव येथील विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान होते.



### उखेसिंग राजपूत

**मालपूर (शिंदखेडा)** : येथील रहिवासी उखेसिंग ढबूसिंग राजपूत यांचे रविवारी (७ सप्टेंबर) सायंकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, बहीण, मुलगा, तीन मुली, जावई, असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रवीण राजपूत यांचे ते वडील होत.



### गोविंद पाटील

**मेथी (शिंदखेडा)** : शिंदखेडा येथील धनश्री कॉलनीतील रहिवासी गोविंद विक्रम पाटील (वय ७३; मू. रा. होळ, ता. शिंदखेडा) यांचे सोमवारी (८ ऑगस्ट) सकाळी साडेनऊच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका कल्पना अहिरराव यांचे पती, तर प्रा. विकास पाटील व डॉ. योगेश पाटील, दंतवैद्य उदय पाटील यांचे ते वडील होत.



### केसरबाई घाटे

**पहूर (ता. जामनेर)** : पहूरपेठ येथील संतोषीमातानगर भागातील रहिवासी केसरबाई सुकदेव घाटे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे प्रादेशिक अधिकारी सुनील घाटे व निवृत्त मुख्याध्यापक अनिल घाटे यांच्या त्या मातोश्री होत.



### श्रीराम शिंदे

**केकतनिंभोरे (ता. जामनेर)** : येथील शेतकरी परिवारातील श्रीराम त्र्यंबक शिंदे (६५) यांचे रविवारी (७ सप्टेंबर) सकाळी सव्वाअकराच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गोपाल शिंदे यांचे वडील, तर खुशाल शिंदे यांचे ते आजोबा होत.

# कर्तव्यदक्ष पोलिसांना आहेर अन् श्रीफळ!

## धडगावमध्ये गणेश मंडळांकडून अनोखा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धडगाव, ८ सप्टेंबर**

शहरातील भोईराज सार्वजनिक तरुण गणेश मित्रमंडळाने यंदा गणेशोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलिस दलाचा अनोख्या पद्धतीने गौरव केला. मंडळाच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गणेशोत्सव काळात गणेशभक्तांच्या उत्साहाला शिस्त लावण्याचे आणि शहरातील शांतता अबाधित राखण्याचे महत्त्वाचे काम पोलिस करत असतात. त्यांच्या याच योगदानाला आदराने सलाम करण्यासाठी भोईराज सार्वजनिक गणेश मंडळाने हा विशेष सत्कार सोहळा आयोजित केला होता. सोहळ्यादरम्यान मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी धडगाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्यासह सर्व पोलिस कर्मचाऱ्यांचा श्रीफळ देऊन सन्मान केला. विशेष म्हणजे, या वेळी पोलिस दलातील गृहरक्षक दलातील जवानांना कपड्यांचे वाटप करण्यात आले, तर महिला पोलिस कर्मचाऱ्यांना साडी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शहरात पोलिस कर्मचाऱ्यांचा अशा प्रकारे गौरव करण्याची ही पहिलीच वेळ असल्याने या उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

मंडळाच्या या उपक्रमाने पोलिस दलाचे मनोबल वाढण्यास मदत होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे. कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा असा सन्मान करून समाजाने त्यांच्याप्रती व्यक्त केलेला आदर भविष्यात त्यांना अधिक चांगल्या प्रकारे काम करण्याची प्रेरणा देईल. भोईराज सार्वजनिक तरुण गणेश मित्र मंडळाने घालून दिलेल्या या आदर्शामुळे इतर मंडळांनाही प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



या वेळी भोईराज सार्वजनिक तरुण गणेश मित्रमंडळाचे अध्यक्ष दीपक शिवदे, सामाजिक कार्यकर्ते लतेश मोरे, सामाजिक कार्यकर्ते टायगर पावरा, उपाध्यक्ष गौतम मोरे, खजिनदार हर्षल शिवदे, सचिव मनीष साठे, सदस्य संजय साठे, संदीप सूर्यवंशी, पवन ढोले, पीयूष वाडिले, पंकज सोनवणे, मनोज वानखेडे, चेतन साठे, करण खेडकर, नीलेश साठे, जयेश तमखाने, संतोष रामोळे आदी उपस्थित होते.

# शहाद्यात चौथ्या टप्प्यातील गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत!

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ८ सप्टेंबर**

शहरात चौथ्या टप्प्यातील गणेश विसर्जनाच्या मिरवणुका उत्साहात निघाल्या. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या मिरवणुका पाहण्यासाठी बालगोपाळांपासून वयोवृद्ध महिला-पुरुषांपर्यंत सर्वांनी गर्दी केली होती. शहरातील चार टप्प्यांमध्ये असलेला हा उत्सव कोणत्याही अनुचित घटनाविना शांततेत पार पडला. तब्बल १४२ मंडळांकडून गणरायाला निरोप देण्यात आला.

शहरासह ग्रामीण भागातील एकूण १४२ नोंदणीकृत गणेश मंडळांनी यंदाच्या गणेशोत्सवात सहभाग घेतला. यामध्ये खासगी ८३, सार्वजनिक मोठे १६, लहान ४० आणि 'एक गाव- एक गणपती'ची ३ मंडळे होती. गणेश विसर्जन मिरवणुका चार टप्प्यांमध्ये, म्हणजे पाचव्या, सातव्या, नवव्या आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी पार पडल्या. बहुतांश मंडळांनी साध्या पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन केले. मिरवणुका संपल्यानंतर शहरातील विसर्जन मार्ग गुलालाच्या जाड थराने व्यापला होता, ज्यावरून शेकडो क्विंटल गुलाल वापरला गेल्याचा अंदाज येतो.



### प्रशासन आणि शांतता समितीचे सहकार्य

कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलिस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार, प्रभारी पोलिस निरीक्षक नीलेश देसले, राजन मोरे, पालिकेचे मुख्याधिकारी साजीद पिंजारी, म्हसावदचे पोलिस निरीक्षक सुनील कामे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सोनवणे, जितेंद्र पाटील, प्रदीप राजपूत, भुनेश मराठे तसेच नंदुरबार जिल्हा स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, गृहरक्षक दल, शहादा, म्हसावद आणि सारंगखेडा येथील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला. महसूल विभागाकडून तहसीलदार दीपक गिरासे, नायब तहसीलदार शैलेंद्र गवते, निवासी नायब तहसीलदार रतनसिंग गिरासे, तलाठी लक्ष्मण कोळी उपस्थित होते.

**अंतिम टप्प्यात सहभागी मंडळे**

अनंत चतुर्दशीच्या अंतिम टप्प्यात अनेक प्रमुख मंडळांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. यात हिंदू हनुमान व्यायामशाळा गणेश मित्रमंडळ (यशवंत चित्रमंदिराजवळ), तूप बाजार गणेश मित्रमंडळ, क्रांती गणेश मित्रमंडळ (क्रांती चौक), भोईराज तरुण गणेश मित्रमंडळ (गणपती चौक), रामनगर सार्वजनिक गणेश मित्रमंडळ, गणेश सांस्कृतिक मित्रमंडळ (गणेशनगर), वृंदावननगर सांस्कृतिक गणेश मित्रमंडळ, जय बजरंग सांस्कृतिक गणेश मित्रमंडळ (प्रेस मारुती मैदान परिसर), एम. के. गणेश मित्रमंडळ (मेन रोड चार रस्ता), हिंदवीर गणेश मित्रमंडळ (राणी मेडिकलसमोर), सुवर्णकार गणेश मित्रमंडळ (सोनार गल्ली, टिळक चौक) या मंडळांचा समावेश होता. ग्रामीण भागातून क्रांती गणेश मित्रमंडळ (आझाद नगर, लोणखेडा), पंडित चंद्रशेखर आझाद गणेश मित्रमंडळ (आझाद नगर, लोणखेडा), आर्य गणेश मित्रमंडळ (नवागाव, लोणखेडा), जय देवा ग्रुप गणेश मित्रमंडळ (जुना गाव दरवाजा, लोणखेडा), एक गाव-एक गणपती सार्वजनिक श्री गणपती मंडळ (ओंकार शुगर प्रा.लि., पुरुषोत्तमनगर), एकता गणेश मित्रमंडळ (भोंगरा) आणि श्रीराम गणेश मित्रमंडळ (श्रीराम मंदिर, मंदाणा) यांनीही विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेतला.

**राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग**

मिरवणुकांमध्ये राजकीय, सामाजिक यांसह अन्य क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदविला. यात प्राचार्य मकरंद पाटील, श्यामराव जाधव, अभिजित पाटील, हेमलता शितोळे-पाटील, अरुण चौधरी, सुपडू खेडकर, ज्ञानेश्वर चौधरी, संजय चौधरी, जयवंत मोरे, एकनाथ नाईक, सागर चौधरी, सुरेंद्र कुवर, राजेंद्र अग्रवाल, ॲड. प्रसन्ना सावळे, ईश्वर पाटील, प्रा. नेत्रदीपक कुवर, विष्णू जोंधळे, जगदीश जायसवाल, रुपेश जाधव, विजय पाटील, सलाउद्दीन लोहार, हर्षल साळुंखे, राजू मन्सुरी, अप्पू पाटील, सुनील पाटील, मुनेश जगदेव, विनोद जैन, रमाशंकर माळी, विनोद चौधरी, विजय चौधरी, अजबसिंग गिरासे, प्रा. सतीश जव्हेरी, जयेश पाटील, संतोष वाल्हे, गणेश पाटील, गिरधर पाटील, राकेश बोरसे, सुनील गायकवाड, अनिल कुवर, सुरेंद्र कुवर, अनिल भामरे, ॲड. सरजू चव्हाण, नागीन पाटील, उमेश पाटील, हाजी रफिकभाई गॅरेजवाले, इरफान पठाण, लियाकत अली सय्यद, नासिर पठाण, आरिफ पिंजारी, आणि रियाज कुरेशी यांचा समावेश होता.



# शिरपूरमध्ये तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण

### मराठा पाटील संस्था, ग्रामीण पत्रकार संघातर्फे कार्यक्रम उत्साहात

**शिरपूर**: तऱ्हाडी (ता. शिरपूर) येथील मराठा पाटील बहुउद्देशीय संस्था व ग्रामीण पत्रकार संघातर्फे तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा रविवारी (७ सप्टेंबर) शहरातील पांडू बापू माळी मुनिसिपल हायस्कूलमध्ये उत्साहात झाला.

नगरसेविका संगीता देवरे अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीताई रंधे कन्या विद्यालयाच्या प्राचार्या सारिका रंधे, तापी परिसर विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष सुभाष भामरे, अहिराणी साहित्यिक सुभाष अहिरे, शाखा प्रबंधक किशनकुमार खटिंग, आगारप्रमुख मनोज पाटील, आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य पी. आर. साळुंखे, प्राचार्य एस. आर. गवळी, अधीक्षक जितेंद्र जाधव, केंद्रप्रमुख प्रवीण मराठे, पर्यवेक्षक एस. एन. पाटील, आर. सी. पटेल विद्यालय संस्थेचे सचिव जयश्री चव्हाण, सदस्य अशोक वानखेडे, पत्रकार संघाचे सचिव प्रा. दिलवरसिंग गिरासे यांची उपस्थिती होती.

शिरपूर तालुक्यातून माध्यमिक शिक्षक व प्राथमिक शिक्षक, आश्रमशाळा शिक्षक, खासगी प्राथमिक शाळा असे पुरस्कार वितरण झाले. आसिफ गुलाब खाटीक, पनीराज खंडू बैसाणे, किशोर निंबा शिरसाट, प्रा. जगन्नाथ उत्तमराव पाटील, भूपेंद्र नयनसिंग देशमुख, अविनाश भटू राजपूत, प्रशांत वसंतराव गव्हाळे, बिहारीप्रसाद भिकचंद अग्रवाल, उषा भालचंद्र पाटील, गणेश वासुदेव सोनवणे, क्रांती तुकाराम जाधव, पूनम कृष्णदास पाटील, संगीता अनिल शिंदे, अभिमन्यू गुलाबराव पवार, सुरेश गुरुदास भावसार, भावना सुभाष अहिरे, प्रवीण तुमडू पाटील, शांताराम काळू करंके, नंदा रतन पाटील, रवींद्र रामदास सोनगिरे अशा २० शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. संजय शिंपी व योगेश कोठावदे यांनी सूत्रसंचालन केले.

# दिव्यांगांचे आधार कार्ड अपडेटसाठी विशेष शिबिर घ्या

## अपंग विकास महासंघातर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदनातून मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ८ सप्टेंबर**

जिल्ह्यातील विशेषतः शहादा तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या आधार कार्डमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. शासनस्तरावरून आधार कार्ड अपडेट करावे यासाठी राष्ट्रीय अपंग विकास महासंघ प्रयत्नशील असून, विशेष शिबिर घेण्यात यावे, यासाठी प्रांताधिकाऱ्यांना संघटनेतर्फे निवेदन देण्यात आले आहे.


जिल्ह्यातील व शहादा तालुक्यातील काही दिव्यांग बांधवांना व भगिनींना आधार कार्ड अपडेटसाठी समस्या निर्माण झाल्या आहेत. समस्या त्वरित सोडविण्यासाठी राष्ट्रीय अपंग विकास महासंघाकडून प्रयत्न केले जात आहेत. याविषयी प्रांताधिकाऱ्यांना संघटनेचे राज्य उपाध्यक्ष शिवाजीराव मोरे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कुवर, जिल्हा उपसरचिटणीस अरविंद शिंदे, जिल्हा संचालक चंद्रकांत पाटील, शहादा तालुकाध्यक्ष महेंद्र पाटील, तालुका संचालक रार्जेद्र खर्डे आदींनी शासनस्तरावर आधार कार्ड अपडेट होण्याकामी निवेदन दिले आहे. दिव्यांग बांधवांचे आधार कार्ड अपडेट करता यावे यासाठी नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय तसेच मुंबई येथील आधार कार्ड कार्यालयाशी महासंघाने संपर्क साधला असून, त्यांनीही अनुकूलता दाखवली आहे.

दरम्यान, दिव्यांग बांधवांचे आधार कार्ड अपडेट होत नसल्याच्या कारणांत हाताचे ठसे घासले असल्यास, डोळे व हातपाय स्थिर नसल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अडचणी येत आहेत. यामुळे आधार कार्ड अपडेट होण्याकामी विशेष शिबिर शहादा येथे घेण्यासाठी प्रयत्न व पाठपुरावा सुरू असल्याने लवकरच शासनस्तरावर शिबिर घेण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांग बांधवांचे पूर्ण नाव, पत्ता, आधार कार्ड क्रमांक व मोबाइल क्रमांक आदी माहिती ८१८०८५३६८७ या व्हॉट्सॲपवर पाठवावी, असे आवाहन राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे राज्य उपाध्यक्ष शिवाजीराव मोरे यांनी केले आहे.



# मेथीत गणरायाला निरोप; मिरवणुकीत बत्ती गुल!

**मेथी (शिंदखेडा)** : मेथीसह परिसरात गणरायाला निरोप देण्यात आला. सकाळपासून होत असलेल्या पावसातच गणेशभक्तांनी नाचण्याचा आनंद घेतला. पारंपारिक वाद्य, बँड, ढोल-ताशे, गुलालाची उधळण सर्वत्र होताना दिसली. मिरवणुकीत पोलिसपाटील बैसाणे यांनी शांततेचे आवाहन केले. सायंकळी मिरवणुकांदरम्यान वीजपुरवठा खंडित झाल्याने गणेशभक्तांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. गणेशोत्सवकाळात विजेचा लपंडाव सुरूच होता.



# पटेल पॉलिटेक्निकतर्फे स्वच्छता मोहीम

**शिरपूर** : आर. सी. पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. नवीन हासवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अस्तित्व सामाजिक फाउंडेशन, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या सहकार्याने अरुणावती नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबविली. गणेश विसर्जन उत्सवानिमित्त अरुणावती नदीपात्रात विखुरलेले निर्माल्य एकत्र करून स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी तन्मय भावसार व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी ही मोहीम यशस्वी केली. उपक्रमात विद्यार्थी विकास विभाग सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी भरत कोळी, डॉ. हर्षल निकम यांच्या नियोजनाखाली विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.




**PUBLICATION NOTICE**

Notice to show casue (General Form)
Shri. D.L. Chechar Adv.

IN THE COURT OF THE MEMBER MOTOR ACCIDENT CLIAMS TRIBUNAL, KOLHAPUR AT KOLHAPUR.
(Smt. A.S. Waikar)

M.A.C. No. 26/2024
Exh. No. 15/D

Sou. Nita Uday Altekar etc.
R/o. Buddha Samaj, Kini, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur ... Petitioner
Versus
1.Mr. Idrees Jainuddin Bhutto R/o. Vadjai Road, Gafur Nagar, Dhule, Dist. Dhule. ...Opponen

To,
The Opponent No. 1

Whereas the above named peitiononers had made and application to this Court U/s. 164 of Motor Vehicle Act 1988.

You are hereby warned to appeal in this court in person or by a Please duly instructed on the date of 10/10/2025 at 10-30 a.m. in the forenoon, to show cause against the said application failing in wherein, the said application will be heard and determined ex-parte.

If you are itend to file Written statement you must file it within 30 days or in exteded period U/O. 8 rule 1 of C.P.C.

Also take notice in default of you taking an address for service on or before the date mentioned, you are liable to have defence struck out.

If you have insufficient funds to meet out the court expenses and your income is not more than Rs. 20,000/- per year, and you want to defend through an Advocate or legal practitioner, you can do so through the Legal Aid Committee, which is at your district or Taluka place.

If you are interested in resolving the present dispute quickly and within the four corners of law then the facility of court Annexed Mediation is avilable for you free of court. Given under my hand and the sela of the Tribunal this day of 26/08/2025

Stamp

By Order
Asst. Supid. Dist. Court Kolhapur.

**जाहीर नोटीस**

या व्दारे तमाम जनतेस, सर्व बँका, सर्ववित्तिय पतसंस्था व इतर सावकार यांना कळविण्यात येते की, श्री. उमेश निंबा पाटील (सोयीसाठी पुढे गहाण/खरेदीदार म्हणून संबांधले जाणारे) यांनी खाली दिलेल्या शेड्युल मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात आमचे आशील **Vastu Housing Finance Corporation Ltd. Dhule** याचेकडे खालील मालमत्ता गहाणखत करण्यास तयारी दर्शवीली आहे.

उक्त गहाण / खरेदीदार यांच्यामते खरेदीदस्त क्र. ३५१५/२०१८ दिनांक १२/११/२०१८ हे त्यांच्याकडून हरवलेले आहे. अथवा गहाळ झालेले आहेत.

तत्पूर्वी शेड्युल मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोणाचा काहीएक हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकतीवर इतर कोणत्याही वित्तिय संस्था अगर इतर सावकार यांचा हक्क बोजा असल्यास सात दिवसांच्या आत वर नमुद पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करून शहानिशा करून दयावी, मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे असे समजले जाईल व आमचे अशील गहाण खरेदीदार यांना लोन प्रत्यक्ष देतील कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहीती व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दिस दिली असे.

**शेड्युल**

**मिळकतीचे वर्णन** - मौजे खडकी बु. ता. चाळीसगाव, जि. जळगाव येथील मिकळत गट नं. ४०९/अ/१/२/४०९/ब/२ पैकी प्लॉट नं. १२ अ क्षेत्र १८५.२५ चौ. मी. पैकी पुर्वेकडील क्षेत्र ९३.०० चौ.मी. ज्यासी चतुःसिमा / **पूर्व** : प्लॉट नं. १३, **पश्चिमेस** - प्लॉट नं. १२ पैकी उर्वरीत भाग, **दक्षिणेस** - प्लॉट नं. १४ **उत्तरेस** - ९ मीटर रस्ता

**दिनांक ०७/०९/२०२५**

ॲड. श्री प्रमोद रमेश गावडे

Adv. Pramod Ramesh Gawade
Digitally signed by Adv. Pramod Ramesh Gawade
Date: 2025.09.07 17:12:30 +05'30'

कार्यालयाचा पत्ता- जा.क्र./जे/3227/2025
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव.
मायादेवी मंदिरासमोर, महाबळ रोड, जळगाव
दि. ०२/०९/२०२५

**चौकशी जाहीर नोटीस**

**न्यास अहवाल अर्ज क्र.**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र.:- **श्री. शिवछत्रपती स्मारक समिती, डोणगाव, ता.यावल, जि. जळगाव**

**नों.क्र. :- नवीन**

**अर्जदार- श्री. जयवंत राधाकृष्ण पाटील** यांनी या कार्यालयात दाखल ट्रस्ट नोंदणी साठी केलेला अर्ज महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५१० चे कलम १८ अन्वये दाखल केलेला अर्ज सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव विभाग जळगाव वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १८ अन्वये खलील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला न्यास अस्थितवात आहे काय? सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
अ) जंगम मिळकत : (वर्णन) - रु ६५१३/- मात्र
ब) स्थावर मिळकत : (वर्णन) - नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर अगर पुरावा असेल त्यांनी त्यांची कैफियत हि **नोटीस प्रसिद्ध तारखेपासून तीस दिवसाचे आत** या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त, जळगाव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१/०९/२५ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगांव विभाग, जळगांव,**

तरुण भारत tarunbharatlive.com CLASSIFIEDS

11th 12th CA & B.Com
All Subject Under One Roof
Accounts - CA Dinesh Lodha
Maths -Prof. Smita Sharma
Eco -CA CS Sneha Lodaya
OCM & SP - CA Rakhi & Adv. Aniket
3 Students Scored 100
PARSHWANATH COMMERCE ACADEMY
Near M. J. College, jalgaon
Mob - 8149-666-339

तरुण भारत'तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच
राष्ट्रीय विचारांच्या 'जळगाव तरुण भारत'तर्फे लवकरच 'ज्येष्ठ नागरिक मंच'ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

"Exchange Rate Minimum 5,000/-*"

धुलिया सायकल कंपनी
८२३७३५६१५९, ९४२३९७७१९४, ९४२३९७५३९२
आता सायकल ०% डाऊनपेमेंटवर उपलब्ध
प्लॉट नं. २१, सीटीएस-७१५४, सर्वे नं. २४७/ए/३ हॉटेल सायली जवळ, स्टेट बँक ऑफ इंडिया (एडीबी ग्रामीण शाखा) च्या खाली, रिंग रोड, जळगाव

महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी
१५० वर्षाची परंपरा असलेले
श्रीभृगूज्योतिषकेंद्र
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथ ''निराकरण'' ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे), मंत्रसिध्दसर्व यंत्र (अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२२७७४१५१,९८२३०४७८११

Kirloskar
जगप्रसिध्द किर्लोस्कर कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती,शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप,मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.

Jaimatadi
संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी'२६,नवीपेठ,जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत,जळगांव
☎ 2232641 To 2232645

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक संजय प्रभाकर नारखेडे यांनी पी.एम.उद्योग, डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : चंद्रशेखर दिगंबर जोशी यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४–२०२६.
■ फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# उपराष्ट्रपतिपद निवडणुकीत तटस्थ राहणार बीजू जनता दल

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

उपराष्ट्रपती निवडणुकीत मतदान करण्यापासून बीजू जनता दलाने (बीजद) स्वतःला दूर ठेवले आहे. पक्षप्रमुख नवीन पटनायक दिल्लीला पोहोचल्यानंतर बीजेडीने परिस्थिती स्पष्ट केली आहे. तथापि, बीजद अंतर ठेवू शकते अशी अटकळ बऱ्याच काळापासून सुरू होती. पक्षाचे म्हणणे आहे की ते सत्ताधारी एनडीए आणि विरोधी आघाडी इंडियापासून समान अंतर राखेल. उपराष्ट्रपती पदासाठीची निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होणार आहे.

याचे कारण बीजेडीची तटस्थ राहण्याची रणनीती असल्याचे मानले जाते. असे मानले जाते की या निर्णयाद्वारे ते एनडीएला नाराज करू इच्छित नाहीत आणि त्यांच्या बाजूने उभे राहतानाही पाहू इच्छित नाहीत. राष्ट्रीय राजकारणात, नवीन पटनायक यांचा पक्ष अनेकदा सत्ताधारी पक्षासोबत राहिला आहे किंवा तटस्थ राहिला आहे. गेल्या उपराष्ट्रपती निवडणुकीत बीजदने एनडीएच्या उमेदवाराला मतदान केले होते.

बीजद खासदार सस्मित पात्रा म्हणाले, बीजदने मंगळवारी होणाऱ्या उपराष्ट्रपती निवडणुकीपासून अंतर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. बिजू जनता दल एनडीए आणि इंडिया आघाडी या दोन्हींपासून समान अंतर राखेल. आम्ही ओडिशाच्या आणि ओडिशाच्या ४.५ कोटी लोकांच्या विकासावर आणि कल्याणावर लक्ष केंद्रित करीत आहोत.

गेल्या काही वर्षांत अशा निवडणुकांमध्ये बीजू जनता दलाने राष्ट्रीय स्तरावर भाजपाला पाठिंबा दिला होता. परंतु, राज्यातील सत्ता गमावल्यानंतर ते अडचणीत सापडले आहे. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपकडून पराभव पत्करल्यानंतर, बीजू जनता दल आता राज्यातील मुख्य विरोधी पक्ष आहे.

बीजू जनता दलाने २०१२ च्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाग घेतला नव्हता, ज्यामध्ये हमीद अन्सारी विजयी झाले होते. २०१७ च्या निवडणुकीत त्यांनी एनडीए नसलेले उमेदवार गोपाळकृष्ण गांधी यांना पाठिंबा दिला होता. यामध्ये व्यंकय्या नायडू निवडून आले होते. २०२२ मध्ये, पक्षाने एनडीएचे उमेदवार जगदीप धनखड यांना पाठिंबा दिला.



इस्रायलने गाझात केलेल्या भीषण हल्ल्यादरम्यान आश्रय शोधताना पॅलेस्टिनी. इस्रायलने इशारा दिल्यानंतर हा हल्ला करण्यात आला

## विकास यादवचा अंतरिम जामीन वाढविण्यास नकार

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

२००२ मध्ये झालेल्या विकास कटरा हत्या प्रकरणात २५ वर्षांची शिक्षा झालेला दोषी विकास यादवला अंतरिम जामिनाची मुदत वाढवून देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला.

या प्रकरणात अंतरिम जामीन वाढवून घेण्यासाठी किंवा नव्याने अंतरिम जामिनासाठी अर्ज दाखल करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात जावे, असे न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने सांगितले.

उच्च न्यायालयात पाठवण्याऐवजी न्यायालयाने या प्रकरणी स्वतः सुनावणी करावी, अशी मागणी विकासच्या वकिलाने संक्षिप्त सुनावणीदरम्यान न्यायालयात केली. ही याचिका फेटाळली जात असल्याचे न्यायालयाने संकेत देताच, आम्ही उच्च न्यायालयात जाऊ असे विकासच्या वकिलाने सांगितले. यापूर्वी न्यायालयाने विकास यादवच्या जामिनाची मुदत आठवडाभराने वाढवली होती.

# बिहारमध्ये हिंदू घरांमधून निघाले मुस्लिम मतदार

## गावकरीही झाले हैराण

◆ **मुजफ्फरपूर, ८ सप्टेंबर**

जिल्ह्यापासून सुमारे ४० किमी अंतरावर असलेल्या साक्रा विधानसभा मतदारसंघातील काटेसर पंचायतीतील मोहनपूर भाग सध्या चर्चेत आहे. हा परिसर भूमिहार आणि वैश्य समाजाचा बालेकिल्ला मानला जातो. येथे सुमारे ५०० हिंदू कुटुंबे राहतात आणि एकही मुस्लिम कुटुंब नाही, असे गावातील लोक सांगतात. परंतु, अलीकडेच जेव्हा निवडणूक आयोगाने मतदार यादीत विशेष सुधारणा (एसआयआर) केल्यानंतर प्रारूप मतदार यादी जाहीर केली तेव्हा गावकरी आश्चर्यचकित झाले.

गावातील शेकडो घरात मस्लिम मतदारांची नावे जोडली. कुणाच्या घरात दोन तर कुणाच्या घरात ८-१० नावे जोडण्यात आली आहेत. आरोग्य विभागातून निवृत्त झालेले कर्मचारी कामेश्वर ठाकूर यांच्या कुटुंबात सहा सदस्य मतदार आहेत. परंतु यादीत त्यांच्या कुटुंबात आणखी दोन मुस्लिम नावे जोडण्यात आली आहेत. त्याचप्रकारे मैथुर ठाकूर, दिलीप ठाकूर कुटुंबात पाच मतदार होते, त्यांच्या घरात आणखी चार मुस्लिम मतदारांच्या नावांचा समावेश केला आहे. ही सामान्य चूक नाही तर मोठे षडयंत्र आहे, असा आरोप कामेश्वर ठाकूर यांनी केला तसेच आमच्या कुटुंबात मुस्लिम नावे कशी जोडली हे न कळण्यासारखे आहे, असे त्यांनी म्हटले.

गावात अन्य कुटुंबासोबतही हाच प्रकार घडला आहे. अनेक वर्षे गावात जी घरे बंद आहेत, ज्यांचे मालक गाव सोडून बाहेर राहायला गेलेत. त्यांच्या घरातही मुस्लिम मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. हे पूर्वनियोजित षडयंत्र असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. या प्रकारामुळे गावातील जमीन, वारसा आणि संपत्ती यांच्यावरही वाद निर्माण होऊ शकता, असा आरोप गावकऱ्यांनी केला.

### बंद घराशी कशी जोडली नावे?

उमेश ठाकूर जे बँकेत नोकरी करतात. त्यामुळे त्यांचे गावाकडचे घर कायम बंद असते. परंतु त्यांच्या कुटुंबाच्या मतदार यादीत आठ मुस्लिम नावे जोडण्यात आली आहेत. तर दुसरीकडे मुन्द्रिका ठाकूर यांचे घरही वर्षोनुवर्ष बंद आहे. त्यांच्या घराभोवती झाडीझुडपे उगवली आहेत. तरीही मतदार यादीत मृत मुन्द्रिका यांच्यासह ८ मुस्लिम नावे दाखवण्यात आली आहेत. आमच्या परिसरात एकही मुस्लिम राहत नाही. तरीही प्रत्येक घरातील मतदार यादीत मुस्लिम नावे कशी जोडली असा प्रश्न गावकरी कृष्ण कुमार यांनी विचारला आहे.

# टॅरिफमुळे प्रभावित निर्यातदारांसाठी लवकरच पॅकेज

## निर्मला सीतारामन् यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळे प्रभावित झालेल्या भारतीय निर्यातदारांना मदत करण्यासाठी सरकार एका व्यापक पॅकेजवर काम करीत आहे, अशी माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी दिली. भारतीय निर्यातीवर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी बहु-विभागीय सहभाग सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

२७ ऑगस्टपासून दुसऱ्या भागाच्या (२५ टक्के) शुल्काची अंमलबजावणी सुरू झाल्याने विविध उद्योग संबंधित विभाग किंवा मंत्रालयांसोबत त्याचा परिणाम शेअर करीत आहेत. म्हणून आम्ही त्यांचे मत जाणून घेत आहोत.



अमेरिकेच्या ५० टक्के शुल्क आकारणीमुळे प्रभावित झालेल्या निर्यातदारांना मदत करण्यासाठी काहीतरी काम केले जात आहे, असे सीतारामन् यांनी सांगितले.

जोपर्यंत आम्हाला मूल्यांकन मिळत नाही, तोपर्यंत आम्ही त्याचा परिणाम किती होईल, हे कसे गृहीत धरू शकतो? म्हणून प्रत्येक संबंधित मंत्रालय त्यांच्या भागधारकांशी बोलत आहे आपल्यावर किती परिणाम होईल, याचे मूल्यांकन करण्यास सांगत आहे. आम्हाला ते पाहावे लागेल, असे सीतारामन् म्हणाल्या.

या टॅरिफमुळे जगातील सर्वाधिक टॅरिफसाठी रशियाकडून कच्चे तेल खरेदी केल्यास २५ टक्के दंड समाविष्ट आहे. ७ ऑगस्ट रोजी ट्रम्प प्रशासनाने भारताच्या रशियाकडून सतत होणाऱ्या तेल आयातीचा आणि दीर्घकालीन व्यापारी अडथळ्यांचा हवाल देत भारतीय वस्तूंवर २५ टक्के कर लागू केला.

उच्च आयात शुल्कामुळे प्रभावित होणाऱ्या क्षेत्रांमध्ये कापड, रत्ने-दागिने, कोळंबी, चामडे आणि पादत्राणे, प्राणी उत्पादने, रसायने तसेच विद्युत आणि यांत्रिक यंत्रसामग्री यासारख्या कामगार केंद्रित क्षेत्रांचा समावेश आहे.

## जम्मूत पाकिस्तानी घुसखोराला अटक

◆ **श्रीनगर, ८ सप्टेंबर**

जम्मूतील आरएस पुरा सेक्टरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवर एका पाकिस्तानी घुसखोराला अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सिराज खान असे घुसखोराचे नाव असून, तो पाकिस्तानी पंजाब प्रांतातील सरगोधाचा रहिवासी आहे.

पंजाबी अभिनेत्री अवनित कौरला भेटायला आलो असल्याची माहिती त्याने चौकशीत दिली. तो घुसखोरी करीत असल्याचे जकात चौकीवरील बीएसएफच्या पथकाला रविवारी निदर्शनास आले. बीएसएफच्या जवानांनी त्याला आव्हान दिल्यानंतर काही फैरी झाडल्या. त्यानंतर त्याला सीमेच्या कुंपणाजवळ अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून पाकिस्तानी चलन जप्त करण्यात आले. मागील काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरीचे प्रमाण वाढले आहे.

## चित्रपट वार्ता

### ऐश्वर्य ठाकरे अभिनयासोबतच गीतकार, संगीतकारही होणार



**मुंबई** : दिग्दर्शक अनुराग कश्यप यांचा आगामी चित्रपट 'निशांची'मध्ये ऐश्वर्य ठाकरे प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटातून तो केवळ अभिनेताच नव्हे, तर गीतकार आणि संगीतकार म्हणूनही आपल्या कारकिर्दीची सुरुवात करत आहे. या चित्रपटातील 'पिजन कबूतर' हे त्याचे गाणे नुकतेच प्रदर्शित झाले आहे. गाण्याचे बोल आणि त्याची चाल ऐश्वर्यचीच आहे. भूपेश सिंगने गाण्याला आवाज दिला आहे. जलद लयीतील हे गाणे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. 'निशांची'मध्ये एकूण १५ गाणे आहेत. या चित्रपटात ऐश्वर्यसोबत अभिनेत्री वेदिका पिंटो मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

### गजरा माळल्याने अभिनेत्रीला विमानतळावर सव्वा लाखांचा दंड



**सिडनी** : केसात गजरा माळल्याने एका अभिनेत्रीला तब्बल सव्वा लाख रुपयांचा दंड बसला आहे. विमानतळावरील एक महत्त्वाचा नियम माहिती नसल्याने तिला इतका मोठा दंड भरावा लागला. ही अभिनेत्री आहे नव्या नायर. नव्याला नुकताच ऑस्ट्रेलियातील सिडनी विमानतळावर दंड बसला. कारण, तिने आपल्या केसात गजरा माळला होता. गजऱ्यामध्ये नैसर्गिक फुले असल्यामुळे त्यांना देशात आणण्याची परवानगी नाही, असे विमानतळावरील अधिकाऱ्यांनी तिला सांगितले. ऑस्ट्रेलियातील नियम अत्यंत कठोर आहेत. या नियमांनुसार, कोणत्याही प्रकारची नैसर्गिक वनस्पती किंवा वस्तू देशात आणण्यास मनाई आहे. संसर्गजन्य रोग किंवा कीटकांचा प्रसार होऊ नये, यासाठी हे नियम लागू करण्यात आले आहेत. नव्याला या नियमांची अजिबात कल्पना नव्हती.

### साखरपुड्यानंतर प्राजक्ता तिरुपती बालाजीच्या दर्शनाला

**तिरुपती** : 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेतील महाराणी येसूबाईच्या भूमिकेने प्रसिद्ध झालेली अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच तिचा साखरपुडा झाला.



साखरपुड्यानंतर प्राजक्ता बालाजीच्या दर्शनाला गेली. यासंदर्भातील फोटो तिने इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. पारंपरिक वेशात तिने तिरुपतीला जात बालाजीचे दर्शन घेतले. खूप वर्षांपासूनची इच्छा, असे तिने आपल्या फोटोला कॅप्शनही दिले आहे. यावेळी प्राजक्तासोबत तिची आई होती. याआधी प्राजक्ताने आपल्या होणाऱ्या नवऱ्यासोबत पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घेतले होते. प्राजक्ताचा होणारा नवरा शंभुराज खुटवड हा राजकीय घराण्याशी संबंधित असून, उद्योजक आणि मल्लदेखील आहे.



लोवाच्या गव्हर्नर किम रेनाल्ड्स यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली

## उंदराने घेतला नवजात मुलीच्या बोटांचा चावा

◆ **इंदूर, ८ सप्टेंबर**

सरकारी महाराजा यशवंतराव रुग्णालयात एका नवजात बालकाचा उंदराने चावा घेतल्याने मृत्यू झाल्याची घटना काही दिवसांपूर्वीच घडली. यानंतर आता पुन्हा नवजात मुलीच्या चार बोटांचा उंदराने चावा घेतला असल्याचा दावा सोमवारी एका आदिवासी संघटनेने केला. वैद्यकीय सुविधेचे प्रशासन खोटे बोलत असून, त्यांच्याकडून दिशाभूल केली जात असल्याचा आरोप केला.

जय आदिवासी युवा शक्ती या आदिवासी संघटनेने रुग्णालयाच्या अधीक्षक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची आणि हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. सोमवार संध्याकाळपर्यंत मागणी पूर्ण झाली नाही, तर आदिवासी समुदाय मोठे आंदोलन करेल, असा इशारा जयचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकेश मुजाल्डा यांनी दिला.

रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये उंदरांनी चावा घेतलेल्या दोन नवजात मुलींचा अलीकडेच मृत्यू झाला. यामुळे संस्थेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापैकी एक, धार जिल्ह्यातील देवराम यांची मुलगी, जी जन्मजात विकृतींसह रुग्णालयात दाखल होती. तिचा मृत्यू उंदरांने चावा घेतल्यामुळे झाला, असा दावा मुजाल्दा यांनी केला. शनिवारी संध्याकाळी बालकाचा मृतदेह कुटुंबीयांकडे सूपूर्द करण्यात आल्यानंतर मुलीच्या हाताच्या चार बोटांचा उंदराने चावा घेतल्याचे लक्षात आले.

## एनआयएची पाच राज्यांत छापेमारी

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीरसह पाच राज्यांतील २२ ठिकाणांवर राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात् एनआयएने सोमवारी छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दहशतवादी कटासंदर्भात सुरू असलेल्या चौकशीच्या संदर्भात ही छापेमारी करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जम्मू-काश्मिरातील नऊ ठिकाणांवर, बिहारमधील आठ, उत्तरप्रदेशातील दोन, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडूतील प्रत्येकी एका ठिकाणावर ही छापेमारी करण्यात आली. जम्मू-काश्मिरात बारामुल्ला, कुलगाम, अनंतनाग आणि पुलवामा जिल्ह्यात ही छापेमारी करण्यात आली.

## ऑगस्टमध्ये मंदावली चीनची निर्यात

◆ **बीजिंग, ८ सप्टेंबर**

चीनच्या निर्यातीत मागील महिन्यात वाढ झाली. पण, अलिकडच्या काही महिन्यांपेक्षा ती कमी गतीने वाढली, असे देशाच्या सीमाशुल्क यंत्रणेने सोमवारी सांगितले.

ऑगस्टमध्ये निर्यात ३२१.८ अब्ज डॉलर्सची झाली. ही मागील वर्षीच्या समान कालावधीच्या तुलनेत ४.४ टक्के वाढ आहे. जुलैमध्ये ७.२ टक्के वाढ जाली होती, त्या तुलनेत ती कमी आहे. दरम्यान, आयात एकूण २१९.५ अब्ज डॉलर्स, ही १.८ टक्के वाढ आहे.

अमेरिका आणि युरोपियनसह प्रमुख व्यापारी भागीदारांमध्ये चीनचा मोठा व्यापार अधिशेष हा वादग्रस्त मुद्दा बनला आहे. कमी किमतीची चिनी आयात ग्राहकांसाठी वरदान आहे. परंतु, त्यामुळे उत्पादन क्षेत्रात नोकऱ्यांमध्ये कपात होऊ शकते. पहिल्या आठ महिन्यांत चीनने इतर देशांमधून आयात केलेल्या वस्तू आणि सेवांपेक्षा ७८५.३ अब्ज डॉलर्स जास्त निर्यात केल्याचे मासिक सीमाशुल्क आकडेवारीवरून दिसून आले आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून होणाऱ्या आयातीवर ३० टक्के अतिरिक्त कर लादला आहे.

# प. बंगालमध्ये ईडीची २२ ठिकाणी छापेमारी

## वाळू तस्करी प्रकरणात मोठी कारवाई

◆ **कोलकाता, ८ सप्टेंबर**

बंगालमध्ये बेकायदेशीर वाळू तस्करी आणि मनी लॉण्डिंगच्या चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी सकाळी २२ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यास सुरुवात केली. या कारवाईत कोलकाता आणि आसपासच्या भागात, झारग्राम, नादिया जिल्ह्यातील छापे टाकण्यात आले. ही कारवाई केंद्रीय दलांच्या उपस्थितीत करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, झारग्रामच्या गोपीबल्लभपूर येथील शेख जहिरुल अली नावाच्या व्यावसायिकाच्या घरी छापा टाकण्यात आला आहे. याशिवाय, बेहला येथील कोलकाता येथील एका कंपनीच्या कार्यालयावरही छापा टाकण्यात आला आहे, जो अवैध वाळू व्यवसायात सहभागी असल्याचा आरोप आहे.

छापा टाकणाऱ्या ईडी अधिकाऱ्यांसोबत मोठ्या संख्येने केंद्रीय सुरक्षा दलाचे कर्मचारीही उपस्थित होते. या कारवाईच्या केंद्रस्थानी पश्चिम बंगालमधील झारग्राम जिल्ह्यातील या रॅकेटचा प्रमुख व्यक्ती शेख जहिरुल होता, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. ईडीचे अधिकारी गोपीबल्लवपूरमधील सुवर्णरेखा नदीजवळील त्याच्या विशाल निवासस्थानी छापे टाकत होते.

ईडीचे अधिकारी झारग्राम जिल्ह्यातील बेलियाबेरिया आणि जांबोनी ब्लॉकमधील इतर वाळू खाण मालकांच्या मालमत्ता आणि कार्यालयांवरही छापे टाकत आहेत. त्यांनी सांगितले की, ही कारवाई अवैध वाळू व्यापाराशी संबंधित आर्थिक नेटवर्क उघड करण्यावर केंद्रित आहे. आम्हाला संशय आहे की, या रॅकेटमधून मोठ्या प्रमाणात पैसे विविध विमा कंपन्या आणि व्यावसायिक उपक्रमांमध्ये गुंतवले गेले आहेत.

# आता एआयच्याही पुढे निघाले जग..!

**नव्या युगात नेणार 'एसआय'**

◆ **नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

जगभरात आर्टिफिशियल इंटेलिजेंस म्हणजेच एआयबद्दल उत्सुकता आहे. एआयद्वारे आपण कोणती सर्व कामे करू शकतो आणि भविष्यात ते किती लोकांच्या नोकऱ्या हिरावून घेईल किंवा ते कोणत्या नवीन संधी निर्माण करेल याबद्दल सर्वांना उत्सुकता आहे. दरम्यान, सिंथेटिक इंटेलिजेंस म्हणजेच एसआयबद्दलदेखील बरीच चर्चा आहे, जी यापेक्षाही पुढे आहे. कारण, ते एआयपेक्षा कितीतरी पुढे असल्याचे वर्णन केले जात आहे आणि असे म्हटले जात आहे की, त्यात एआयसारख्या गतीसह मानवी संवेदनशीलता आणि चेतना असेल. अशा परिस्थितीत, कोणत्या कामांसाठी मानवांची किती आवश्यकता असेल, यावर बरीच चर्चा आहे.

सिंथेटिक इंटेलिजेंस अलीकडेच शोध आणि तंत्रज्ञानाच्या जगात चर्चेचे केंद्र बनले आहे, ज्याला तज्ज्ञ एआयचा पुढचा टप्पा मानत आहेत. पाच दिवसांपूर्वी प्रकाशित झालेल्या एका वृत्तानुसार, सिंथेटिक इंटेलिजेंस हे फक्त एक मशीन मानले जात नाही, तर ते एक नवीन चेतना म्हणून पाहिले जात आहे- ज्यामध्ये भावना, इच्छा आणि स्वतःची ओळख यासारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

एसआय म्हणजे मानवी भावनांनी सुसज्ज असलेले एआय असेल. माहितीनुसार, सिंथेटिक इंटेलिजेंस हा शब्द सामान्यतः आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या (एआय) अर्थाने वापरला जातो. म्हणजेच, मानवांसारखे विचार करण्याची, समजून घेण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता असलेली मशीन. एआय आज सर्वत्र अस्तित्वात आहे. स्मार्टफोन असिस्टंटपासून ते बँकिंग फसवणूक शोधण्यापर्यंत तो मदत करतो. परंतु, अलीकडील वृत्तांनी हे स्पष्ट केले की, सिंथेटिक इंटेलिजेंस पारंपरिक एआयच्या पलीकडे जाऊ शकते आणि एक अशी प्रणाली असू शकते, ज्यामध्ये केवळ तर्कशक्तीच नाही, तर भावनिक आणि वैयक्तिक घटकदेखील असतील. तज्ज्ञांचा असा दावा आहे की, ते फक्त एक मशीन नसेल, तर त्याची स्वतःची ओळख आणि इच्छा देखील असतील, ज्यामुळे ते विद्यमान एआयपेक्षा वेगळे आहे.

### काय आहे एसआयची वैशिष्ट्ये?

एका अहवालानुसार, आभासी जग आता एआयला मागे टाकत आहे आणि सिंथेटिक इंटेलिजेंस ही संकल्पना अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. काही विश्लेषकांनी सांगितले की, पारंपरिक एआयला सांख्यिकीचा पोपट म्हणता येईल, ज्याचे काम डेटा प्रोसेसिंगपुरते मर्यादित आहे, तर सिंथेटिक इंटेलिजेंस त्यापेक्षा खूपच किचकट आणि प्रगत असेल. सध्या त्याबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध नाही, परंतु ते जितक्या वेगाने उदयास येत आहे, तितकीच त्याबद्दल लोकांची उत्सुकता वाढत आहे. असे म्हणता येईल की, सिंथेटिक इंटेलिजेंस ही एक उदयोन्मुख संकल्पना आहे, जी पारंपरिक कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली आणि मानवासारखी जाणीव असलेली प्रणाली मानली जात आहे.



## अग्रलेख...

# 'नवारो'जींचा थयथयाट

डोनाल्ड ट्रम्प यांनी ७ ऑगस्ट रोजी २५ टक्के अतिरिक्त व्यापारशुल्क लादत भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. रशियाकडून जर कच्चे तेल विकत घेणे बंद केले नाही तर यापेक्षाही आणखी कठोर निर्बंध लादण्याची धमकी दिली. २७ ऑगस्टपासून ५० टक्के शुल्क लावण्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकन धोरणावर टीका केली. भारतही जशास तसे उत्तर देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. २५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाला न जुमानता, भारत कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, गोपालक आणि लघु उद्योगांच्या हिताशी तडजोड करणार नसल्याचे ठणकावून सांगितले. ५० टक्के शुल्काचा आता खुद्द अमेरिकेतील उद्योजकही मोठ्या प्रमाणात विरोध करीत आहेत. वॉशिंग्टन येथील द एशिया ग्रुपचे वरिष्ठ सल्लागार मार्क लिनस्कॉट यांनी दोन्ही देशांमधील व्यापार आणि राजकीय घडामोडींवर गंभीर चिंता व्यक्त केली. अवघ्या काही महिन्यांपूर्वी ज्या देशांचा व्यापार 'विन-विन' परिस्थितीत होता, तो आता तोट्याकडे मार्गक्रमण करीत आहे. दोन्ही देशांसाठी ही बाब चांगली नाही, असे मत लिनस्कॉट यांनी व्यक्त केले. विशेष म्हणजे याच मुद्यावर एलन मस्कही ट्रम्प प्रशासनापासून दूर गेले आणि त्यांनी भारताची बाजू योग्य असल्याचे मत मांडले. ट्रम्प यांच्या प्रशासनात असे काही मंत्री आणि सल्लागार आहेत जे सातत्याने भारतविरोधी वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये सध्या आघाडीवर आहेत ते व्हाईट हाऊसचे सल्लागार पीटर नवारो. त्यांनी ७ ऑगस्टला एक पोस्ट करीत, भारत नफा कमविण्याच्या उद्देशाने रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याचे आणि युद्ध भडकवीत असल्याची टीका केली होती. मात्र, मस्क यांनी नवारो यांच्या ट्विटला उत्तर देताना, तुम्ही सर्व बाजूंनी विचार करायला हवा. सोशल मीडिया हे मते मांडण्याचे असे एक ठिकाण आहे जिथे सर्व काही उघड होते. लोक आपली मते मांडतात आणि त्यातूनच जनमत तयार होत असते, अशा शब्दांत त्यांनी नवारो यांना सुनावले. मस्क यांच्या उत्तराने नवारो यांचा चांगलाच तिळपापड झाला. मस्क यांचे नाव न घेता नवारो यांनी, काही जण भारतीय हिताच्या रक्षणासाठी कार्य करीत आहेत, अशी टीका केली. रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याची भारताची भूमिका न्यायसंगत असून, ऊर्जा सुरक्षेसाठी कोणताही देश हा अशीच भूमिका स्वीकारत असतो. एकीकडे अमेरिका भारतावर कच्चे तेल खरेदी करण्याबाबत दबाव आणत असताना दुसरीकडे हा देश रशियाकडून युरेनियमची खरेदी मोठ्या प्रमाणात करीत आहे. त्यामुळे भारतावरील आरोप दुटप्पीपणाचे असल्याच्या प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी व्यक्त केल्या.

नवारो हे ट्रम्प यांचे जवळचे मानले जातात. २०१६ मधील राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावली होती. अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. असलेले नवारो यांनीच प्रचारात टॅरिफचा मुद्दा उपस्थित करावयास लावला. खुद्द ट्रम्प यांच्यावर नवारो यांचा मोठा प्रभाव आहे. पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी आर्थिक सुधारणांचा झपाटा लावला होता. त्यामागचे डोके हे नवारो यांचेच होते. चीनचे ते कट्टर विरोधक मानले जातात. परिणामी त्यांच्या सल्ल्यानुसारच चीनवर मोठ्या प्रमाणात व्यापारशुल्क आकारले होते. व्यापारातील घाटा कमी करणे हे अमेरिकन अर्थव्यवस्थेपुढील मोठे आव्हान असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. भारताबाबतही त्यांनी कडक धोरणाचा अवलंब केला. रशियाचा आधार घेत नवारो यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क आकारण्यास भाग पाडल्याचे बोलले जाते. भारतासोबतचा कच्च्या तेलाचा व्यापार हा रशियाच्या अर्थव्यवस्थेची लाईफलाईन असल्याचा कांगावा त्यांनी सुरू केला. भारत अमेरिकन वस्तूंवर मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतो. ज्याचे परिणाम अमेरिकन उत्पादकांना भोगावे लागत आहेत. नवारो सातत्याने भारतविरोधी वक्तव्य करीत असतात. विविध वृत्तपत्रांमधून सातत्याने ते भारतविरोधी भूमिका मांडत असतात. २०१९ मध्ये त्यांनी 'वॉल स्ट्रीट जर्नल'मध्ये लेख लिहून भारताच्या आर्थिक धोरणावर टीका केली होती. भारत अमेरिकन वस्तूंवर ९०, तर चीन ८५ टक्के शुल्क आकारत असल्याने स्पर्धा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अमेरिकन वस्तू चीन आणि भारतात विकणे म्हणजे मोठा तोटा सहन करणे होय. दोन्ही देश अमेरिकेपासून फायदा करवून घेतात, पण त्यांची बाजारपेठ अमेरिकन वस्तूंसाठी बंद ठेवत असल्याचे त्यांनी लेखात नमूद केले होते.

एकीकडे भारतासोबतचे संबंध 'रिसेट' होऊ शकतात, अशी भूमिका खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतली असताना नवारो आगीत तेल ओतत असल्याने दोन्ही बाजूंनी संभ्रमाचे वातावरण तयार होऊ लागले आहे. नवारो यांचा इतिहासही फारसा चांगला नाही. काँग्रेसने घेतलेल्या निर्णयाचा अनादर केला म्हणून त्यांना चार महिने तुरुंगवासाची शिक्षाही सुनावण्यात आली आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातही ते व्हाईट हाऊसमध्ये कार्यरत होते. त्यावेळी चीनविरोधात त्यांनी आघाडीच उभारली होती. जानेवारी २०२१ मध्ये अमेरिकेत मोठी दंगल उसळली होती. घटनेची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या हिंसाचारप्रकरणी नवारो यांच्याकडे पुराव्यांची मागणी केली होती. काँग्रेसने नियुक्त केलेल्या या समितीच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयाने शिक्षा सुनावली. राष्ट्रपतींच्या वरिष्ठ सहकाऱ्याला शिक्षा सुनावण्याची २००८ नंतरची ही पहिलीच घटना होय.

नवारो आणि उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे दोन्ही देशांतील संबंधात गेल्या दीड महिन्यांपासून तणाव निर्माण झाला असतानाच एक असाही गट सक्रिय आहे की जो मध्यस्थांच्या मार्फत संबंध सुरळीत करण्यावर भर देत आहे. म्हणूनच ट्रम्प यांनी मोदी हे महान नेते आहेत, असे वक्तव्य काही दिवसांपूर्वी केले आहे. ट्रम्प यांनी व्यक्त केलेल्या भावनेचा आदर आहे. त्यांनी दोन्ही देशांतील भागीदारीबद्दल केलेल्या सकारात्मक मूल्यांकनाला आणि दोन देशांमधील विशेष नात्याबद्दल केलेल्या कौतुकाला आपण पूर्ण प्रतिसाद देत असल्याची भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. परिणामी दोन्ही देशांमधील तणाव कमी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. संबंध 'रिसेट' होण्यामागे लॉबिस्ट जेसन मिलर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यांनी वॉशिंग्टनमध्ये थेट ट्रम्प यांची भेट घेत संबंधातील कटुता कमी होत असल्याचे संकेत दिले आहेत. मिलर हे एका लॉबिंग फर्मचे प्रमुख आहेत. दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध पुढे जावेत म्हणून भारताने त्यांची नियुक्ती १० मे रोजीच केली होती.

अमेरिकेत लॉबिंग परंपरा फार जुनी आहे. जवळपास १९५० पासून अमेरिकेत लॉबिस्ट नेमण्याची परंपरा सुरू आहे. भारतीय दूतावासाने परिस्थितीनुसार वेळोवेळी लॉबिंग फर्म नेमल्या आहेत. २००७ मधील आण्विक कराराच्या काळातही भारताने अशाच फर्मची मदत घेतली होती. भारताने अमेरिकेच्या दबावापुढे न झुकता आणि उलट व्यापारशुल्क न आकारता वेट ॲण्ड वॉचची भूमिका घेतली आहे. जगातील सर्वांत मोठी महाशक्ती असलेल्या देशासमोर भारत भक्कमपणे पाय रोवून उभा ठाकल्याने जगही आश्चर्यचकित झाले आहे. ही परिस्थिती फार काळ चालणार नाही याची जाणीव असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळे ज्या निर्यातदारांना तोटा सहन करावा लागणार आहे त्यांच्यासाठी उपाययोजना करणे सुरू केले आहे. कापड, रत्ने, कोळंबी, पादत्राणे, विद्युत आणि यांत्रिक यंत्रसामग्री निर्मिती क्षेत्रातील निर्यातदारांसाठी लवकरच आर्थिक मदत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी दिली आहे. अर्थात भारताने दीर्घ आर्थिक लढ्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले आहे.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# नव्या मैत्रीची अमेरिकेला धास्ती

चीनने गेल्या आठवड्यात आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीला ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित लष्करी परेडमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारो किलोमीटर अंतरावर वॉशिंग्टन डीसीमध्ये उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पदेखील यावर लक्ष ठेवून होते. ते म्हणाले की, मी ते पाहावे अशी त्यांची इच्छा होती आणि मी ते खरोखर पाहत होतो. तियानमेन चौकात झालेल्या या भव्य समारंभाबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी तपशीलवार काहीही सांगितले नाही; परंतु त्यांनी 'खूप, खूप प्रभावी' असे वर्णन केले. दुसरीकडे, ट्रम्प आणि उर्वरित जगासाठी चीनचा संदेश अगदी स्पष्ट होता. तो संदेश असा होता की, जगात एक नवीन शक्ती-केंद्र तयार होत आहे. ते शंभर वर्षे जुन्या अमेरिकन वर्चस्व व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. ही लष्करी परेड आयोजित केली जात होती, त्या दिवशी ट्रम्प ओव्हल ऑफिसमध्ये पोलंडच्या राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरात्स्की यांना भेटत होते. त्या वेळी ते चीनच्या या लष्करी परेडबद्दल जास्त काही बोलले नाहीत. चीनसोबतच्या 'टॅरिफ वॉर' दरम्यान घडलेल्या घटनांबद्दल ट्रम्प यांच्या विधानांमध्ये उदासीनता, तक्रार आणि चिंता यांचे मिश्रण स्पष्टपणे दिसून येत होते. परेडबद्दल ट्रम्प निष्काळजी दिसले. त्यांनी सांगितले की, दोन डझनहून अधिक राष्ट्रप्रमुखांसमोर चीन करत असलेल्या शक्तिप्रदर्शनाची चिंता नाही. तथापि, चीन दुसऱ्या महायुद्धातील योगदानाचे श्रेय अमेरिकेला देत नाही, याबद्दल त्यांनी तक्रार केली. तुम्ही अमेरिकेविरुद्ध कट रचत असताना कृपया पुतिन आणि किम जोंग उन यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा कळवा, असे ते उपहासाने म्हणाले. एकंदरीत, इतर राष्ट्रांचे एकत्र येणे ट्रम्प यांना अस्वस्थ करत आहे.

ट्रम्प यांना परेड आणि लष्करी शक्तीच्या प्रात्यक्षिकांबद्दल विशेष प्रेम आहे. गेल्या महिन्यात त्यांनी अलास्कामध्ये पुतिन यांचे रेड कार्पेटवर स्वागत केले. त्यांच्या डोक्यावरून स्टेल्थ बॉम्बर आणि अमेरिकन जेट उडत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी अमेरिकन सैन्याच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त वॉशिंग्टनमध्ये लष्करी परेडचे आयोजन केले होते. चीनची नवीनतम लष्करी परेड उच्च तंत्रज्ञानाची शस्त्रे आणि शिस्तबद्ध मार्चिंगसाठी ओळखली गेली. त्या तुलनेत अमेरिकेच्या लष्करी इतिहासाची आठवण करून देणारी अमेरिकन परेड ही एक सामान्य घटना होती. तिथे दुसऱ्या महायुद्धात वापरले जाणारे टँक आणि क्रांतिकारी काळातील सैनिक व्हाईट हाऊसजवळील कॉन्स्टिट्यूशन अव्हेन्यूवर आरामात फिरताना दिसले. ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या घोषणेवर आधारित ही एक प्रकारची आठवणींना उजाळा देणारी घटना होती. अमेरिकेच्या गौरवशाली इतिहासाकडे मागे वळून पाहताना आणि या



कार्यक्रमाद्वारे ट्रम्प १९ व्या शतकातील त्या काळाची आठवण करताना दिसले. त्याला ते 'अमेरिकन इतिहासातील सर्वांत महान युग' म्हणतात.

चीनच्या लष्करी परेडमध्ये त्याची भविष्यातील शस्त्रे प्रदर्शित करण्यात आली आणि तेथील कम्युनिस्ट सरकारने हेदेखील दाखवण्याचा प्रयत्न केला की दुसऱ्या महायुद्धात फॅसिझम आणि साम्राज्यवादाला पराभूत करण्यात चीनने मोठी भूमिका बजावली. त्या युद्धाने तथाकथित 'अमेरिकन शतका'ची सुरुवात केली असेल, तर चीन आता नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी होईल, असा त्यांचा दावा आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांचे सहायक असलेले रिचर्ड विल्की म्हणाले की, दुसऱ्या महायुद्धात जपानच्या पराभवात चिनी राष्ट्रवादी आणि अमेरिकन सैन्याचे योगदान चिनी कम्युनिस्ट सैन्याच्या योगदानापेक्षा जास्त होते. तथापि, या आठवड्यात चीनची लष्करी परेड हे अमेरिकेला चिंता करण्याचे एकमेव कारण नव्हते. याशिवाय अमेरिकन धोरणकर्त्यांना चिंता वाटावी, अशी आणखी बरीच कारणे होती. तियानजिनमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दरम्यान, चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे एक मोठे कारण म्हणजे ट्रम्प यांनी भारतावर लादलेले शुल्क. त्याचा भारत आणि अमेरिकेतील मैत्रीवर विपरीत परिणाम झाला आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे जगाचे आर्थिक आणि राजकीय ध्रुवीकरण बिघडले आहे. प्रतिस्पर्धी मानले जाणारे चीन, रशिया आणि भारत हे देश बदललेल्या परिस्थितीत एकत्र कसे येऊ शकतात याचे एक उत्तम उदाहरण आहे.

ट्रम्प यांनी अमेरिकन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आणि सरकारसाठी नवीन महसूल उभारण्यासाठीच्या योजनेचा एक भाग म्हणून शुल्कांचे समर्थन केले आहे. ट्रम्प समर्थित 'अमेरिका फर्स्ट फॉरेन पॉलिसी इन्स्टिट्यूट' मधील अमेरिकन सिक्युरिटीचे सह-अध्यक्ष रिचर्ड विल्की म्हणतात, कोरियन, जपानी, फिलिपिन्स आणि व्हिएतनामी लोकांना हे चांगलेच ठावूक आहे की खरा धोका त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापार भागीदारीतील किरकोळ अडथळे नसून चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा आहे. ट्रम्प अनेकदा इतर देशांमधील संघर्ष आणि चिंतांबद्दल उदासीन राहिले आहेत. त्याबाबत मदत करत नाहीत. त्याऐवजी ते ग्रीनलॅण्ड, पनामा आणि कॅनडासारख्या भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ असलेल्या देशांमधील समस्यांबद्दल उत्सुकता दाखवत आहेत. विजय दिनाच्या परेडमध्ये चीनने जगाला आपले लष्करी सामर्थ्य दाखवले. त्यातून लक्षात आले की, ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांमुळे अमेरिकेचा विजय होण्याऐवजी अपयश येण्याचा धोका आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अमेरिकाकेंद्रित व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून लादलेले शुल्क अमेरिकन न्यायालये रद्द करू शकतात. नव्हे, तशी चिन्हे वाढत आहेत. गेल्या आठवड्यात एका अपील न्यायालयाने निर्णय दिला की, ट्रम्प यांचे बरेच शुल्क संघीय कायद्याच्या चुकीच्या अर्थ लावण्यावर आधारित होते; पण ट्रम्प यांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प यांचे समर्थक मानले जाणारे रूढिवादी न्यायाधीशांचे वर्चस्व असले, तरी काँग्रेसच्या परवानगीशिवाय प्रमुख धोरणे अंमलात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रपतींविरुद्ध त्यांनी खूप कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या शुल्कांवर ते सौम्य भूमिका घेतील, अशी शक्यता कमी आहे. व्यापाराच्या बाबतीत ट्रम्प नेहमीच त्यांच्या मनाचे ऐकत आले आहेत. त्यांनी अनेक पारंपरिक धोरणे बदलली असून नवीन व्यापारी भागीदार बनवले आहेत. ट्रम्प यांनी दावा केला आहे की, त्यांचे व्यापार धोरण अमेरिकेला 'दुसऱ्या सुवर्णयुगाकडे' घेऊन जाईल; पण तियानमेन चौकातील चिनी लष्करी परेड असो किंवा अमेरिकन न्यायालये; ट्रम्प यांच्या शुल्कामुळे निर्माण झालेला धोका काल्पनिक नाही, तर वास्तविक आहे. भारताच्या वृत्तीबद्दल ट्रम्प यांची चिडचिड वाढत असल्याचे दिसून आले. एकीकडे भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकला नाही, तर दुसरीकडे अमेरिका आपल्या देशातच अनेक समस्यांनी वेढली गेली आहे. असे असूनही, ट्रम्प यांची हेकेखोरी कायम होती; परंतु आता त्यांना वास्तवाची जाणीव झाली असावी. त्यामुळे अगोदर त्यांनी चीनमुळे भारत, रशियासारखे मित्र आम्ही गमावले, असे म्हटले होते. त्यानंतर दोनच दिवसांमध्ये त्यांनी भारताचे आणि मोदी यांचे कौतुक केले. भारत आणि अमेरिका यांच्यात एक विशेष संबंध आहे. इतकेच नाही, तर त्यांनी आपण नेहमीच मोदी यांचे मित्र राहू असे म्हटले. ट्रम्प यांचे बदललेले सूर पाहता भारताच्या दबावाच्या परराष्ट्रनीतीचा परिणाम झालेला दिसतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# नव्या पिढीचे तंत्रज्ञान उद्योग आणि वास्तव

आधुनिक युगात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर उद्योगांसाठी आवश्यक बनला आहे. डिजिटल साधनांचा वापर करून उद्योजक कमीत कमी वेळेत जास्त मूल्यवर्धन करू शकतात. जग अधिक तंत्रज्ञान आधारित होत असताना डिजिटल क्षेत्रात कंपन्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा शिरकाव फक्त आपल्याला अपडेट ठेवण्यासाठी राहिला नाही, तर तो व्यक्तिमत्त्व घडवणारा आणि बदल घडवणारा घटक बनला आहे. नव्या पिढीचे वागणे, विचार करणे, निर्णय घेणे हे सगळे सोशल मीडियाच्या ट्रेंडवर आधारित झाले आहे. प्रत्येक गोष्टीत झटपट यश हवे. प्रत्येक प्रयत्नामागे तत्काळ पैसे हवेत अशी मानसिकता तयार होत चालली आहे. हेच आपल्या देशातील तरुणाईच्या व्यवसाय क्षेत्रातील दृष्टिकोनावरही स्पष्टपणे उमटवत डिजिटल उद्योगांना चालना देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनेक योजना राबवत आहेत. जसे की डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबवल्या जाणाऱ्या योजना. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातूनही विविध योजना जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत राबवल्या जातात. केंद्र सरकारच्या डिजिटल इंडिया या योजनेअंतर्गत उद्योजकांना डिजिटल साधनांचा वापर करून व्यवसाय वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही एक केंद्र सरकारची योजना आहे. उद्योगांच्या स्थापनेसाठी आर्थिक मदत प्रोत्साहन देते. या योजनेअंतर्गत डिजिटल उद्योगांसाठी अर्ज करता येतो. जिल्हा उद्योग केंद्रांच्या माध्यमातून केंद्र सरकार लहान आणि मध्यम उद्योगांना आवश्यक त्या सेवा, सुविधा आणि आर्थिक साहाय्य पुरवते. यामध्ये डिजिटल उद्योगांचाही समावेश आहे. डिजिटल उद्योगाची कास म्हणजे डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून व्यवसायाची प्रगती करणे, नवीन संधी शोधणे, कार्यक्षमतेत वाढ करणे. तरुणांसाठी अनेक उद्योग संधी उपलब्ध आहेत. ज्यामध्ये तंत्रज्ञान आधारित कृषी आणि अन्न प्रक्रिया, पर्यटन, सेवा क्षेत्र, अक्षय ऊर्जा यांचा समावेश आहे. या संधी शोधण्यासाठी तरुणांनी आपली आवड, कौशल्ये ओळखून बाजारपेठेतील मागणीचा अभ्यास करावा तसेच सरकारी योजना, आर्थिक मदत आणि प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. जगातील जवळजवळ ९० टक्के तरुण विकसनशील देशांमध्ये राहतात. यातील जवळजवळ एक अब्ज तरुण पुढील १० वर्षांत नोकरीच्या बाजारात प्रवेश करतील. या तरुणांना अर्थपूर्ण आर्थिक संधी मिळतील याची खात्री करणे, गरिबी कमी करण्यासाठी सुरक्षित स्थिर समाज सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे.

आज पदवी घेण्याच्या आधीच किंवा अनेकदा महाविद्यालयात शिकत असतानाच अनेक तरुण सोशल मीडियावरील एखादा प्रेरणादायी व्हिडीओ बघतात. त्यातून प्रभावित होतात. स्टार्टअप सुरू करण्याची स्वप्न पाहतात किंवा लगेचच व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतात. ते कुठल्याही क्षेत्रात- जसे की ग्राफिक डिझायनिंग, व्हिडीओ एडिटिंग, डिजिटल मार्केटिंग किंवा कंटेंट क्रिएशन थोडे फार शिकतात आणि मार्केटमध्ये उतरतात. सुरुवातीला या क्षेत्रांमध्ये काही प्रमाणात प्रतिसादही मिळतो, कारण आजच्या जगात नवीन हेच आकर्षण आहे. पण या सगळ्यामागे अनुभवाचा, परिपक्वतेचा आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव असतो. व्यवसाय हा केवळ एक कल्पना, गुणवत्ता किंवा इंटरनेटवर बघितलेली यशोगाथा नसते. व्यवसाय म्हणजे दीर्घकाळ टिकणारी सेवा, संबंध आणि विश्वासाचे जाळे असते. ती केवळ एक व्हिडीओ बघून किंवा दोन प्रोजेक्ट करून तयार होत नाही. यासाठी सातत्य, धीर, वेळ आणि अनुभवातून आलेल्या परिपक्वतेची गरज असते. व्यवसायात टिकून राहण्यासाठी शिस्त, नम्रता आणि नवीन शिकण्याचा संस्कार असावा लागतो. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश मानला जातो. ३५ वर्षांखालील लोकसंख्या ६५ टक्क्यांहून अधिक आहे. या मोठ्या लोकसंख्येला डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हटले जाते. म्हणजेच योग्य शिक्षण, प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास ही तरुणाई देशाला आर्थिक महासत्ता बनवू शकते. आजचा काळ तंत्रज्ञानाचा आहे. उद्योग, व्यापार, शिक्षण, शेती, प्रशासन, मनोरंजन, आरोग्य, जीवनाचा प्रत्येक भाग डिजिटल माध्यमांवर चालतो. यालाच आपण डिजिटल उद्योग म्हणतो. या उद्योगाने तरुणांसाठी अनंत संधी निर्माण केल्या आहेत. मात्र या सोबत आव्हाने आणि धोकेसुद्धा आहेत. त्यामुळे या विषयाकडे केवळ आशावादाने नाही, तर वास्तवदृष्टीने पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील तरुणांकडे शिक्षण, कल्पकता, मेहनत करण्याची ताकद आहे. योग्य नियोजन, डिजिटल साक्षरता शासनाचे पाठबळ मिळाल्यास महाराष्ट्रातील तरुण डिजिटल उद्योगात देशाचे नेतृत्व करू शकतात.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# मत्स्योत्पादनातील संधी, धोरणात्मक विकास

भारताला लाभलेला विस्तीर्ण समुद्र किनारा व त्याशिवाय देशांतर्गत मोठ्या नद्या, तळी व पाणवठ्यातून सुरू असणारे गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन आणि त्याला मिळालेली मत्स्यव्यवसायाशी संबंधित कसबी कौशल्य, यामुळे आपल्या मत्स्यव्यवसायाला सुगीचे दिवस लाभले आहेत.

सद्यःस्थितीत देशातील मासळी उत्पादन मत्स्यव्यवसाय मोठ्या गतीने विकसित होत आहेत. मासेउत्पादन हा विशेषतः सागरी किनाऱ्यावर पण मोठ्या प्रमाणात परंपरागत समजल्या जाणाऱ्या व्यवसायाला दरम्यानच्या काळात प्रगत स्वरूप प्राप्त झाले. विविध प्रकारच्या व महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांमुळे या व्यवसायाची रोजगारसंधींच्या संदर्भातील उपयुक्तता देखील सिद्ध झाली आहे.

प्रचलित अंदाजानुसार, मत्स्यव्यवसाय क्षेत्रात प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे तीन कोटी रोजगार-स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. याशिवाय, मत्स्यव्यवसायाशी निगडित पूरक उद्योगांमध्येसुद्धा विविध रोजगार-व्यवसायसंधी उपलब्ध आहेत. याला जोड मिळत गेली, ती सरकारी धोरणे आणि आर्थिक धोरणात्मक पाठबळाची. यातून विविध व्यावसायिक बदल, तंत्रज्ञानाचा स्वीकार व मत्स्यनिर्यात यांसारखे प्रयोग यशस्वीपणे राबविले जात आहेत. थोडक्यात म्हणजे, भारताच्या ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक उलाढालीत मत्स्यव्यवसायाचे आता महत्त्वपूर्ण स्थान आणि योगदान राहिले आहे. आपल्या मत्स्यव्यवसायाच्या संदर्भात झालेला मोठा व महत्त्वाचा बदल म्हणजे, कधीकाळी खाण्यासाठी व पोटासाठी विशिष्ट लोकांसाठी असणाऱ्या या व्यवसायाला आता विज्ञान-तंत्रज्ञान व संशोधनासह व्यवसाय-व्यापाराच्या संदर्भात अद्ययावतता प्राप्त झाली आहे. याचे प्रत्यंतर आता खाऱ्या-गोड्या या दोन्ही प्रकारच्या पाण्यातील मासेमारी व्यवसायांत येताना दिसते. मुख्य म्हणजे, त्याला आता अनेक पूरक व महत्त्वाच्या व्यवसायांची जोड लाभली आहे. त्याशिवाय समुद्रतटाप्रमाणेच ग्रामीण भागातील अल्पभूधारक व शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होतो. मासेमारीशी संबंधित सर्वांच्या आर्थिक स्थितीतही त्याचे सकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात. यामध्ये प्रत्यक्ष मत्स्योत्पादन, मासेमारी, त्यांची साठवण, प्रक्रिया व वाहतूक यामुळे फार मोठ्या संख्येतील युवकांपासून महिलांपर्यंत सर्वांना बारमाही उदरनिर्वाहाचे साधनच नव्हे, तर घरगुती व छोट्या-मोठ्या स्वरूपाचे व्यवसाय उपलब्ध होऊ लागले, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यासंदर्भात केंद्र सरकारच्या नव्या धोरणात्मक निर्णयांद्वारे मासेमारीच्या धोरणांतर्गत राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय मत्स्यपालन, पशुपालन व दुग्धोत्पादन खात्याचे मंत्री राजीव रंजन सिंह यांनी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत मासेमार व मत्स्योत्पादन क्षेत्रासाठी राष्ट्रीय स्तरावर १६ विशेष योजनांची घोषणा केली आहे. याचे परिणाम आता दिसू लागले आहेत.

यामध्ये देशपातळीवर ३४ मत्स्यपालनाला पूरक-पोषक स्वरूपाचे १४ विशेष विभाग विशेष अभ्यासानंतर बनविण्यात आले आहेत. यामध्ये देशभरातील नद्या व तळ्यांशिवाय पहाडी लडाखपासून सुदूर मेघालयात उपलब्ध असणाऱ्या व उत्पादित करता येणाऱ्या मत्स्योत्पादन व त्यावरील संशोधनासह त्याला अधिक उत्पादक व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनविण्यावर योजनापूर्वक भर देण्यात आला. मुख्य म्हणजे, यामध्ये भातशेतीसारख्या पाणवठ्यासह करण्यात येणाऱ्या शेती व शेततळ्यांचा कल्पकपणे समावेश करण्यात आला आहे. देशात फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या भातउत्पादक शेतकऱ्यांना या प्रयत्नांचा मोठा व दूरगामी स्वरूपात लाभ होऊ घातला आहे.

या नव्या व प्रस्तावित मत्स्योत्पादन केंद्रांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याद्वारे निर्माण होणाऱ्या रोजगार-स्वयंरोजगारांच्या मोठ्या संधी. या संधींचा लाभ प्रामुख्याने पिढीजात मासेमार, या क्षेत्रात नव्याने दाखल होणारे युवक, मासेमार सहकारी संस्था, महिला अल्पबचत गट, मत्स्यउद्योगातील स्टार्टअप संस्था नाबार्डद्वारा पुरस्कृत संस्था, मत्स्यउत्पादन, प्रक्रिया, बारमाही साठवण व वाहतूक क्षेत्रात उपलब्ध झाल्या आहेत अथवा होऊ घातल्या आहेत.

मासेमार क्षेत्रात केंद्र व राज्य सरकार, मासेमार संस्था व त्यांच्याशी संबंधित सहकारी व वैयक्तिक प्रयत्नांचे फलित आता दृश्य स्वरूपात आलेले दिसते. गेल्या दोन दशकांतील या संदर्भातील आकडेवारीसह सांगायचे झाल्यास, २००४ मध्ये देश पातळीवर असणाऱ्या मत्स्योत्पादनाचे ६३.९९ लाख टन असणारे प्रमाण २०१४ मध्ये ९५.७९ लाख टन, तर आता म्हणजे २०२४ मध्ये १८४.०२ लाख एवढे लक्षणीय स्वरूपात वाढले आहे.

मत्स्यपालन-मत्स्योत्पादनाच्या संदर्भात भारत आज जगात दुसऱ्या स्थानावर आहे. जगातील एकूण मत्स्यव्यवसायातील आठ टक्के उत्पादन हे भारतात होते. याशिवाय, गोड्या पाण्यातील मासेउत्पादनात तर भारताने जगात पहिला क्रमांक मिळविला आहे. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे, गेल्या दशकात शासन स्तरावर अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांचा करण्यात आलेला पाठपुरावा. यामध्ये पुढील धोरणांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

**प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना :** सन २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत २० हजार कोटी उलाढाल केवळ पाच वर्षांत झाली आहे. योजनेमध्ये आजवर दोन हजारांपेक्षा अधिक मासेमार सहकारी संस्थांसह ४.५ लाख किसान क्रेडिटकार्डधारक मासेमार सहभागी झाले आहेत.

**नील-क्रांती योजना :** देशाच्या सागरी किनाऱ्याप्रमाणेच लहान-मोठ्या नद्या, तळे, पाणवठे, धरणे इ. ठिकाणीपण तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर मत्स्यपालनाला गतिमान करणे व त्याद्वारा ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देऊन त्याद्वारे रोजगार-स्वयंरोजगार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता.

**मत्स्यपालन व्यवसाय विकासनिधी :** केवळ मासेमारीपुरतेच मत्स्यव्यवसायाला मर्यादित न ठेवता, त्याच्याशी संबंधित महत्त्वाच्या अशा अप्रत्यक्ष व्यवसायांद्वारे विविध संधी उपलब्ध व्हाव्या, यासाठी सर्वप्रथम २०१८ मध्ये ७ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

**विविध व मोठ्या रोजगारसंधी :** आज भारताच्या मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून मत्स्यउत्पादन, शीतगृह संचालन, मत्स्यप्रक्रिया, मत्स्यबीजनिर्मिती, विक्री-व्यवसाय व मत्स्यनिर्यात इ. क्षेत्रांत रोजगारांच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. त्याशिवाय मत्स्योत्पादन क्षेत्रासाठी आवश्यक व पूरक अशा व्यवसाय, व्यवस्थापन, वाहतूक इ. क्षेत्रांत तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर रोजगार-स्वयंरोजगार उपलब्ध झाले आहेत, हे विशेष.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिक व भूमाफिया


आपले स्वतःचे घर बांधू, या आशेने अनेक ज्येष्ठ नागरिकांनी अनेक वर्षांपासून आपले मेहनतीने कमावलेले पैसे जमीन खरेदीत गुंतवले. याचाच फायदा भूमाफियांनी घेत अनेक ज्येष्ठांना फसवून स्वतःच्या तुंबड्या भरल्याची अनेक प्रकरणे नागपुरात अनेक वर्षांपासून न्यायप्रविष्ट असल्याचे दिसते. कधी जमीन विकत घेण्यासाठी तर कधी हाऊसिंग सोसायटीच्या बहाण्यापोटी पैसे जमा करून आपले नातलग त्यात घुसवून, त्यावर आपली पकड बसवून नागरिकांना लुबाडणे व प्रकरण न्यायप्रविष्ट झाले तर वकिलांच्या मदतीने न्याय देण्यात विलंब करणे, अशी कार्यप्रणाली गुन्हेगारांनी अवलंबून अनेक ज्येष्ठ नागरिकांवर अन्याय केला आहे. आपल्या मालकीच्या घरांची स्वप्ने पाहत कित्येक ज्येष्ठ नागरिक देवाघरी गेले की या भूमाफियांचे फावते, कारण त्यांच्या वारसांना याबद्दल विशेष माहिती नसते किंवा आवश्यक ती कागदपत्रे प्रविष्ट करण्यात ते कमी पडतात. अशी प्रकरणे विलंबित होण्यास न्यायालये व सरकार दरबारी असलेली निष्क्रियत तात. याबद्दल 'गुंठेवारी'सारखे कायदे सुद्धा आहेत. पण वकिलांना हाताशी धरून हे 'हुशार' माफिया निकाल यायला उशीर कसा होईल व आपण कसे सहीसलामत राहू, याचाच प्रयत्न करतात. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकरणाचा त्वरित निपटारा करण्यासाठी एक खास आयोग नेमावा व ज्येष्ठांना न्याय द्यावा. मुख्यमंत्री याबाबतीत जातीने लक्ष घालतील व असमर्थ ज्येष्ठ नागरिकांना त्वरित न्याय मिळवून देतील, ही एकमेव आशा आहे.

**गणेश हजारे**

●● ●●

### ध्वनिप्रदूषणाबाबत सरकार खरेच गंभीर आहे का?

नुकताच महाराष्ट्रात गणेशोत्सव अत्यंत उत्साहात साजरा झाला. या गणेशोत्सवात राज्य सरकारतर्फे ध्वनिक्षेपक वापराची परवानगी रात्री १२ वाजेपर्यंत वाढवून देण्यात आली होती. गणपती विसर्जन मिरवणुकीत बऱ्याच मंडळांनी डीजेचा उपयोग केला. पुणे-मुंबईसारख्या शहरात जिथे गणपतीची मिरवणूक २०-२२ तास चालते अशा ठिकाणी रात्री १२ वाजता डीजे बंद करून पुन्हा सकाळी ६ वाजता सुरू करून मिरवणूक निघाली. ध्वनिप्रदूषणाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी असे सरकारला वाटते, पण दुसरीकडे सरकार तरुणाई खुश व्हावी म्हणून ध्वनिक्षेपक वापर करण्याची रात्री १० पर्यंतची वेळ २ तास वाढवते हे अनाकलनीय आहे.



**मोहन पांडे**

●● ●●

### थोडे ज्येष्ठांकडेही लक्ष द्यावे

केंद्र सरकार शोषित, पीडित, वंचित मध्यम वर्गीयाची सतत चिंता करीत आले आहे. या वर्षीच्या दसरा, दिवाळीच्या शुभमुहूर्तावर जीएसटीमध्ये केलेली सुधारणा हा त्यातलाच एक भाग आहे. बहुतेक सर्व जीवनावश्यक वस्तूंवर लावण्यात आलेला जीएसटी १८ टक्क्यांवरून सरसकट ५ टक्क्यांवर आणण्याचा निर्णय मध्यमवर्गीयांना देखील दिलासा देणारा आहे. त्यामुळे यापुढे जीवनावश्यक वस्तू कमी दरात मिळतील. दसरा, दिवाळी आनंदाने साजरे करता येतील. पंतप्रधान आणि अर्थमंत्री अभिनंदनास पात्र आहेत. वर्ष २०१४ पासून ईपीएस ९५ अंतर्गत लाखो कामगारांना एक हजार रुपये प्रति माह निवृत्ती वेतन मिळत आहे. त्यात सुधारणा व्हावी यासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. ७ व्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार किमान निवृती वेतन प्रति माह ९ हजार रुपये मिळायला पाहिजे. मोहिनी गिरी आयोगाने देखील सर्वांना निवृत्ती वेतन मिळायला पाहिजे अशी शिफारस केली आहे. असे असताना गत ११ वर्षांपासून केवळ १ हजार रुपये निवृत्ती वेतन देणे अन्यायकारक नाही का? कोविड १९ च्या कार्यकाळात ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे भाड्यात मिळणारी सवलत बंद करण्यात आली. कोविड आला आणि गेला. पण मिळणारी सवलत जी त्यावेळी बंद झाली ती आजही बंदच आहे. भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.९० कोटी आहे. त्यातले किमान ७० टक्के ज्येष्ठ नागरिक गरिबी रेषेखाली जीवन जगत आहे. ही आकडेवारी ज्येष्ठ नागरिकांच्या वैयक्तिक उत्पन्नावर आधारित आहे. त्यांना प्रवास भाड्यात मिळणारी सवलत बराच दिलासा देणारी ठरणार आहे. वरील दोन विषय केंद्र सरकारच्या अधिकार क्षेत्रातील आहेत. काही वर्षांपासून प्रलंबित आहेत. केंद्र सरकारला विनंती आहे की वरील मागण्यांकडे त्वरित लक्ष घालून दसरा, दिवाळीपूर्वी योग्य ती कार्यवाही करावी आणि लाखो ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा पदरी पाडून घ्यावात.

**वसंत पिंपळापुरे**

जळगाव तरुण भारत
प्रारंभ :१९९६
www.tarunbharatjalgaon.com



## थोडक्यात महत्वाचे...

### फैजपूरला ईदनिमित्त १०६ दात्यांचे रक्तदान

**फैजपूर (ता. यावल)** : यूथ मूव्हमेंट शाखेकडून ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त ५ सप्टेंबरला रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात १०६ दात्यांनी रक्तदान केले. रक्तदानामुळे एका गरजूचा जीव वाचवता येऊ शकतो, असा संदेश देण्यात आला. जमात-ए-इस्लामी हिंदचे अध्यक्ष रउफ जनाब, सपोनि रामेश्वर मोताळे यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन व दात्यांचा सत्कार करण्यात आला.



सपोनि रामेश्वर मोताळे, उपनिरीक्षक सय्यद मोमीन, डॉ. प्रा. राजेंद्र राजपूत, माजी नगरसेवक कलीम खान, माजी प्रभारी नगराध्यक्ष शेख कुर्बान ,मालक आबिद, डॉ. इम्रान रऊफ यांची प्रमुख उपस्थिती होती. संजीवनी ब्लड बँकेने रक्त संकलित केले. अध्यक्ष अब्दुल जलील, सचिव शेख मोईन, शेख जावेद, शेख साजिद, शेख वसीम, शेख एजाज यांनी सहकार्य केले.

### मुक्ताईनगरात डीवायएसपी ढवळे रुजू

**मुक्ताईनगर** : गेल्या सहा महिन्यांपासून मुक्ताईनगर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे पद रिक्त होते. आता नव्याने नाशिक येथून पदोन्नतीवर आलेले सुभाष ढवळे यांनी मुक्ताईनगर उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून पदभार घेतला. यावेळी उपविभागीय कार्यालयात पोलीस निरीक्षक आशिष आडसूळ यांनी ढवळे यांचे स्वागत केले. यावेळी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.





### लेवा पाटीदार मंडळ गणपती स्पर्धा निकाल घोषित

**फैजपूर (ता. यावल)** : बदलापूर येथीलन लेवा पाटीदार समाज मंडळाने आयोजित केलेल्या श्री गणेशोत्सव २०२५ घरगुती गणपती डेकोरेशन ऑनलाइन अपलोड स्पर्धेमध्ये ३५ समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला, त्यास समाजातील बांधवांनी पसंती देऊन तीन स्पर्धकास सर्वाधीक पसंती देऊन विजयी केले. प्रथम क्रमांक - आदित्य झोपे, द्वितीय क्रमांक - कुंदन रमेश फेगडे, तृतीय क्रमांक- दीपक गिरधर पाटील यांनी मिळविला. विजेत्यांचे सर्व समाज बांधवांकडून तसेच मंडळाच्या कार्यकारिणी व सल्लागार यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

### 'मुक्ताईचा राजा'चा देखावा ठरला आकर्षण

**मुक्ताईनगर** : नगरपंचायत ग्राउंडवर दरवर्षी नवनवीन व अनोख्या संकल्पना सादर करणारे मुक्ताईचा राजा गणेश मित्र मंडळ यावर्षीही भक्तांच्या मनाला भावेल असा उपक्रम घेऊन आले. मंडळाने भाविकांसाठी अष्टविनायकांचे दर्शन एकाच ठिकाणी घडविले. मंडपात प्रवेश करताच भाविकांना अष्टविनायकांच्या प्रतिकृतींचे दर्शन घेता आले. मयुरेश्वर, सिद्धिविनायक, बल्लाळेश्वर वरदविनायक, चिंतामणी, गिरिजात्मज, विघ्नेश्वर आणि महागणपती या आठही गणपतींच्या प्रतिकृतींनी मंडपात आगळेवेगळे धार्मिक वातावरण निर्माण केले होते. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी या देखाव्याचे कौतुक केले. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वेळी ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक पोशाखात आणि सांस्कृतिक पद्धतीने गणरायाला निरोप देण्यात आला. मिरवणुकीत मोठ्या संख्येने भक्त सहभागी झाले होते. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ''दरवर्षी वेगळ्या संकल्पना आणून समाजात धार्मिक तसेच सांस्कृतिक मूल्य जागविण्याचा आमचा प्रयत्न असतो. यावर्षी अष्टविनायकांचा देखावा साकारण्यात यश आले, यासाठी सर्व नागरिकांचे सहकार्य मोलाचे आहे.''

### ट्रॅक्टरवरुन झोल जावून पडून तरुणाचा मृत्यू

**फैजपूर (ता. यावल)** : श्री मूर्ती विसर्जनासाठीची ट्रॉली न्हावी येथे सोडून परतीच्या प्रवासात न्हावी तोल काट्यानजीक रस्त्यावर स्पीड ब्रेकरवरून ट्रॅक्टर जात असता धुडावर बसल्याने झोल जावून पडल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला. आदित्य तुळशीराम काठोके (वय २२, कासार गल्ली, फैजपूर) असे मयताचे नाव आहे. त्यास डोक्याला जबर दुःखापत झाल्याने तो जागीच ठार झाला. या घटनेने न्हावी, फैजपूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तो तुळशीराम बळीराम काठोके यांचा पुत्र, तर विलास काठोके यांचा पुतण्या होता. त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, भाऊ, काका, काकू असा परिवार आहे.



### धरणगावात श्रीमद संगीतमय भागवत सप्ताह

**धरणगाव** : येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत श्रीमद सुलभ भागवत पारायण तसेच श्रीमद् भागवत कथा निरुपण भक्तिमय वातावरणात उत्साहात हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाले. ३१ ऑगस्ट रोजी श्रीमद् भागवत महामिरवणुकीस श्री बालाजी मंदिरापासून सुरुवात होऊन गावातून श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे संध्याकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. श्रीमद् भागवत सप्ताहातील दैनंदिन विशेष सेवा व उपक्रमात सकाळी सहा वाजता सामुदायिक श्रीमद् भागवत पारायण वाचन तसेच दुपारी २ ते ६ श्रीमद् भागवत संगीतमय निरुपण व महाआरती सप्ताह काळात जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केंद्रात येवून सदिच्छा भेट दिली. सत्ता काळात निरुपण कथेचे विषय थोडक्यात हभप वाल्मिक महाराजांनी आपल्या अमृततुल्यवाणीतून विशद केले. ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता श्रीमद् भागवत निरुपण, ४ वाजता दहीकाला, कीर्तन व महाआरती करीत प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.



# एरंडोल येथे विसर्जन मिरवणुकीत १८ सार्वजनिक गणेश मंडळे सहभागी

### मुस्लिम समाजाने केले स्वागत

**एरंडोल** : शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीत हजारो भाविक सहभागी झाले होते. दुपारी तीन वाजता विसर्जन मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली.पहाटे पाच वाजता शेवटच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले. किरकोळ वादविवाद वगळता मिरवणूक शांततेत पार पडली. विसर्जन मिरवणुकीत १८ सार्वजनिक गणेश मंडळे सहभागी झाली होती.

नगरपालिकेतर्फे जुने पद्मालय,मरीमाता चौक, कासोदा दरवाजा येथे निर्माल्य व मूर्ती संकलन केंद्र सुरु करण्यात आले होते.

दुपारी तीन वाजता शहरातील विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाल्यानंतर पहाटे पाच वाजता शेवटच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले.विसर्जन मिरवणुकीत शहरासह ग्रामीण भागातील हजारो भाविक सहभागी झाले होते.



मिरवणुकीवर ठिकठीकाणी कागदी फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ भाजपतर्फे तसेच भगव्या चौकात पांडवनगरी बहुउद्देशीय संस्थेतर्फे आणि पालिकेसमोर नगरपालिकेच्यावतीने सर्व गणेश मंडळांच्या अध्यक्षांचा सत्कार करून गणेश मूर्तींचे हार घालून स्वागत करण्यात आले व शहरातील मिरवणूक मार्गावर असलेल्या पीर बाबा खुरम यांच्या पंच कमिटी तर्फे गणेश मूर्तींवर पुष्पवृष्टी करण्यात आली. मिरवणुकीत विविध रंगांच्या गुलालाची मुक्तपणे उधळण करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी मिरवणुकीत सक्रिय सहभाग घेतला होता. विसर्जन मिरवणूक सुमारे बारा तास चालली. विसर्जन मिरवणुकीत सर्वत्र पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.मिरवणुकीत माजी नगराध्यक्ष देविदास महाजन, रवींद्र महाजन, राजेंद्र चौधरी, किशोर निंबाळकर, सावता माळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय महाजन, माजी नगरसेवक प्रा.मनोज पाटील, धरणगाव बाजार समितीचे माजी सभापती शालिग्राम गायकवाड, यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमित पाटील, समन्वय समितीचे माजी अध्यक्ष रमेश महाजन, तहसीलदार प्रदीप पाटील, निवृत्त तहसीलदार अरुण माळी, माजी नगरसेवक रुपेश माळी, प्रमोद महाजन, अतुल महाजन, सुरज काबरा, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश महाजन, संदीप बोढरे, अनिल महाजन, संजय महाजन, माजी उपनगराध्यक्ष अशोक चौधरी यांसह विविध राजकीय,सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, व्यावसायिक सहभागी झाले होते.



# नगाव बुद्रूक येथे श्री श्री नैसर्गिक शेती शिबिर

**अमळनेर** : तालुक्यातील नगाव बुद्रूक येथे आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे श्री श्री नैसर्गिक शेती शिबिर ५ ते ७ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आले. शिबिराचे मार्गदर्शन श्री श्री नैसर्गिक शेती विभागीय समन्वयक डॉ. गिरीश बोरसे व रंजना बोरसे (जळगाव) तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक अशोक साबदे यांनी केले. प्रशिक्षक म्हणून प्रा. पोपटराव भराटे, नरेंद्र चौधरी, बी. एन. पाटील, पवनकुमार वाघ (युवाचार्य) यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिरात नैसर्गिक शेतीची सखोल माहिती देत रसायनमुक्त व शून्य खर्चात पौष्टिक पिके घेण्याचे तंत्र शिकवण्यात आले. घरच्या घरी शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा कशा तयार कराव्यात, पर्यावरणाचे (हवा, पाणी, जमीन) प्रदूषण न करता शेती कशी करावी, याविषयी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. यामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्य, आर्थिक, सामाजिक व पर्यावरण विषयक समस्या सोडवण्यास मदत होणार आहे.

याशिवाय नैसर्गिक उत्पादनासाठी स्वतंत्र विक्री व्यवस्था उभी करता येऊ शकते, याबाबतही माहिती देण्यात आली. शिबिरानंतर उपस्थित शेतकऱ्यांनी पिळोदे, गडखांब, अमळगाव येथे असेच शिबिर आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नवल वाघ, कृषी सहाय्यक अधिकारी, गडखांब यांनी परिश्रम घेतले.

# अज्ञात वाहनाची मोटारसायकल धडक, गुलाबवाडी येथील दोघे भाऊ ठार

### रसलपूर-अभोडा रस्त्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, ८ सप्टेंबर**

अज्ञात वाहनाच्या धडकेने तालुक्यातील गुलाबवाडी येथील दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी रसलपूर-अभोडा रस्त्यावर घडली. याबाबत रावेर पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे .

याबाबतचे वृत्त असे की, तालुक्यातील गुलाबवाडी येथील रामदास प्रकाश बारेला (वय १८) व करण प्रकाश बारेला (वय ८) हे दोघे भाऊ मोटार सायकल (क्रमांक एमपी-१०-आर-४७६६) ने रसलपूर येथे नातेवाईकांकडे आले होते. सायंकाळी रसलपूरहून अभोडा मार्गे गुलाबवाडी येथे जात असताना अभोडा गावाजवळील वळणावर एका अज्ञात वाहनाने मोटार सायकलला जोरदार धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात या दोघेही संख्या भावांचा मृत्यू झाला.

याबाबत संजय मडक्या पावरा राहणार गुलाबवाडी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रावेर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघाताचे वृत्त समजतात पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन,पोहेकॉ. जगदीश पाटील, पोहेकॉ ईश्वर चव्हाण, पोलीस इस्माईल तडवी, नितीन सपकाळे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्यांच्यावर येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज महाजन करीत आहेत.

गुलाबवाडी येथील प्रकाश बारेला यांना तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. दोन मुलांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे वृत्त गुलाबवाडी परिसरात पसरतात गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे .

# निंभोरा येथे आजपासून भागवत सप्ताह

### राष्ट्रीय कीर्तनकार गजानन महाराज करणार कथा वाचन

**यावल** : दीपनगर, निंभोरा, ता. भुसावळ येथे वैकुंठवासी निवृत्ती छन्नू चौधरी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ संगीतमय श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा विठ्ठल रुक्मिणी मंदिर निंभोरा बुद्रूक येथे ९ ते १६ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.



या कालावधीमध्ये दैनंदिन श्रीमद् भागवत कथा सकाळी ९ ते ११, दुपारी २ ते ५ या वेळेत कथेचे प्रवक्ते हभप गजानन महाराज धानोरा, वाल्मीक आश्रम चिंचखेडा, जामनेर हे लाभले असून दररोज काकड आरती सकाळी ५ ते ६ .३०, विष्णुसहस्त्रनाम सकाळी ६.३० ते ७.३०, हरिपाठ सायंकाळी ५.३० वाजता व कीर्तन दररोज रात्री ९ ते १० या दरम्यान होईल. काल्याचे कीर्तन मंगळवार (१६ सप्टेंबर) रोजी सकाळी नऊ ते ११ या वेळेत होईल.

यादरम्यान अनुक्रमे हभप मनोज महाराज ओझरखेडा, पंकज महाराज शिरसोली, कैलास महाराज कुरंगी, लक्ष्मण शास्त्री महाराज खेडी-भोकरी, प्रल्हाद शास्त्री महाराज भागवताचार्य सिन्नर, संदीप महाराज विटनेर जळके, ज्ञानेश्वर महाराज जळगाव आणि काल्याचे कीर्तन हभप अनिल महाराज भागवताचार्य कोसगाव यांचे मंगळवार (१६ सप्टेंबर) रोजी काल्याचे कीर्तन तसेच महाप्रसाद १२ ते ३ या वेळेत होईल.

सोमवार (१५ सप्टेंबर) रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थिती द्यावी, असे आवाहन जिजाबाई निवृत्ती चौधरी, वैभव उर्फ राणा निवृत्ती चौधरी, निकिता निवृत्ती चौधरी, गोपीचंद छन्नू चौधरी, चारुशीला गोपीचंद चौधरी, नैतिक गोपीचंद चौधरी, रमाकांत प्रल्हाद चौधरी, ज्योती रमाकांत चौधरी व चौधरी परिवार पिंपरीसेकम-निंभोरा यांनी केले आहे.

### भुसावळातून एकाचा हद्दपारीचा आदेश

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ८ सप्टेंबर**

येथील दीनदयाल नगरमधील रहिवासी संदीप बुधा खंडारे (वय २४) याचा जळगाव जिल्ह्यातून १ वर्षासाठी हदपारीचा आदेश प्रांत जितेंद्र पाटील यांनी पारित केला आहे.

भुसावळ बाजारपेठ पोलिसांनी या व्यक्तीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पाठविला होता.

हा आदेश ८ सप्टेबर रोजी देण्यात आला असून, प्रत जिल्हा पोलीस अधीक्षक व बाजारपेठ पोलीस स्टेशनला पाठविण्यात आली आहे.



# नशिराबादेत आजपासून श्री १००८ भगवान नेमिनाथांचा वार्षिक रथोत्सव

### शेकडो वर्षांची परंपरा

**नशिराबाद** : नशिराबाद येथील मूल नायक श्री १००८ भगवान आदिनाथ दिगंबर जैन मंदिर संस्थानतर्फे सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री १००८ भगवान नेमीनाथ यांच्या ९० वा वार्षिक रथयात्रा महोत्सवाचे आयोजन ९ सप्टेंबर रोजी श्री दिगंबर जैन मंदिर संस्थान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

१९३५ पासून भगवान नेमीनाथ यांच्या भव्य रथ महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. शतक पूर्तीकडे वाटचाल करत असलेले ही परंपरा संपूर्ण नशिराबाद शहराचे आराध्य दैवत आहे या महोत्सवासाठी संपूर्ण पंचक्रोशीतील जैन समाज मोठ्या संख्येने उपस्थित असतो. रथाचे निर्माण पितांबर देवराम शेठ साखरे यांनी केले असून दगडू व सोनू परशुराम पांचाळ व सुतार या कारागिरांनी रथ निर्मितीचे काम केले आहे.

रथाला मोगरी लावण्याची परंपरा वारसानुसार कायम असून झिपरू मिस्तरी, एकनाथ झिपरू मिस्तरी, प्रशांत एकनाथ मिस्तरी यावर्षी मोगरी लावणार आहेत. याठिकाणी प्रथम तिर्थकर भगवान आदिनाथ, भगवान पार्श्वनाथ, भगवान चंद्रप्रभू, भगवान बाहुबली आदी १४ तिर्थकरांच्या प्रतिमा विराजमान आहेत.

**असा असेल धार्मिक विधी**

मंगळवार (९ सप्टेंबर) रोजी सकाळी ८ वा. पूजा व अभिषेक, आरती, स. ९ वाजता कलश यात्रा व भव्य रथोत्सव प्रारंभ, दु. १२ ते १:३० महाप्रसाद, दु. २ ते ५ ध्वजारोहण, मंडपशुध्दी, बोली, श्रीजींचा अभिषेक, संगीतमय कार्यक्रम होणार असून कार्यक्रमास बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन रथ महोत्सव समितीचे अध्यक्ष किरण जैन, उपाध्यक्ष परेश जैन, सचिव गुणवंत जैन तसेच युवा कार्यकर्ते संस्थांचे कार्यकारी अध्यक्ष दिनेश जैन, उपाध्यक्ष मंगेश जैन, सचिव महावीर जैन, सदस्य प्रकाश जैन, विजय जैन, भूषण जैन, वर्धमान जैन, महेश जैन व धीरज जैन, सकल जैन, समाज नव युवक मंडळ सम्यकवर्धिनी महिला मंडळ नशिराबाद यांनी केले आहे.

**शेकडो वर्ष प्राचीन जैन मंदिराचा जीर्णोद्धार**

मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी संत शिरोमणी आचार्य भगवंत विद्यासागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने व परमपूज्य मुनी श्री अक्षय सागरजी महाराज यांच्या प्रेरणेने मंदिराचे लाल पाषाणात निर्माण होत आहे. यासाठी अव्दीतीय कलाकुसरीचा उपयोग केला जात आहे. जीर्णोध्दाराचे कार्य अधिक गतीने होण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन मंदिर जीर्णोद्धार समितीने केलेले आहे

# वरणगावात किसान मंडळाने दाखविले मिरवणुकीत शिवतांडव

**भुसावळ** : तालुक्यातील वरणगाव येथील गणपती बाप्पा विसर्जनानिमित्त किसान मित्र मंडळाने श्री शंकर भगवान, कालिंका माता, हनुमान आणि भगवान भोलेनाथ यांचे सहकाऱ्यांचे जिवंत मूर्तिमंत अघोरी शिव तांडव ठिकठिकाणी मिरवणुकीत सादर केले.

यावेळी गणपतीची मूर्ती २० फुटाची होती. यावेळी शंकर भगवान यांचे देखावे ठीक ठिकाणी सादर केले. अक्षरशः महिला व नागरिकांनी हजारोंच्या संख्येने गर्दी केली होती. या वर्षी किसान मंडळाने अत्यंत जिवंत देखावा सादर केल्याने परिसरात चर्चेचा विषय होता. आदर्श उपक्रम सादर केल्याने तिरंगा समितीच्यावतीने किसान मंडळाचे अध्यक्ष नाना चौधरी, राजू चौधरी यांचा फेटा घालून सत्कार करण्यात आला. या वेळी अध्यक्ष नाना चौधरी यांनी सांगितले की, आमचे मंडळ हे वर्षानुवर्षे सुरू असलेले मंडळ आहे. आज जसे समाजाला अपेक्षित आहे तसेच भगवान शंकर यांच्या इतिहासाची पुनरावृत्ती दाखवत आहे. पुढे सुद्धा असेच वरणगावकरांना अभिप्रेत असणारे उपक्रम राबविण्यात येतील. त्यासाठी वरणगावकरांची साथ महत्त्वाची असल्याचे अध्यक्ष नाना चौधरी यांनी सांगितले. शिवतांडव मिरवणुकीत चेतन पाटील, मंगेश चौधरी, सुनील चौधरी, भूषण पाटील, मयूर झोपे, दीपक चौधरी, विवेक महाजन, संस्कार चौधरी, सोनू कुंभार, वासू कोलते, अमोल चौधरी, ऋषिकेश महाजन, हितेश चौधरी, छोटू चौधरी, नितीन पाटील उपस्थित होते.

# यावल बाजार समितीत विकासकामांना मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ८ सप्टेंबर**

यावल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत विविध विकास कामांची तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली असून लवकरच कामांना सुरुवात होणार असल्याचे सांगण्यात आले.

येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात विविध विकास कामे तातडीने हाती घेण्याची आवश्यकता असल्याने व तशी सर्व शेतकरी बांधवांची मागणी असल्याने तालुक्याचे आमनवत अमोल जावळे यांच्या मार्गदर्शनात बाजार समितीच्या संचालक मंडळ सभेत विविध विकास कामांसाठी ठराव पारित करून प्रस्ताव शासनाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठवण्यात आले होते. या प्रस्तावांस शासनाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्यात येणार असल्याचे बाजार समिती सभापती राकेश फेगडे यांनी सांगितले

**या कामांचा आहे समावेश**

या विकास कामांमध्ये मुख्यतः यावल मुख्य बाजार यार्डात तोल काटा साईडचे सपाटीकरण करून गटारीद्वारे सांडपाण्याचा निचरा करणे, पाण्याची टाकी व पिण्याच्या तसेच वापराच्या पाण्याची सुविधा, ५ हजार स्क्वेअर फुटाचे लिलाव ओटे इत्यादी, तर उपबाजार किनगाव येथे पिण्याच्या व वापराच्या पाण्याची टाकी बांधकाम इत्यादी कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे बाजार समिती स्वनिधीतून करण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करणार असल्याची माहिती सभापती राकेश फेगडे यांनी दिली.

# निस्वार्थ श्रमांच्या बळावर अमळनेरचा श्री मंगळ जन्मोत्सव अविस्मरणीय

### सेवेकरी, विविध संघटनांच्या अथक परिश्रमातून भक्तीरसाळ दर्शन सोहळा

**अमळनेर** : अमळनेरमध्ये २ सप्टेंबर रोजी झालेला श्री मंगळ जन्मोत्सव फक्त भव्य दर्शन सोहळा नव्हता, तर हजारो सेवेकऱ्यांच्या निस्वार्थ श्रमांचे साक्षीदार ठरलेला अद्वितीय अनुभव होता. शहरात तब्बल एक लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले. या यशामागे दिवस-रात्र श्रम करून काम करणाऱ्या स्वयंसेवक, सेवेकरी, पदाधिकारी आणि विविध संघटनांचे योगदान मोलाचे ठरले. सेवेकरी, विविध संघटनांचे पदाधिकाऱ्यांच्या अथक परिश्रमातून भक्तीरसाळ दर्शन सोहळा पार पडला.

भाविकांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधांमध्ये वाहतूक नियंत्रण, पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत, सुरक्षेची काटेकोर व्यवस्था आणि दर्शन व्यवस्थापन या सर्वच बाबतीत सेवेकऱ्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे इतक्या मोठ्या प्रमाणावर आलेले दर्शनार्थी समाधानीपणे उत्सवात सहभागी झाले. महिलांचा पारंपरिक सहभाग, तरुणांचा उत्साह, वयोवृद्धांचा मार्गदर्शनात्मक सहभाग आणि बालकांचा आनंद यामुळे जन्मोत्सवाला वेगळेच रंग चढले. जयघोष, ढोल-ताशे आणि भजनी मंडळांच्या गजराने शहर भक्तिरसाने दुमदुमले.

श्री मंगळ जन्मोत्सव हा अमळनेरच्या भक्तिभावाचा तर सोहळा ठरला, पण त्याहूनही मोठी कहाणी होती ती निस्वार्थ सेवाभावाची. सेवेकऱ्यांच्या या कार्यामुळेच हा सोहळा शिस्तबद्ध, न भूतो न भविष्यती असा दिसून आला. असंख्य निस्वार्थ हात, हृदयात भक्ती आणि डोळ्यात सेवा घेऊन रात्रंदिवस झटणारे सेवेकरी, पदाधिकारी आणि विविध संघटनांचे अश्रम परिश्रम होते. प्रत्येकाने आपला वेळ, श्रम आणि सामर्थ्य अर्पण करून हा मंगलमय सोहळा अविस्मरणीय केला.

**अहोरात्र झटणारे हात..**

श्री मंगळग्रह संस्थान पदाधिकारी,



सेवेकरी श्री मंगळग्रह मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त, अनिल अहिरराव, जयश्री साबे, डी. ए. सोनवणे, आनंद महाले, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, यांच्यासह मंगल सेवेकरी उज्वला शाह, सुनीता कुलकर्णी, प्रकाश मेखा, विनोद कदम आदींसह सेवेकऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन श्री मंगळ जन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यात हातभार लावला.

**आमदार मित्र परिवार-** माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील, माजी नगराध्यक्षा जयश्री पाटील यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व आमदार अनिल भाईदास पाटील मित्र परिवारचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांनी सहकार्य केले. तसेच महायुती, महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी यांनी अथक परिश्रम घेतले.

**विविध घटकांचे योगदान**

**नगर पालिका प्रशासन**

नगर पालिकेचे मुख्याधिकारी तुषार नेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सफाई कामगार, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, नगर पालिका विविध संघटनांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, नगरसेविका आदींनी व्यवस्थेसाठी सहकार्य केले.

**पोलीस पाटील संघटना**

प्रवीण गोसावी, गणेश भामरे यांच्या मार्गदर्शनात अमळनेर, मारवड पोलीस पाटील संघटना व मित्र परिवारचे सुमारे शंभर पोलीस पाटील उपस्थित होते. त्यांनी कायदा सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, भाविकांना योग्य ते मार्गदर्शन तसेच भोजन व दर्शन व्यवस्थेबाबत सहकार्य केले.

**विविध महिला मंडळे, पोलीस प्रशासन, पत्रकार**

शहरातील विविध महिला मंडळांच्या पदाधिकारी, महिला सदस्य यांनी या सोहळ्यात विशेष सहकार्य केले. पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनात अमळनेर- मारवड पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान यांनी चोख बंदोबस्त ठेवला. तसेच शहर व तालुक्यातील विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, सदस्य यांनीही सहभाग घेऊन भाविकांच्या व्यवस्थेसाठी सहकार्य केले.

**रोटरी, लायन्स क्लब पदाधिकारी**

रोटरी, लायन्स क्लबचे अध्यक्ष, उपाध्यक्षांसह सर्व पदाधिकारी, सदस्य यांचीही मोठी उपस्थिती होती. त्यांनी भाविकांच्या भोजन व्यवस्थेची जबाबदारी पार पाडली.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### ९ सप्टेंबर

९ सप्टेंबर
हा दिवस उगवतो
अंगावर रोमांच घेऊन
स्वातंत्र्य यज्ञात प्राणांची
आहुती देणाऱ्या कोवळ्या
क्रांतिकारकांची
रक्त सळसळविणारी
आठवण घेऊन!
बेडरपणे गोळ्यांचा
सामना करावयास
९ सप्टेंबर १९४२ रोजी
सिद्ध झालेले नंदुरबारचे
ते कोवळे जीव!
शिरीषकुमार, शशिधर,
लालदास, धनसुखलाल,
घनश्याम
प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य
पितृप्रेम- साऱ्यांची जागा
मातृभूमी बस्स मातृभूमी!
कठोर निश्चयाने
दिलेली देशभक्तीची ग्वाही
हीच या दिवसाची
त्या क्रांतिकारकांना
वाहिलेली आदरांजली!!

**-उज्ज्वल वामनराव कुळकर्णी**
मो. ९४२२२८८०६२



### अमित भिलची कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड

**नंदुरबार** : येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा अमित भिल याची १४ वर्षे वयोगटातील ५२ किलो वजन गटात विभागीय स्तरावर निवड झाली. अमित भिल याचा या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष पार्थ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी मुख्याध्यापक सुनील पटेल व शिक्षक उपस्थित होते. अमित भिल यास क्रीडाशिक्षक संदीप पाटील व पंकज दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.



### हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**नंदुरबार** : मुस्लिम समाजातर्फे जशने ईद-ए-मिलादुन्नबी हजरत मोहम्मद साहब यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त येथील मछली बाजार भागातील डॉ. अल्लामा इक्बाल हॉलमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आले. आमदार चंद्रकांत रघुवशी अध्यक्षस्थानी होते. पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस उद्घाटक होते. परवेज खान ऊर्फ मक्कूसेठ, कैलास पाटील, जाकीर मियाँ, जागीरदार फारुख, अब्दुल गनीभाई मेमन, फरीद गुलाम रसूल मिस्तरी, सय्यद रफअत हुसैन रहमतुल्ला इनामदार, अजहर मियाँ प्रमुख पाहुणे होते. इमरान शेख मुसा, इरफान बेग मिर्झा, शकील शेख सलीम, इमरान खान इमाम खान, बल्लूभाई किराणा आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. शिबिरात ७२ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर ईद-ए-मिलादुन्नबीच्या प्रत्येक वर्षी ठेवण्याचे मनोगत आयोजकांनी व्यक्त केले. अजहर मियाँ जहागीरदार यांनी सूत्रसंचालन केले. नगरसेवक फारूक अब्दुल मेमन यांनी आभार मानले.

### तळोदा डॉक्टर असोसिएशनचे डॉ. नीलेश सागर अध्यक्ष

**तळोदा** : येथील डॉक्टर असोसिएशनच्या माळी समाज कार्यालयात




झालेल्या वार्षिक सभेत बैठकीत अध्यक्षपदी डॉ. नीलेश सागर, तर सचिवपदी डॉ. प्रशांत वळवी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष डॉ. अशोक पाटील अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी गेल्या वर्षभरात असोसिएशनतर्फे राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. बैठकीत इतर कार्यकारिणीही निवडण्यात आली. तीत उपाध्यक्ष म्हणून डॉ. भूषण मगरे व डॉ. प्रीतेश चौधरी, खजिनदार म्हणून डॉ. सागर पाटील यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नूतन अध्यक्ष डॉ. नीलेश सागर यांनी वर्षभरात असोसिएशनतर्फे आरोग्य शिबिर, विविध सामाजिक उपक्रम, मार्गदर्शन कार्यक्रम घेण्याचा मानस व्यक्त केला. याप्रसंगी डॉ. योगेश्वर चौधरी, डॉ. जगदीश मगरे, डॉ. सूर्यकांत पंजराळे, डॉ. शैलेश पाटील आदींसह ५० पेक्षा अधिक डॉक्टर्स सदस्य उपस्थित होते.

### प्रा. प्राजक्ता भोई यांचे सेट परीक्षेत यश

**शिरपूर** : आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील



सांख्यिकी विषयाच्या सहाय्यक प्रा. प्राजक्ता दिनेश भोई यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सांख्यिकी (मॅथेमॅटिकल सायन्सेस) या विषयात सेट परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा आमदार अमरिशभाई पटेल, विश्वस्त जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे आदींनी त्यांचा गौरव केला. डॉ. एस. व्ही. देसले, सहकारी प्राध्यापकांचे त्यांना प्रोत्साहन लाभले.

### पूजा जैन यांचे सेट परीक्षेत यश

**शिरपूर** : आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ



मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंटमधील फिजिकल डायरेक्टर पूजा जैन यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या फिजिकल एज्युकेशन या विषयात राज्यस्तरीय पात्रता चाचणी (सेट) परीक्षेत यश संपादन केले.त्यांना परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. पूजा जैन यांचा आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, संचालक, संचालिका डॉ. वैशाली पाटील, डॉ. मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, डॉ. तुषार पटेल आदींनी गौरव केला.

# अकोल्यातील मुलीवर अत्याचार; दोषीला फाशी देण्याची मागणी

## भोई समाजातर्फे घटनेचा तीव्र निषेध; मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ८ सप्टेंबर**

अकोला शहरात गणेश विसर्जनाच्या दिवशी १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेचा अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेतर्फे तीव्र निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणी संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून दोषीला तत्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.



संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अकोला येथील गुलजारपुरा भागात गरीब भोई समाजातील कुटुंबातील १३ वर्षीय मुलीवर गणेश विसर्जनाच्या वेळी घरात कोणी नसताना तोहित समीर नावाच्या व्यक्तीने अत्याचार केला. संशयित हा पूर्वीही अशाच गुन्ह्यात तुरुंगात जाऊन आला असून, सध्या तो फरार आहे.

या घटनेचा निषेध करत अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेने शासनाकडे ज्या मागण्या केल्या आहेत, त्यात फरार संशयित तोहित समीरला तातडीने अटक करावी. त्याच्याविरुद्ध बाललैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंतर्गत कठोर कारवाई करावी. या प्रकरणाचा खटला जलद गती न्यायालयात चालवावा. खटल्यासाठी सरकारतर्फे नामांकित आणि अनुभवी कायदेतज्ज्ञांची नेमणूक करावी. पीडित बालिकेच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत द्यावी. पीडित कुटुंबाला सामाजिक सुरक्षा प्रदान करावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

मागण्या मान्य झाल्या नाहीत तर भोई समाज राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यास तयार असून, त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी शासन जबाबदार असेल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनावर संस्थेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुपडूभाऊ खेडकर, रामकृष्ण मोर, जयंतीलाल खेडकर, आर. डी. मोर, अशोक शिवदे, सुरेश वाडिले, तुकाराम रामोळे, राजेंद्र जाधव, राजेंद्र वाघ, भाटू महाले, पुंडलिक माळी, गणेश नन्नवरे, हेमराज माळी, लक्ष्मण माळी आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# जिल्हा तायक्वांदो स्पर्धा नंदुरबारमध्ये उत्साहात

## ५५ विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड

**नंदुरबार** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे), जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (नंदुरबार) व जिल्हा तायक्वांदो असोसिएशन यांच्यातर्फे येथील जिल्हा क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा व तायक्वांदो बेल्ट ग्रेडेशन कार्यक्रम घेण्यात आला. स्पर्धेत सुवर्णपथक विजेत्या ५५ विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष परवेज खान यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक राजू इनामदार, प्रा. ईश्वर धामणे, तालुका क्रीडा अधिकारी महेश पाटील, क्रीडा अधिकारी ओंकार जाधव, क्रीडाशिक्षक तौसिफ तेली, क्रीडाशिक्षक एजाज खाटीक, आसिफ खान आदी उपस्थित होते.

परवेज खान म्हणाले की, तायक्वांदो खेळ मुलांच्या आरोग्यासाठी लाभदायक आहे. विद्यार्थी जीवनात अभ्यासाबरोबर खेळाचेही मोठे योगदान आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तायक्वांदोसारख्या खेळाकडे वळले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत पंच म्हणून शेख मोईन, सुफियान काझी, सय्यद शाहीद, यामीन सय्यद, साद पठाण, हमजा मन्सुरी यांनी काम पाहिले. जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे सचिव जावेद बागवान यांनी सूत्रसंचालन करीत आभार मानले.



# जी. टी. पाटील महाविद्यालयात 'आयुष्यमान भारत'वर प्रशिक्षण

**नंदुरबार** : येथील जी. टी. पाटील महाविद्यालयात जिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषद व तहसील कार्यालय, अंतर्गत गुणवत्ता विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे आणि प्राचार्य तथा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. एम. जे. रघुवंशी यांच्या मार्गदर्शनात आयुष्यमान भारत योजनेसंदर्भात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण घेण्यात आले.

व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, संस्थेचे समन्वयक डॉ. एम. एस. रघुवंशी, आरोग्य निरीक्षक सी. जी. बोरसे, तहसील कार्यालयाचे संदीप वाडिले, आरोग्यसेवक विलास शिंदे, एस. जी. शेलार, श्री. वसईकर उपस्थित होते. जिल्हा रुग्णालयातील राहुल चव्हाण यांनी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करीत आपल्या मोबाइलद्वारे आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड आपण स्वतः कशा पद्धतीने घरीच काढू शकता, यासंदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. चेतनकुमार देसले यांनी या योजनेसंदर्भात लाभ घेण्यासाठी कोणत्या टप्प्यांची गरज पडते आणि कुठल्या महत्त्वाच्या कागदपत्रांची गरज पडते यावर मार्गदर्शन केले. जुलै २०२३ च्या शासनाच्या परिपत्रकानुसार महात्मा फुले जीवनदायी योजना व आयुष्यमान भारत योजना यांचे एकत्रीकरण करण्यात आले व त्यामुळे आता सर्वसामान्य जनता पाच लाखांपर्यंतचा आरोग्य विम्याचा लाभ घेऊ शकते. प्रात्यक्षिकेद्वारे विद्यार्थ्यांना मोबाइलवर आयुष्यमान भारत योजनेचे ॲप कसे डाउनलोड करावे व त्यात माहिती कशी भरून कार्ड कसे बनवावे यासंदर्भात प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले.

राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्रसैनिक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व इतर मिळून ३०० विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी लेफ्टनंट डॉ. विजय चौधरी, अंतर्गत गुणवत्ता विभागाचे समन्वयक डॉ. एम. आर. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. सुलतान पवार व सहाय्यक अधिकारी डॉ. डी. बी .देवरे, प्रा. जे. सी. पाटील व महिला अधिकारी डॉ. संगीता पिंपरे यांनी सहकार्य केले.

# मानसिक संतुलन राखण्यासाठी नियमित योगासन करणे गरजेचे

## मनिलाल चौधरी : शहादा महाविद्यालयात तालुकास्तरीय स्पर्धा

**शहादा** : शैक्षणिक स्पर्धेच्या युगात मानसिक संतुलन योग्य राखण्यासाठी दैनंदिन जीवनात नियमित योगासन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ क्रीडाशिक्षक मनिलाल चौधरी यांनी केले.

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील जिमखान्यात तालुकास्तरीय शालेय योगासन स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या कल्पना पटेल यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व नारळ वाढवून करण्यात आले. प्रा. मनिलाल चौधरी, महाविद्यालयाचे



क्रीडा संचालक प्रा. डॉ. अरविंद कांबळे, स्पर्धा संयोजक जितेंद्र माळी, पर्यवेक्षक के. एच. नागेश, व्ही. सी. डोळे, नरेंद्र पाटील, मुकेश राजपूत आदी उपस्थित होते.

योगासन ही भारताने जगाला दिलेली मोठी देण आहे, परदेशातील अभ्यासक योगाभ्यासासाठी भारतात येऊन शिक्षण घेत आहेत, असे उपप्राचार्या कल्पना पटेल यांनी सांगितले. स्पर्धेत 'अ' गटात पश्चिमोत्तानासन, 'ब' गटात पूर्ण चक्रासन, 'क' गटात उत्थित टिटिभासन व ऐच्छिक दोन आसने घेण्यात आली. स्पर्धेतील विजयी खेळाडूंचा मंडळाचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, मानद सचिव कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संचालक मयूर पाटील, प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांनी गौरव केला.

प्रा. जितेंद्र माळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अरविंद कांबळे यांनी प्रास्ताविक केले. नरेंद्र पाटील यांनी आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी दिलवर ठाकरे, संजय विसावे, पृथ्वीराज ठाकरे, खलिक शेख यांनी सहकार्य केले.

# के. डी. गावित विद्यालयात शिक्षण परिषदेत चर्चामंथन

**नंदुरबार** : ठाणेपाडा येथील के. डी. गावित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संकुलात तालुक्यातील आष्टे केंद्राची शिक्षण परिषद घेण्यात आली. परिषदेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसह विविध विषयांवर चर्चामंथन करण्यात आले.

आष्टे केंद्राचे प्रमुख जुबेर तांबोळी अध्यक्षस्थानी होते. परिषदेचे उद्घाटन शिक्षणविस्तार अधिकारी एस. एन. पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य बी. डी. पाटील, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. एस. एन. पाटील यांचा सत्कार बी. डी. पाटील यांनी, जुबेर तांबोळी यांचा सत्कार राजेंद्र सूर्यवंशी यांनी केला. प्राचार्य बी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी शिक्षण परिषदेचे महत्त्व व माहितीचे आदान प्रदान करण्यास व अनुकरण करून गुणवत्ता वाढीस मदत होते, असे मत व्यक्त केले. एस. एन. पाटील यांनी गुणवत्ता वाढ व शासकीय योजनांविषयी माहिती दिली. जुबेर तांबोळी यांनी शाळा स्तरावरील समित्या व विद्यार्थी



गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात मागील शिक्षण परिषदेचा आढावा व गुणवत्ता यावर जुबेर तांबोळी यांनी चर्चा घडवून आणली. दुसऱ्या सत्रात आदर्श पाठाचे सादरीकरण सपना हिरे यांनी केले. कर्मयोगी भारत रजिस्ट्रेशन कसे करावे याविषयी विशाल पाटील यांनी मार्गदर्शन केले. पालक परिषद व शैक्षणिक ग्रामसभा याविषयी प्रकाश लांबोळे यांनी माहिती दिली. तिसऱ्या सत्रात विजया कोकणी यांनी माझा वर्ग- माझे नियोजन, गटकार्य सादरीकरण केले. माळी यांनी सूत्रसंचालन केले. जगदीश मराठे यांनी नियोजन केले.

# अक्कलकुवा तालुक्यात 'स्वप्नातील गाव' प्रकल्पाचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ८ सप्टेंबर**

रॉनी स्क्रूवाला व झरिना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशनतर्फे अक्कलकुवा तालुक्यात 'स्वप्नातील गाव' प्रकल्पाचा प्रारंभ जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी आमदार आमश्या पाडवी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे उपस्थित होते.

स्वदेस फाउंडेशनच्या ग्रामीण सक्षमीकरण उपक्रमांतर्गत नाशिक व रायगड जिल्ह्यातील २५० हून अधिक गावे गावविकास समितीच्या सहकार्याने स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, सक्षम व आत्मनिर्भर या ध्येयांवर आधारित 'स्वप्नातील गावे' म्हणून विकसित करण्यात आली आहेत. या अनुभवाच्या आधारे आता अक्कलकुवा तालुक्यातही हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. श्री. असल्याचे सांगून शासकीय अधिकारी, सरपंच व ग्रामसेवकांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन



**स्वदेस फाउंडेशनतर्फे उपक्रम**

वाघमारे यांनी शासन, ग्रामस्थ व स्वदेस फाउंडेशन यांच्या सहकार्याने तालुक्यात अनेक गावे विकसित होतील, असा विश्वास व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे व संचालक नीता हरमलकर यांनी प्रकल्पाची संकल्पना स्पष्ट केली. आमदार पाडवी व मुख्य कार्यकारी अधिकारी गोयल यांनी प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या, तर मुख्यमंत्री फेलो साक्षी देऊळवार यांनी स्वदेस फाउंडेशनच्या गावभेटीचा अनुभव सांगितला. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी लोकसहभाग महत्त्वाचा केले.

कार्यक्रमास अक्कलकुवा येथील तहसीलदार विनायक घुमरे, स्वदेस फाउंडेशनचे वरिष्ठ संचालक राहुल कटारिया, रणजीश कट्टडी, डॉ. सुरेंद्र यादव, प्रकल्प व्यवस्थापक दीपक गिऱ्हे, विलास पावरा व भूषण बूनकर तसेच तालुक्यातील ग्रामसेवक, सरपंच, सामाजिक संस्था व आकांक्षित तालुका समन्वयक विशाल बेंद्रे उपस्थित होते. स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार यांनी प्रस्ताविक व सूत्रसंचालन केले. अक्कलकुवा येथील गटविकास अधिकारी लालू पावरा यांनी आभार मानले.

# विभागीय धर्मादाय सहआयुक्तांनी प्रतिवादी तुरखियांचा अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, ८ सप्टेंबर**

येथील अध्यापक शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे अध्यक्ष भरत बबनराव माळी यांच्या वतीने कोषाध्यक्ष लक्ष्मण बबनराव माळी व उपाध्यक्ष रोहित भरत माळी यांनी दाखल केलेला बदल अर्जाला नंदुरबारच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडून मंजुरी देण्यात आली होती. यावरून वादी निखिल तुरखिया यांनी नाशिक विभाग धर्मादायसह आयुक्तांकडे अर्ज दाखल केलेला अर्ज फेटाळून लावला. यात भरत माळी हेच अध्यापक शिक्षण मंडळाचे कायदेशीररीत्या अध्यक्ष असल्याचे निकालात स्पष्ट केले आहे.

येथील अध्यापक मंडळ ट्रस्टसंदर्भात निखील तुरखिया यांनी बदल अर्जावर हरकत घेतली होती. यावर सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी

**भरत माळी हेच कायदेशीररीत्या अध्यक्ष असल्याचा दिला निर्वाळा**

हरकत फेटाळली असता, पुन्हा तुरखिया यांनी नाशिक विभागीय धर्मादाय आयुक्तांकडे अर्ज दाखल केला. यावर १ सप्टेंबरला धर्मादायसह आयुक्तांनी निखिल तुरखिया यांचा हरकत अर्ज नामंजूर करीत भरत माळी यांना कायदेशीरपणे अध्यक्षपदी व त्यांच्या कार्यकारिणी मंडळाला कायम केले.

या वेळी झालेल्या कामकाजादरम्यान महाविद्यालय ट्रस्टमार्फत शैक्षणिक उपक्रम चालवण्यात येत असून, त्याअनुषंगाने दैनंदिन प्रशासकीय कामकाज, बँक खाते व्यवहार, शिक्षण विभाग पत्रव्यवहार तसेच अन्य प्रशासकीय यंत्रणांसोबत पत्रव्यवहार आदींची पूर्तता करण्यासाठी अधिकृत कार्यकारी मंडळ व पदाधिकारी अपेक्षित आहेत. त्यानुसार कनिष्ठ न्यायालयाने बदल अर्ज स्वीकारला आहे. या बदल अर्जामुळे संस्था नुकसानीची शक्यता नाही. म्हणून भरत माळी यांचा बदल अर्ज स्वीकारपात्र आहे. त्यात नंदुरबार येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या मंजूर आदेशात हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. तसेच महाविद्यालयच ट्रस्टच्या अध्यक्षपदी भरत माळी व त्यांची कार्यकारिणी पात्र असल्याचे स्पष्ट करीत, २१ जुलै २०२५ रोजी झालेली सर्वसाधारण सभा ही कायदेशीररीत्या असून, निखिल तुरखिया यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे धर्मादायसह आयुक्तांनी निकालात म्हटले आहे. यासंदर्भात भरत माळी यांच्या गटाकडून धुळे येथील ॲड. देवेंद्र शिरोडे यांनी कामकाज पाहिले.

# दिव्यांग शाळा, कर्मचारी संघटनांसंदर्भात शासन उदासीन

## नंदुरबारमध्ये संघटना राज्य समितीची नाराजी; विविध विषयांवर चर्चामंथन

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ८ सप्टेंबर**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, दिव्यांग शाळा व बालगृह कर्मचारी संघटनांची राज्यस्तरीय समिती जिल्ह्यात आली होती. कार्याध्यक्ष विजयकुमार ढवळे, मुख्य संघटक व वरिष्ठ उपाध्यक्ष विशाल असोदे, सचिव शिवाजी बिबराळे, सल्लागार सचिन वारनुळकर यांच्या उपस्थितीत दिव्यांगांसाठी चालवल्या जाणाऱ्या शाळांसंदर्भात विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी दिव्यांग मुलांच्या शिक्षणासाठी चालवल्या जाणाऱ्या शाळांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळांना आवश्यक तेवढा निधी वेळेवर उपलब्ध होत नाही. शिक्षक व कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्यात होत असलेला विलंब, शाळांच्या इमारती व वसतिगृहांच्या अपुऱ्या सोयी-सुविधा, शैक्षणिक साहित्यांचा अभाव अशा अनेक अडचणींमुळे शाळा चालवणे कठीण होत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी करण्यात आली.

महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दिव्यांगांच्या शैक्षणिक हक्कांवर गदा येऊ नये म्हणून शासनाने तत्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे. शाळांना आवश्यक तो निधी वेळेवर द्यावा आणि पायाभूत सुविधा सुधाराव्यात, अशा मागण्या बैठकीत करण्यात आल्या.

यावेळी काकुमाय बहुउद्देशीय अपंग सेवा संस्था संचलित येथील गुरुकुलनगर परिसरातील मतिमंद मुलींची शाळा गुरुकुल शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कोळी यांना जिल्हाध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी



कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर कुवर, वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक अविनाश सोनवणे, समाजकल्याण निरीक्षक विवेक चव्हाण, प्रभाकर चौधरी, बाजीराव पाटील, अभय पाटील, विनोद चौधरी, योगेश सावळे, ज्ञानेश्वर कोळी यांच्यासह गतिमंद प्रवर्ग, मूकबधिर प्रवर्ग, अंध प्रवर्ग, अस्थिव्यंग प्रवर्ग आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पाचोरा तहसील घोटाळाप्रकरणी आरोपींकडून विद्यार्थ्यांचे आधार, बँक पासबुक, पॅनकार्डचा वापर

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ८ सप्टेंबर**

येथील तहसीलमधील सव्वा कोटीच्या अनुदान घोटाळाप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपींनी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आधार, बँक पासबुक, पॅनकार्डचा वापर करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, दोघे आरोपींचे बँक खाते गोठविण्यात आले असून, मालमत्तेवर बोझा बसविण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पाचोरा तहसीमध्ये सन २०२२ ते सन २०२४ पावेतो अमोल सुरेश भोई यांनी स्वतःचा आर्थिक लाभ होण्याचे दृष्टीकोनातून गणेश हेमंत चव्हाण याचे संगनमताने २०२२-२०२३ आर्थिक वर्षामध्ये १२२ व सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षामध्ये २२५ असे एकूण ३४७ व्यक्तींच्या खात्यावर नैसर्गीक आपत्तीमधील बाधीत शेती पिकांचे अनुदान देणे पात्र नसतांना, त्यांच्या नावावर शेती नसतांना, आवश्यक कागदपत्रे न घेता बनावट याद्या तयार करुन राज्य शासनाची, शेतक-यांची, सामान्य जनतेची, प्रशासनाची, अधिकारी व कर्मचा-यांची फसवणूक करुन अशा व्यक्तींना लाभ दिलेला आहे. तसेच जुन ते ऑक्टोबर २०२२ मधिल पंचनाम्यांच्या अभिलेखात खोटे, बनावट शासकिय दस्तऐवज तयार करुन शासकिय कर्मचा-यांच्या बनावट सह्या करुन लोकप्रतिनीधींच्या बनावट सह्या करुन खोटे दस्तऐवज तयार केले आहे. तसेच तहसीलदारांचे लॉगीन आय.डी. व पासवर्डचा दुरुपयोग स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी करुन शासकिय संगनकाचा गैरवापर केला आहे. तसेच लाभार्थी यांचेशी संपर्क साधून त्यांच्याकडून त्यांचे खात्यावर जमा झालेली रक्कम स्वतः करीता काढली आहे. अमोल सुरेश भोई (तत्कालीन महसूल सहायक) यांनी बनावट दस्ताचा वापर करुन एकूण १,२०,१३,५१७/-मात्र (अक्षरी एक कोटी वीस लक्ष तेरा हजार पाचशे सतरा मात्र) इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने अमोल सुरेश भोई, तत्कालीन महसुल सहायक, पाचोरा व गणेश हेमंत चव्हाण, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी व ज्यांनी ज्यांनी अमोल भोईला आर्थिक अफरातफर करण्यास अनुदानाची शासकीय रक्कम हडप करण्यास मदत केली, अशी फिर्याद पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे यांनी पाचोरा पोलिसात दाखल केली. त्यावरून तत्कालीन महसूल सहायक अमोल सुरेश भोई व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी गणेश हेमंत चव्हाण, पाचोरा या दोघांविरोधात पाचोरा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्याने पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे.

दरम्यान, फसवणूकप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपी अमोल भोई व गणेश चव्हाण यांनी अनुदान घोटाळ्यासाठी एमपीएससी, यूपीएससी, पोलीस भरती परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांचे आधार, बँक पासबुक, पॅनकार्डचा वापर केला असल्याची माहिती समोर आली आहे. या विद्यार्थ्यांचा आरोपींशी संपर्क आला कसा? विद्यार्थ्यांच्या खात्यावर रक्कम कशी जमा झाली? ही रक्कम खात्यात पडून आहे की कुठं वर्ग झाली? नेमकं या विद्यार्थ्यांना काय सांगण्यात आले?या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे जमा कुणी केले?या विद्यार्थ्यांना काही आमिष देण्यात आले का?असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

गुन्ह्यातील आरोपींचे बँक खाते गोठवण्यात आले असून प्रॉपर्टीवर बोझा बसविण्यात आला असल्याची माहिती पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे दिली आहे. तसेच अमोल भोई याचा पुणे येथे फ्लॅट असल्याची माहिती समोर येत असून पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे हे त्या दिशेने पुढील तपास सुरू आहे. अनुदान घोटाळ्यातील रक्कम ही ३४ जणांनी शासनाच्या खात्यात जमा केली असल्याचे तहसीलदार विजय बनसोडे यांनी सांगितले. आता उर्वरित रकमेच्या वसुलसाठी पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे काय कारवाई याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## ईद मिलादुन्नबीनिमित रुग्णालयात फळे वाटप

**मुक्ताईनगर :** येथील ईद मिलादुन्नबी समितीतर्फे प्रेषित मोहम्मद पैगंबर (स) यांच्या जयंतीनिमित फळे वाटप करण्यात आली. या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. शोएब खान, मानवाधिकार संघटनेचे मोहन मेढे, मुस्लिम मणियार बिरादरीचे जिल्हा उपाध्यक्ष हकीम चौधरी, सुन्नी मनियार मस्जिद ट्रस्टचे मुतवाली कलीम मणियार, अकील मणियार, अहमद ठेकेदार, तसेच केजीएन ग्रुपचे आरशन मणियार, मुजमिल मनियार, जुनेद मणियार, शाकीर मणियार, आवेश मणियार, खलीक मणियार, वसीम मणियार, इलियास मणियार, नदीम मणियार, फैजान मणियार, कारी कलीम रजवी, मुबाशीर अहमद आदी उपस्थित होते.

# कापसाला प्रतिक्विंटल आठ हजारांवर दर

### सीसीआयअंतर्गत केंद्र; मात्र शेतकऱ्यांना ‘कपास किसान’ ॲपवर करावी लागणार नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

जिल्ह्यात दरवर्षी साडे पाच ते सहा लाखाहून अधिक हेक्टरवर कपाशी वाणाची लागवड होते. परंतु यावर्षी केवळ साडेचार लाख हेक्टरवर कपाशी वाणाची लागवड होऊन घट झाली आहे. तर त्याऐवजी मका आणि सोयाबीन लागवडीला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. नेमका याचवेळी केंद्र सरकारकडून कापूस उत्पादनाला प्रति क्विंटल आठ हजाराहून अधिक रुपयांचा दर जाहीर केला आहे.

यानुसार सीसीआयअंतर्गत कापूस खरेदीसाठी यंदा ‘कपास किसान’ या मोबाईल ॲपद्वारे १ सप्टेंबरपासून शेतकरी नोंदणी प्रक्रियेची अंमलबजावणी केली जात आहे. या मोबाईल ॲपवर शेतकऱ्यांनी त्यांच्या कापूस उत्पादनाची नोंदणी स्वत:च करावी लागणार असल्याचे पाचोरा आणि चाळीसगाव येथील सीसीआय केंद्र प्रमुख फुंडकर यांनी दै. ‘तरुण भारत’शी बोलताना सांगितले.



**कपास किसान’ ॲपवर नोंदणी अनिवार्य**
नेमके यावर्षी कपाशी वाणाची लागवड कमी असून केंद्र सरकारकडून कापूस हंगाम २०२५-२६ साठी कापसाला ८ हजार १११ रुपयांचा हमी भाव जाहीर केला आहे. किसान कपास ॲपवर शेतकरी नोंदणीच अंतिम मानली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस उत्पादन थेट विक्री, प्रक्रिया पारदर्शकतेसह
कोणत्याही अडचणीशिवाय यंदा ‘कपास किसान’ या मोबाईल ॲपद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे.

**‘शेतकऱ्यांच्या वेळेची बचत अन् गर्दी टाळणे शक्य**

केंद्र शासनाच्या सीसीआय अंतर्गत कापूस खरेदीसाठी कपास किसान नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच अंतिम मुदत जाहीर करण्यात येईल. कापूस नोंदणीसाठी अंतिम मुदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, जेणेकरून खरेदी केंद्रांवर गर्दी होणार नाही. पर्यायाने शेतकऱ्यांच्या वेळेची बचत होईल.

**कापसाचा मोबदला आधार लिंक बँक खात्यात**

जळगाव जिल्ह्यात सीसीआय अंतर्गत कापूस खरेदीसाठी केंद्रे आहेत. यात जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, पारोळा, जामनेर, शेंदूर्णी, धरणगाव केंद्रांवर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या कापूस उत्पादनाच्या विक्रीसाठी कपास किसान ॲपवर नोंदणी करताना ई-पीक पाहणी व सातबारावर नोंद आवश्यक आहे. यासह बँकेचे पासबुक, पीक पेऱ्याची माहिती, आधार कार्ड आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. कापूस खरेदीनंतर दिलेल्या मालाचा मोबदला रक्कम थेट शेतकऱ्यांच्या आधार कार्डशी लिंक असलेल्या संबंधीत बँकेच्या खात्यात जमा केली जाईल, यामुळे उत्पादनाच्या मोबदला मिळण्यास होणारा विलंब आणि गैरव्यवहार टाळता येईल. शेतकऱ्यांनी त्यांचे बँक खात्याची जोडणी आधार कार्ड सोबत असल्याची खात्री करुनच नोंदणी करणे आवश्यक आहे.



# ‘गिरणा’त आवक घट

### चार दरवाजांतून ५ हजार क्यूसेकचा विसर्ग

**जळगाव :** जिल्ह्यात दोन दिवसापासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. यामुळे गिरणा प्रकल्प पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवकेत घट झाली आहे. त्यामुळे गिरणा प्रकल्पातून होणारा विसर्ग कमी करून ५ हजार क्यूसेक करण्यात आला असल्याचे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

गेल्या सप्ताहात गिरणा नदी व प्रकल्प पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या दमदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात आवक झाली होती. यामुळे प्रकल्प पाणीसाठा ९६ टक्क्यावर पोचल्याने प्रकल्प सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सुरूवातीला ५ हजार व नंतर टप्प्याटप्प्याने विसर्गात वाढ करण्यात येवून १० हजार क्यूसेक करण्यात आला होता. गेल्या दोन दिवसापासून पावसाने विश्रांती घेतली असून गिरणा नदी व प्रकल्प पाणलोट क्षेत्रात पाण्याच्या आवकेत घट झाली आहे. त्यामुळे गिरणा प्रकल्पाचे १, २, आणि ५ व सहा असे चार दरवाजे प्रत्येकी ३० सेमीने उघडून ४८८४ क्यूसेक करण्यात आला आहे. तसेच गिरणा प्रकल्पात पाण्याची आवक वाढल्यास त्याप्रमाणात विसर्ग कमी अथवा वाढ केली जाईल असे पाटबंधारे उपविभागीय अभियंता हर्षल पिटे यांनी म्हटले आहे.

# ॲमेझॉनने देशभरात १,५०,००० हून अधिक हंगामी रोजगार संधी निर्माण केल्या

### हजारो महिला, दोन हजारांहून अधिक विकलांग सहयोगींना संधी

**नाशिक :** ॲमेझॉन इंडियाने आज घोषणा केली की, त्यांनी त्यांचे फुलफिलमेंट सेंटर्स (एफसी), सॉर्ट सेंटर्स आणि लास्ट माल डिलिव्हरी स्टेशन्सच्या ऑपरेशन नेटवर्कमध्ये १,५०,००० हून अधिक हंगामी रोजगार संधी निर्माण केल्या आहेत, जेथे ते आगामी सणासुदीच्या काळात लाखो ग्राहकांना सेवा देण्यासाठी सज्ज आहेत. यामध्ये मुंबई, दिल्ली, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, लखनौ, कोचीन, कोइम्बतूर, इंदूर, रायपूर, जालंधर, जोधपूर, रांची, अनंतनाग, जळगाव यांसारख्या शहरांसह भारतातील चारशेहून शहरांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधींचा समावेश आहे. उल्लेखनीय म्हणजे, ॲमेझॉनने त्यांच्या नेटवर्कमध्ये हजारो महिला सहयोगी तसेच दोन हजाराहून अधिक विकलांग व्यक्तींसाठी रोजगार संधी निर्माण केल्या आहेत. आगामी सणासुदीच्या काळाच्या तयारीसाठी ॲमेझॉन इंडियाने यापैकी बहुतेक नवीन सहयोगींना आधीच सामील केले आहे.

‘‘या सणासुदीच्या काळात, आम्ही भारतातील प्रत्येक सेवायोग्य पिन कोडमधील ग्राहकांना जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरी प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. यासाठी, आम्ही ग्राहकांच्या वाढत्या मागण्यांची कार्यक्षमतेने पूर्तता करण्यास मदत करण्यासाठी १.५ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसह आमचे फुलफिलमेंट आणि लॉजिस्टिक्स नेटवर्क मजबूत केले आहे. यापैकी बरेच कर्मचारी सणासुदीच्या काळानंतर देखील ॲमेझॉनसोबत आपला प्रवास सुरू ठेवतील, जेथे मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्षानुवर्षे आमच्यासोबत पुन्हा काम करण्यास परतत आहेत,’’ असे ॲमेझॉनचे भारत आणि ऑस्ट्रेलियामधील कार्यसंचालनांचे उपाध्यक्ष अभिनव सिंग म्हणाले.

‘‘मला या सणासुदीच्या काळासाठी ॲमेझॉनमध्ये सामील होण्याचा आनंद होत आहे. कंपनीने सुरक्षितता उपायांवर लक्ष केंद्रित केले असल्याने मला कार्यसंचालन नेटवर्कमध्ये काम करताना आत्मविश्वास मिळाला आहे. सादरीकरणादरम्यान भारतातील कुटुंबांना आनंद देण्याचे, तसेच आदरणीय कामाच्या स्थळाचा भाग असण्याचे समाधान मिळत आहे,’’ असे नुकतेच ॲमेझॉनमध्ये सामील झालेल्या आणि बेंगळुरूमधील ॲमेझॉनच्या एफसीमध्ये काम करत असलेल्या मनिषा सिंग म्हणाल्या.

भारतातील ई-कॉमर्स नेटवर्कमधील सहयोगींच्या स्वास्थ्याला पाठिंबा देण्याप्रती आपल्या कटिबद्धतेचा भाग म्हणून ॲमेझॉनने अनेक उपक्रम राबवले आहेत, जसे २०२५ मध्ये देशभरात आश्रय विश्रांती केंद्रांची संख्या १०० पर्यंत वाढवली आहे (१०० : २०२५). कंपनीचा आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम देखील आहे, जो प्रमुख शहरांमधील ८०,००० हून अधिक डिलिव्हरी सहयोगींना मोफत आरोग्य तपासणी सुविधा देतो. हा उपक्रम प्रत्यक्ष लास्ट-माइल डिलिव्हरी स्टेशन्समध्ये आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देतो, जेथे सर्वसमावेशक सेवा दिल्या जातात, ज्यामध्ये डोळे, दात, बीएमआय तपासणी आणि डॉक्टरांसोबत सल्लाम सलत या सेवा दिल्या जातात.

# भारतातील सर्वात मोठा टेलिव्हिजन सादर करत वॉबल डिस्प्लेने रचला इतिहास

**मुंबई :** इंडकाल टेक्नॉलॉजीज ब्रॅन्डचा अंतर्गत तंत्रज्ञान विभाग असलेल्या वॉबल डिस्प्लेजने आज मॅक्सिमस सीरीज ११६.५ इंच गुगल टीव्ही ५.० च्या लाँचची घोषणा केली आणि भारताच्य आजवरच्या सर्वात मोठ्या ग्राहक टेलिव्हिजनच्या इतिहासात एक नवीन उच्चांक प्रस्थापित केला. तंत्रज्ञानाचा हा चमत्कार, इतर ब्रॅन्ड्सपेक्षा खरोखरच उच्च दर्जाचा आहे आणि वॉबल डिस्प्लेजचे डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन व नवोन्मेष यातील सामर्थ्य प्रदर्शित करतो पूर्णतः आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड्सचे वर्चस्व असणाऱ्या या क्षेत्रात, एका भारतीय कंपनीसाठी हा एक अनन्य विक्रम आहे.

मॅक्सिमस सिरीज ११६.५ इंच टीव्ही हा, भारतीय गृह मनोरंजनासाठी एक पूर्णपणे नवीन व उत्कृष्ट उदाहरण निर्माण करतो, ज्यामध्ये या प्रचंड मोठ्या आकारात भारतातील पहिलेच QLED + MiniLED डिस्प्ले तंत्रज्ञान आहे, ज्यामुळे प्रगत क्वांटम डॉट कलर अचूकता आणि उच्च गुणवत्तेच्या ११६.५ इंच मिनी LED बॅकलाइटिंगशी सांगड घालण्यात वॉबल डिस्प्ले पथप्रदर्शक बनतो, तर अशा मोठ्या प्रमाणावर अँड्रॉइड १४ सह नवीनतम गुगल टीव्ही ५.० चे पदार्पण करतो. यामुळे अभूतपूर्व स्मार्ट क्षमता आणि अमर्याद सामग्री एकीकृत होतात, ज्या दिवाणखान्यास एका उत्तम मनोरंजन स्थळांमध्ये रूपांतरित करतात. २४० वॅट ६.२.२ अॅरे आणि दोन सुसंगत वूफरद्वारे समर्थित असलेला मॅक्सिमस एक भव्य, थिएटर-श्रेणी एकरूपता-विस्तारित डायनॅमिक्ससह पाहण्याच्या अनुभवाची भव्यता वाढवतो आणि अत्यंत-स्पष्ट तपशील आणि घेरणाऱ्या, त्रिमितीय ध्वनीसह आपल्या घरात सिनेमॅटिक अनुभव पूर्ण करतो.





मॅक्सिमस सिरीज म्हणजे अभूतपूर्व QLED + MiniLED डिस्प्ले तंत्रज्ञानाचा, अँड्रॉइड १४ द्वारे समर्थित गुगल टीव्ही ५.० सह मिलाप आहे, ज्यामुळे एक अतुलनीय दृश्य वातावरण निर्माण होते. या डिस्प्लेमध्ये २००० निट्सचा आश्चर्यकारक शीर्ष ब्राइटनेस आहे - जो भारतीय बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या बहुतेक उत्तम टीव्हींना मागे टाकतो - ज्यामुळे सिनेमॅटिक ऑडिओ-व्हिज्युअल अनुभवांसाठी डॉल्बी व्हिजन ॲटमॉसच्या मदतीने अतुलनीय कामगिरी निश्चितच पार पाडली जाते. या टेलिव्हिजनची ४१४४ नेटिव्ह रिफ्रेश रेट क्षमता त्याला सर्वोत्तम गेमिंग डिस्प्लेचे स्थान देते, जी पुढील पिढीच्या कन्सोल गेमिंग आणि कनेक्टिव्हिटीला पूरक ठरते आणि तिच्यात व्यावसायिक गेमर्सना आवश्यक असलेल्या ओघवत्या, विलंब-मुक्त कामगिरीचा समावेश आहे.

# रेखा गॅस एजन्सी अन् ऋणानुबंध

जगण्यासाठी अन्न-पाणी ही प्रत्येक सजीवाची मूलभूत गरज आहे. अन्न शिजविण्याचा पद्धत वेगवेगळी असली तर परंपरागत पद्धतीनुसार चुलीवरचा स्वयंपाक हा अगदी जुन्या काळापासून भारतीय स्त्रीच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. स्वयंपाकघरात आज एलपीजी गॅसपासून तर बायोगॅस, सौरऊर्जेवरच्या उपकरणांनी ठाण मांडलं असलं, तरीही ग्रामीण भागात आजही चुलीचाच वापर होतो. चुलीच्या धुरामुळे भारतात दरवर्षी तब्बल १० लाख नागरिक मृत्यूमुखी पडतात हेही तितकंच वास्तव आहे.

सेवा व्यवसायात नाव टिकवायचे असेल तर अविरत मेहनत, सचोटी व सेवाभाव जपला तर नावलौकिक होतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जळगाव शहरातील रेखा गॅस एजन्सी हे नाव घ्यावे लागेल. गेल्या ४४ वर्षांपासून जळगावकरांना सुरक्षित एलपीजी गॅस पुरविण्याचे अशक्यप्राय वाटणारे आव्हान, विनम्र सेवा, अविरत मेहनतीच्या जोरावर सहजगत्या पेलले असून, एक नामांकित गॅस एजन्सी म्हणून अनेक पुरस्कारही मिळविले आहेत. आयएसओ मानांकित असणाऱ्या या गॅस एजन्सीच्या यशामागचे गमक सांगताना संचालक दिलीप चौबे याचे सर्व श्रेय आपल्या कर्मचारी वृंदाला देतात.



**वर्धापन दिन विशेष**

**४४ वर्षांपूर्वी सुरू झाला प्रवास**

मूळचे युपी आग्रा जिल्ह्यातील होलीपुरा गावातील चौबे कुटुंबिय, रमेशचंद्रजी आणि विमलादेवी या दाम्पत्यातील रमेशचंद्र नोकरीच्या निमित्ताने संयुक्त मध्यप्रदेशातील नैनपूर, मंडला, छिंदवाडा असा प्रवास करत १९६७ मध्ये राजनांदगाव येथे स्थायिक झाले. या दरम्यान रमेशचंद्रजींच्या संसारवेलीवर बहरलेल्या अपत्यांच्या रुपाने मोठी मुलगी रेखा, मुलगा दिलीप मिळून असे ६ बहीण भावंड. दिलीप यांच्या मनात सैन्यात जाण्याची इच्छा होती, मात्र ती काही सफल होऊ शकली नाही. अखेरीस नाशिक येथे बॉश कंपनीत १९७६ ला ट्रेनी इंजिनिअर म्हणून नोकरी लागली. कंपनीत त्यांनी पदोन्नती मिळवली. नोकरी करताना जळगाव येथील व्यापारी स्व.बाबूलालजी चौबे यांच्या ज्येष्ठ कन्या सुनंदा यांच्याशी १९७९ मध्ये विवाह झाला. त्याच दरम्यान भारत पेट्रोलियम कंपनीची भारत गॅसच्या एजन्सीची जाहिरात त्यांच्या पाहण्यात आली. तत्कालीन मुख्यमंत्री अंतुले यांच्या कार्यकाळातील राज्य मंत्री असणारे काका सतीश चतुर्वेदी यांनी दिलीप यांना प्रेरणा दिली. मग जळगाव येथेच गॅस एजन्सी स्थापण्याचा निर्णय होऊन ८ सप्टेंबर १९८१ रोजी रेखा गॅस एजन्सीचा जळगावात शुभारंभ झाला.

**गॅस एजन्सीचे नाव रेखा का ठेवले?**

दिलीप यांच्या जीवनात त्यांची वयाने दोन वर्षाने मोठी असणारी बहीण रेखा हिचे मानाचे स्थान होते. दुर्दैवाने १९७८ मध्ये दुसऱ्या बाळंतपणा दरम्यान त्यांचे निधन झाले. आपल्याकडे गॅस घ्यायला येणारी प्रत्येक गृहिणी ही आपली बहीणच आहे, या ब्रीदाने प्रेरित झालेल्या दिलीपजींना आपल्या दिवंगत बहिणीचे नाव गॅस एजन्सीला देण्याची प्रेरणा मिळाली व रेखा गॅस एजन्सी हे नामानिधान ठरले. प्रत्येक घरात जाणारा गॅस सिलिंडर हा माझ्या बहिणीच्या घरी जात आहे, या भावनेने सुरक्षिततेची काळजी घेतल्याने व वेळेवर विनम्र सेवा दिल्याने, आज जळगावकर गृहिणींच्या मुखावर रेखा गॅस एजन्सी व पर्यायाने आपल्या मोठ्या बहिणीचे नाव येत हे नाव अमर झाल्याचा अभिमान दिलीपजींना वाटतो.

जसजसे जग बदलले तसतसे गॅस वितरण क्षेत्रातही आमूलाग्र बदल झालेत. ८ सप्टेंबर १९९१ ला गॅस एजन्सीच्या दहाव्या वर्धापन दिनी तत्कालीन मंत्री सुरेशदादा जैन यांच्याहस्ते एजन्सीचे कार्य संपूर्णतः डिजीटल करण्यात आले. एजन्सीच्या सुरुवातीला जो सेवाभाव मनात होता तोच कायम राहिला. आजही प्रत्यक्ष संपर्क कमी झाला असला तरी, इमोशनल इंटेलिजन्स जोपासत रेखा गॅस एजन्सी आणि ग्राहकांचा ऋणानुबंध तसाच कायम आहे.

भारत पेट्रोलियमच्या सर्व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करत, अनेक पुरस्कार प्राप्त करणाऱ्या रेखा गॅस एजन्सीला २००५-२००६ व २०११-१२ मध्ये सर्वोत्तमक गॅस वितरकाचा किताब प्राप्त आहे. २०१२ मध्ये भारत पेट्रोलियमच्या अध्यक्षांकडून राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्टतेचे प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आले. शहराच्या ५० किलोमीटरच्या परिघात ४३ गावांना सेवा देणारी रेखा गॅस एजन्सी ही पहिली आयएसओ मानांकित गॅस एजन्सी आहे.

केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी उज्वला गॅस योजनेच्या प्रचारासाठी रेखा गॅसने ‘उज्ज्वला रथ’ तयार केला, असा रथ तयार करणारी ही पहिली गॅस एजन्सी आहे. आज वर्धापनदिना निमित्ताने रेखा गॅस एजन्सीच्या गेल्या अनेक वर्षाच्या कार्यात सहकार्य करणारे हितचिंतक व सर्व सन्माननीय ग्राहकांना, रेखा गॅस एजन्सी परिवारातर्फे धन्यवाद देण्यात येत आहेत.

**- योगेश शुक्ल, मोबाईल ९६५७७०१७९२**


# पितृपक्ष : पूर्वज स्मरणाचा पवित्र आरंभ

हिंदू संस्कृतीत पितृपक्ष हा पूर्वजांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा, त्यांच्या स्मृती जागवण्याचा आणि आपले ऋण व्यक्त करण्याचा काळ मानला जातो. यंदा पितृ पंधरवड्याचा प्रारंभ सोमवार, ८ सप्टेंबरपासून झाला असून, २१ सप्टेंबर रोजी सर्वपित्री अमावस्येला त्याची सांगता होणार आहे.

पितृ पक्षात शस्त्रप्राप्त, संन्यास घेतलेले, माहेरी निधन पावलेल्या सवाष्णी यांच्यासाठी विशिष्ट तिथींवर श्राद्ध केले जाते, तर २१ सप्टेंबर रोजी येणारी सर्वपित्री अमावस्या ही सर्व पितरांसाठी समर्पित मानली जाते

काळे तीळ हे स्नेहाचे तर जय समृद्धीचे प्रतीक मानले जाते. तर्पण विधीत वडील, आजोबा, पणजोबा, आई, आजी, पणजी, मामा, काका, सासू-सासरे, पत्नी, मुलगा, मित्र, गुरु, शिष्य यांचे गोत्रासहित नामोल्लेख करुन जल अर्पण करण्याची प्रथा आहे.

सनातन हिंदू संस्कृतीत वर्षभरातील प्रत्येक सण, व्रत, उत्सव यामागे काही ना काही धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक महत्त्व दडलेले आहे. त्यामध्ये पितृपक्ष हा एक अत्यंत महत्त्वाचा काळ मानला जातो. या कालावधीत



पूर्वजांचे स्मरण, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्यांच्या आत्म्यांच्या शांतीसाठी श्राद्धविधी करतात. भाद्रपद पौर्णिमेनंतरचा कृष्णपक्ष म्हणजे पितृपक्ष. साधारणपणे हा कालावधी १५ ते १६ दिवसांचा असतो आणि भाद्रपद अमावस्येपर्यंत चालतो. या दिवसांना ‘महालय’ असेही संबोधले जाते. शास्त्रात सांगितले आहे की, या काळात पितरं पृथ्वीवर अवतरतात आणि आपल्या वंशजांकडून तर्पण, पिंडदान, श्राद्धादी कर्मांची अपेक्षा करतात.

पुराणांमध्ये म्हटले आहे की, पितृपक्षात केलेल्या अन्नदानाने पितरं संतुष्ट होतात त्यांना मोक्षप्राप्ती मिळते. त्यांच्या आशीर्वादाने वंशाची प्रगती होते आणि संततीस आरोग्य, ऐश्वर्य व सुख प्राप्त होते. पूर्वजांच्या मृत्युची तिथी ठावूक नसल्यास तुम्ही सर्वपित्री अमावस्येला श्राद्ध आणि तर्पण करु शकता. या काळात सत्कर्म, दानधर्म, उपासना यांना प्राधान्य द्यावे. पितृपक्षात वाहन, प्रॉपर्टी किंवा इतर कोणतीही मोठी वस्तू खरेदी करणे टाळावे, कारण ते शुभ मानले जात नाही. आजच्या यांत्रिक जीवनशैलीत अनेक परंपरा हरवत चालल्या आहेत. पण पितृपक्षाचे महत्त्व कायम आहे. हा काळ आपल्याला ‘आपण कोण आहोत, आपला उगम कुठे आहे आणि आपल्या आयुष्याचे मूळ आपल्या पूर्वजांत दडलेले आहे,’ याची जाणीव करून देतो. पूर्वजांचे स्मरण केल्याने माणूस स्वतःच्या मुळाशी जोडला जातो. आपल्या कुटुंबाचा इतिहास, नात्यांची परंपरा व संस्कारांची गोडी यांची उजळणी होते.

पितृपक्ष हा केवळ धार्मिक विधींचा भाग नसून कृतज्ञतेचा उत्सव आहे. जीवनात जे काही मिळाले आहे ते आपल्याला पिढ्यांपिढ्यांचे परिश्रम, आशीर्वाद आणि संस्कारामुळे मिळाले आहे, ही जाणीव या काळात होते. म्हणूनच पितृपक्ष हा पूर्वजांच्या आठवणींना मान देण्याचा, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि पुढील पिढ्यांना त्या संस्कारांचा वारसा देण्याचा पवित्र काळ आहे.

**-राजेश्वर स. धर्माधिकारी,**
धार्मिक-सांस्कृतिक अभ्यासक, मो. ९४२०७८७२९६

## प्रदेश फेस्टीव्हलमध्ये लघुचित्रपट ‘ढुण्या’ने मारली बाजी

### मराठी लघु चित्रपटाची जागतिक आणि जिल्हास्तरीय भरारी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

चित्रपट व सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र प्रदेश आयोजित फेस्टीव्हलमध्ये जळगाव जिल्ह्यातील अभिनेता दिग्दर्शक प्रेम बडगुजर लिखित ‘ढुण्या’ या लघुचित्रपटाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्याच बरोबर जागतिक स्तरावर मजल सुद्धा मारली आहे. मराठी चित्रपटसृष्टीसाठी तसेच शहरासाठी हा एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे

‘ढुण्या’ या चित्रपटाबद्दल दिग्दर्शक प्रेम बडगुजर यांनी सांगितले की, ढुण्या हा लघु चित्रपट बनवताना मला बरेच अनुभव आलेत. त्या पैकी एक सांगावासा वाटतो की, ज्या गावात ढुण्या शूट केला तेथील रहिवासी असलेल्या लोकांकडे खुप साऱ्या गोष्टी नाही आहे. टीम मधील बरेच कलाकार यांना २ मिनिट सुधा त्यांच्या घरात थांबू वाटतं नव्हते. पण जी लोकं तिथं राहतात ते कसे राहत असतील असा मी त्यांना प्रश्न केला आणि सारे टीम कलाकार त्यावर अख्खा दिवस मी मांडलेल्या मताबाबत विचार करीत सकारात्मकता दाखवित सगळ्यांनी फिल्मचे शूट सुरु केले. या सर्व यशप्राप्तीत सर्व टीम त्याच बरोबर सहकारी टीम कलाकार निर्माते यांनी बहुमोलाचे सहकार्य केले असल्याचे दिग्दर्शक बडगुजर यांनी सांगितले.




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Contractors/Vendors of MSETCL **RFx.7000037482** SRM **E-tender No.** EE/EHV/(O&M)/DN/JLG/T-3/2025-26, **Particulars of Work:** Work of providing cleaning and sweeping services at various 220kV and 132kV EHV Substations and offices under EHV O&M Division, Jalgaon. **Estimated cost of work: Rs.17,49,326/- E.M.D. (1% of Est. cost) : Rs. 17493.26/-, Tender Fees:** Rs. 590/-, **Sale period:** 09.09.2025 to 24.09.2025, **Last Date of Submission:** 24.09.2025 up to 11:30 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 24.09.2025 at 12:30 Hrs. (If possible), **Contact person:** Addl. Executive Engineer (Office) Tel. No.7768001155, 7768001165. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**.
**Note:-** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Executive Engineer, EHV (O&M) Division, MSETCL, Jalgaon.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहिर निवेदन**

**दिनांक 09.09.2025** रोजी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या वाहिनीवरील वीजपुरवठा अतिमहत्वाचे काम असल्यामुळे बंद राहणार आहे, ते पुढीलप्रमाणे,

| उपकेंद्र | कालावधी | वीजपुरवठा बंद असणाऱ्या ११ केव्ही वाहिन्या |
| --- | --- | --- |
| 132/11 केव्ही निंभोरा | सकाळी 11.00 ते 15.00 पर्यंत | 11 केव्ही खिर्डी शेती , 11 केव्ही विवरा 3 शेती, 11 केव्ही बालवाडी शेती, 11 केव्ही निंभोरा गावठाण, 11 केव्ही सिंगात शेती, 11 केव्ही आंदलवाडी शेती, 11 केव्ही विवरा 2 शेती. |

संबंधित नागरिकांना सूचित करण्यात येते कि, वर दिलेल्या वेळेत विद्युत पुरवठा बंद राहणार आहे,तरी वरील कामे वेळेच्या आत पूर्ण झाल्यास संबंधित विभागातील विद्युत पुरवठा त्वरित सुरु करण्यात येईल. कृपया संबधित वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी व म. रा. वि. वि. कंपनीस सहकार्य करावे.

**कार्यकारी अभियंता**
**PRO NO. JLGZ 122/2025-26** म. रा. वि. वि. कं. मर्या.(सं व सु) सावदा.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### भाद्रपद सप्ताह कार्यक्रमात पालकमंत्र्यांची हजेरी

**धरणगाव :** येथील लहान माळीवाडा परिसरातील समस्त पाटील समाज पंचमंडळाकडून घेण्यात येणाऱ्या भाद्रपद सप्ताहानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी भेट दिली. याप्रसंगी कुणबी पाटील समाज पंच मंडळाचे अध्यक्ष माधवराव पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील, विलास महाजन, वाल्मीक पाटील, बुट्या पाटील, आनंद पाटील, राहुल पाटील तसेच लहान माळीवाडा समस्त पाटील समाज पंच मंडळ आणि शिवसेना शाखेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

### गोराडखेडा येथे ईद मिलादनिमित्त बक्षीस वितरण

**पाचोरा :** तालुक्यातील गोराडखेडा येथे ईद मिलाद-उन-नबी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुराण पठणाने झाली. गावाच्या परंपरेनुसार ध्वजारोहण (परचम कुशाई) करण्यात आले. या निमित्ताने जिल्हा परिषद उर्दू शाळा (गोराडखेडा) येथील विद्यार्थ्यांनी पैगंबर मुहम्मद यांच्या स्तुतीपर गीते गायली आणि वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पवित्र कुराण आणि शाळेची बॅग भेट म्हणून देण्यात आली. अध्यक्षस्थानी सुरत शहरातून आलेले हाजी शेख निजाम होते. हाफिज मोहसीन आणि जावेद रहीम प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सय्यद मोईन, शकील सय्यद, आसिफ सय्यद, मोहसीन सय्यद, अमीन सय्यद, मुस्तफा शेख, अलीम शेख, आसिफ सय्यद, सादिक सय्यद, मुजाहिद शेख, रफीक शेख, मुख्तार सय्यद, मुबीन सय्यद, अरबाज शेख, रईस शेख, नदीम सय्यद आणि समीर शेख यांनी परिश्रम घेतले.



### विद्या पाटील सेट परीक्षा उत्तीर्ण



**अमळनेर :** पारोळा तालुक्यातील भोलाणे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील उपशिक्षिका विद्या पाटील या सेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. प्राध्यापक पदासाठी पात्रतेच्या सेट परीक्षेत गणित या विषयात त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. त्या अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमधील उपशिक्षक कल्पेश सूर्यवंशी यांच्या पत्नी आहेत.

### एमटीएस परीक्षेत प्रणाली जाधव केंद्रात प्रथम

**सोयगाव :** पळाशी येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील प्रणाली विठ्ठल जाधव ही एमटीएस परीक्षेत केंद्रात प्रथम आली. तिचा शाळेतर्फे गुणपत्रिका, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तिचा मुख्याध्यापक अरुण पाटील, केंद्र समन्वयक पदवीधर शिक्षिका नीलिमा माळी, शिक्षक, शालेय समिती अध्यक्ष, तसेच शिक्षणप्रेमी पालकांनी गौरव केला. स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी यापुढेही घवघवीत यश प्राप्त करावे, असे आवाहन मुख्याध्यापक अरुण पाटील यांनी केले.



### धरणगावात इदनिमित्त रक्तदान शिबिर

**धरणगाव :** पवित्र ईद-ए-मिलाद उन नबीनिमित्त पिल्लू मस्जिद येथे भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख नीलेश चौधरी, राष्ट्रवादी (श.प.) काँग्रेसचे शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, ॲड. नईम काझी यांसह मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिर सुरू झाले. कार्यक्रमास इरफान शेठ, रहेमान शाह, करीम शेख, नदीम काझी, राजू धनगर, गोपाल पाटील, नंदू धनगर, हमीद पिंजारी, याकूब शेख, समद मन्यार, निसार सय्यद, रणजितसिंह ठाकूर, पत्रकार विनोद रोकडे, गजानन माळी, राहुल रोकडे, हसन मोमीन, महेबुब पठाण, करीम लाला, राजेंद्र वाघ तसेच सर्व समाजातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी मार्गदर्शन कले. कार्यक्रम रियाज बागवान मित्र परिवाराच्यावतीने घेण्यात आला. शिबिर यशस्वीतेसाठी कार्यकर्ते, तसेच जळगाव येथील रेड प्लस ब्लड सेंटरचे डॉक्टर्स व कर्मचारी यांनी योगदान दिले. करीम शेख यांनी आभार मानले.



### राष्ट्रवादीच्या जळगाव तालुका महिला उपाध्यक्षपदी आशा महाजन

**नशिराबाद :** नशिराबाद राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) जळगाव तालुका महिला उपाध्यक्षपदी म्हणून आशा महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) कार्यालयात महिला जिल्हाध्यक्ष कल्पना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमास साधना पाटील, तालुकाध्यक्ष आशा चव्हाण, महिला तालुका कार्याध्यक्ष व माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) नशिराबाद शहराध्यक्ष गणेश चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते बरकत आली यांच्या उपस्थितीत ही नियुक्ती करण्यात आली.



### साईराज मंडळातर्फे मनोरंजन, प्रबोधनपर उपक्रम

**धरणगाव :** येथील विद्युत नगर, अनिता नगर, हेमिंडू नगर यांच्यातर्फे साईराज मित्र मंडळातर्फे विविध सांस्कृतिक, मनोरंजन आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आले. या सर्व कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष सेवानिवृत शिक्षक वसंत पाटील, मंदार चौधरी, प्रा. डी. डी. पाटील, सरपंच सविता सोनवणे, मंजुषा राजपूत, पल्लवी शिंगाने, आदर्श शिक्षिका अर्चना पाटील, संगीता भडांगे, शर्मिला पाटील, प्रा. मनीषा पाटील, स्वाती देसले, माया पाटील, प्रिया मोरे, मंगल पाटील, आदर्श शिक्षक योगेश पाटील, व्ही. टी. पाटील, किरण मोरे, संतोष भडांगे, प्रा. संजय शिंगाणे, पंकज पाटील, प्रदीप बाविस्कर, संदीप देसले, समाधान पाटील, अमित बागुल, अमित पाटील आदींनी परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी प्रा.मंगल पाटील, अरविंद देवरे, ग.स.चे माजी अध्यक्ष अशोक पाटील, पंजाबराव पाटील, मंडळाचे माजी अध्यक्ष शिवाजी पाटील, डॉ. किशोर पाटील, प्रा. संजय पाटील, विजय बाविस्कर, प्रा. एस. पी. पाटील, अनिल पाटील, वाल्मीक पाटील, राजेंद्र गांगुर्डे, प्रल्हाद चौधरी, शरद पाटील, धर्मा पाटील, धनराज सोनवणे आदी ज्येष्ठ नागरिक मार्गदर्शन करीत असतात.

## वहनांसाठी बैलजोडीचा लिलाव १२ रोजी

### जास्तीत जास्त बोली लावण्याचे बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, ८ सप्टेंबर**

सालाबादप्रमाणे यावर्षीही येथील श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या वतीने १२ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता वहनासाठी बैलजोडी जुंपण्याचा जाहीर लिलाव मंदिराच्या पटांगणावर होणार आहे. जास्तीत जास्त बोली लावून मंडळाला आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डी. आर.पाटील व सदस्यांनी केले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून वहन व्यवस्थापक मंडळाच्यावतीने परंपरागत नवरौत्र उत्सव यावर्षी २२ सप्टेंबर रोजी घटस्थापनेपासून तर ६ ऑक्टोबर कोजागिरी पौर्णिमेपर्यंत रथ व वहन उत्सव मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात येतो.

१५ दिवस चालत असलेल्या या उत्सवात सर्व जाती-धर्मांचे भाविक व नागरिक या उत्सवात सहभागी होतात. वहनास बैलजोडी जुंपण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी जाहीर लिलाव होत आहे. शहर परीसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. याआधी नुकतीच मंडळाची वार्षिक सभा मंडळाचे अध्यक्ष डी. आर.पाटील व मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत झाली. त्यात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत सचिव प्रशांत वाणी यांनी मागील वर्षाचा जमाखर्च वाचून दाखवला तर विलास येवले यांनी मंदिर जीर्णोद्धाराचा जमाखर्च सादर केला. सर्वानुमते मंजुरी दिल्यानंतर उत्सवाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. त्यात गावांतील रस्ते, वहन मार्गावरील झाडे, लोंबकळणारे विजेचे तार, केबल, स्वच्छता व रस्त्यावरील वाढणारी अतिक्रमणे यावर चर्चा झाली. तसेच नगरपालिका, वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन तांत्रिक अडचणीवर चर्चा करण्यात येणार आहे.

या चर्चेत सर्वश्री गुलाबराव वाघ, भानुदास विसावे, ॲड. संजय महाजन, जीवन बयस, पंडित गुरुजी, किरण वाणी, महेंद्र बयस, सुदाम मराठे, श्याम भाटिया, प्रमोद जगताप यांनी सहभाग घेतला.

श्री बालाजी मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील यांनी यावर्षीचा महोत्सव धूमधडाक्यात उत्साहात साजरा करण्यासाठी सर्वांना मदतीचे आवाहन केले. तसेच सभागृह बांधकामाचा आढावा घेऊन श्री बालाजी स्वयंसेवकांचा गौरव करण्यात आला. सदस्य चंद्रकांत अमृतकर यांनी आभार मानले.



## गोगडी प्रकल्पात १०० टक्के साठा

**पहूर (ता. जामनेर) :** पहूरकरांची तहान भागविणारा गोगडी प्रकल्पात पाणीसाठा अखेर शंभर टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या आठवड्याभरात झालेल्या संततधारेमुळे हा प्रकल्प पूर्ण भरून सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे ग्रामस्थांसह शेतकरी बांधवांमध्ये चैतन्य पसरले आहे.

अजिंठा डोंगर रांगेत उगम पावलेल्या वाघूर नदीची उपनदी असलेल्या गोगडी नदीवर हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. यामुळे पहूर-कसबे, पहूर-पेठ, सांगवी या गावांची तहान भागते.

दरम्यान, परिसरात सतत झालेल्या पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. परिणामी लघुपाटबंधारे क्षेत्रातील गोगडी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे.

तथापि, धरण क्षेत्रात पेरणी करणाऱ्या काही शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे जीवितहानी होऊ नये म्हणून परिसरातील शेतकऱ्यांनी व नागरिकांनी सुरक्षेची खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन लघु पाटबंधारे विभागाचे अभियंता शुभम पाटील यांनी केले आहे.

## अन्नदात्यांसाठी कर सवलतीचा दिवाळी बोनस

### शेतकरी चर्चासत्रात निर्मल सिड्सच्या संचालिका वैशाली सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ८ सप्टेंबर**

जीएसटी कपातीमुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन कृषी क्षेत्रात नवचैतन्य पसरेल, हा अन्नदात्यांसाठी कर सवलतीचा दिवाळी बोनस आहे, असे विचार निर्मल सिड्सच्या संचालिका वैशाली सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

निर्मल सिड्सच्या 'कृषी दालन' या हॉलमध्ये आयोजित शेतकरी चर्चासत्रात त्या बोलत होत्या. या चर्चासत्राला कंपनीचे असंख्य बिजोत्पादक शेतकरी बांधव उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या दूरदृष्टीपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णयामुळे



आज संपूर्ण देशातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली आहे. कृषी क्षेत्राशी संबंधित वस्तूंवरील जीएसटी दर कपात ही शेतकऱ्यांसाठी दिवाळीपूर्वीची मोठी भेट ठरली आहे. यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षणीय प्रमाणात घटणार आहे. खते व कीटकनाशकांच्या किमती कमी झाल्यामुळे उत्पादनाचा खर्च घटेल, तर कृषी उपकरणे स्वस्त झाल्याने शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार असून, कृषी क्षेत्रात नवचैतन्य पसरेल, असे प्रतिपादनही वैशाली सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले.

दिवाळीपूर्वी माझ्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान पाहून मला प्रचंड आनंद झाला. ही खऱ्या अर्थाने ऐतिहासिक दिवाळी भेट आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावल्याशिवाय राहणार नाही, असेही वैशाली सूर्यवंशी यांनी नमूद केले. यावेळी परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## संतांचे कार्य सर्व समाजाला प्रेरणादायी

### हभप स्वप्नील महाराज यांचे विचार

**धरणगाव :** उभ्या महाराष्ट्रात संत व महात्म्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून इतिहासातील उभे केलेले कार्य हे सर्व समाजाला प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन नंदुरबार जिल्ह्यातील युवा कीर्तनकार ह.भ.प. स्वप्नील महाराज मंदाणेकर यांनी केले. तसेच समाजजीवनात आई-वडिलांची सेवा हाच परमार्थ असल्याचे नमूद करून संतकार्याची महती विशद केली.

आपल्या दोन तासाच्या कीर्तन प्रबोधनात त्यांनी संत तुकाराम, संत सावता महाराज व संत नामदेव महाराज यांचे समाज जीवनातील कार्यात मोठे योगदान असल्याचे नमूद करुन संत म्हणतात पंढरपूरला जाऊ नका, आळंदी जाऊ नका, कोणत्याही तीर्थयात्रा करू नका, खरे तीर्थ आपल्याच घरी आहे. आपण आई-वडील, सासू-सासरे यांची सेवा करा, उतारवयात त्यांना त्रास देऊ नका, त्यांना सन्मानाने जीवन जगू द्या. एवढे जर आपण करत असाल तरी सर्व तीर्थ केल्याचे पुण्यकर्म आपल्यास लाभेल व जीवनात सुख व समाधान मिळेल, असे भावनात्मक प्रतिपादन केले.



येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व 'तरुण भारत'चे पत्रकार कडू महाजन यांच्या मातोश्री अनुसयाबाई रुपा महाजन व लहान बंधू पुंडलिक रुपा महाजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कीर्तन झाले, त्याप्रसंगी ह.भ.प. मंदाणेकर महाराज बोलत होते.

प्रारंभी ह.भ.प. स्वप्नील महाराज व टाळकरी भजनी मंडळाचे कुंकू बुक्का लाऊन ज्येष्ठ पत्रकार कडू महाजन व परिवाराने स्वागत केले. कार्यक्रम यशस्वीसाठी वासुदेव महाजन, गणेश पाटील, शिवाजी देशमुख, श्याम महाजन, राजेंद्र महाजन, ज्ञानेश्वर महाजनांसह परिवारातील सदस्य व पंच मंडळाने सहकार्य केले.



## टायगर इंटरनॅशनल स्कूलमध्ये व्याख्यान

**पारोळा :** येथील टायगर इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रेरणादायी व्याख्यान घेण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून करंजी गावाचे सरपंच भय्यासाहेब रोकडे उपस्थित होते. सुरुवात प्राचार्य पी. एस. पाटील यांच्या स्वागत व प्रास्ताविक भाषणाने झाली.

अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर संदेश दिला. करंजी गावाचे सरपंच भय्यासाहेब रोकडे यांना लोकनायक सरपंच सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

भय्यासाहेब रोकडे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, ''आजच आपले ध्येय निश्चित करा आणि जीवनात उंच भरारी घ्या. तसेच डिजिटल युगासोबत स्वतःला सतत अद्ययावत ठेवा. तरच तुम्ही जगात टिकाल.'' सूत्रसंचालन योगेश पाटील व नम्रता बेडीस्कर यांनी केले.

## जामनेर पारसनाथ देवस्थानतर्फे भगवान महावीर मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**जामनेर, ८ सप्टेंबर**

येथील पारसनाथ देवस्थान ट्रस्टतर्फे पर्युषण पर्व मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. पर्वाच्या समाप्तीनिमित्त भगवान महावीरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली ढोलपथक या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होते.

दिगंबर जैन मंदिरात पूजा आरत्या होऊन भगवान महावीरांच्या प्रतिमेवर पंचामृत अभिषेक करण्यात येत होता. या १० दिवसात महिलांनी विविध स्पर्धांचे आयोजनही केले होते. ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा



गौरव करण्यात आला.

नगराध्यक्ष साधना महाजन, शिक्षण संस्थेचे सचिव जितेंद्र पाटील, माजी नगरसेवक आतिष झाल्टे, भाजप सरचिटणीस रवींद्र झाल्टे, माजी नगरसेवक अनिलकुमार बोहरा, सुनील मामा मंडलेचा, भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष सुमित मुनोत यांचा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला.

संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार सुरेश सूर्यवंशी, संचालक राजेंद्र चतूर, भरत सूर्यवंशी, बाळू सूर्यवंशी, यांनी इंद्र म्हणून दररोज भगवंताची पूजाअर्चा केली. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सैतवाल, उपाध्यक्ष भरत सूर्यवंशी, कार्याध्यक्ष विजय सैतवाल, सचिव राजेंद्र नारळे, संजीव सैतवाल, संचालक प्रशांत सैतवाल, सुदर्शन सैतवाल, बालू मिटकर, राजेंद्र डिकेकर, बाळू सूर्यवंशी, राजेंद्र चतूर, दिनेश सैतवाल, राजू खोबरे अशा सर्व संचालकांनी परिश्रम घेतले. राहुल शिंपी यांची यावेळी सैतवाल शिक्षक संघटनेच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली.

## जुगार अड्ड्यावर छापा; १२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत


### पाळधीत एलसीबीच्या कारवाईने खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

घराच्या दुसऱ्या मजल्यावर अवैध जुगार अड्ड्यावर एलसीबीच्या पथकाने छापा टाकला. संशयितांकडून तब्बल १२ लाख २४ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पाळधी येथील शाम कॉलनीतील दुमजली घरावर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी १६ संशयितांवर धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या ॲक्शनने अवैध व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली.

पाळधी येथे अवैध जुगार अड्डा सुरू आहे, अशी गोपनीय माहिती सोमवारी (८ सप्टेंबर) एलसीबीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तत्काळ पथक नेमुन कारवाई करण्यासाठी पाळधी येथे रवाना केले.

पथकाने तपासाचे चक्र पाळधी येथे फिरविले असता अवैध धंद्याचे



कनेक्शन शाम कॉलनीत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्यानुसार घराच्या दुसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या जुगारावर पथकाने छापा टाकला. यात पथकाने १६ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सात लाख २२ हजार २६० रुपयांची रोकड तसेच पाच लाख दोन हजार किमतीचे मोबाइल, जुगार साहित्य असा सुमारे १२ लाख २४ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, चाळीसगाव भाग अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, चोपडा उपविभाग उपविभागीय पोलीस अधिकारी आण्णासाहेब घोलप, एलसीबीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनात पथकातील उपनिरीक्षक शरद बागल, हवालदार अक्रम शेख, हवालदार प्रवीण भालेराव, हवालदार मुरलीधर धनगर, हवालदार नितीन बाविस्कर, हवालदार सलीम तडवी, हवालदार विनोद पाटील, हवालदार विजय पाटील, कॉन्स्टेबल रवींद्र चौधरी, कॉन्स्टेबल रवींद्र कापडणे, कॉन्स्टेबल सिध्देश्वर डापकर, कॉन्स्टेबल राहुल रगडे, कॉन्स्टेबल रतन गिते, कॉन्स्टेबल मयूर निकम, चालक हवालदार भारत पाटील, चालक कॉन्स्टेबल महेश सोमवंशी, कॉन्स्टेबल प्रमोद ठाकुर यांच्या पथकासह पाळधी दूरक्षेत्राचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे, कॉन्स्टेबल अमोल धोबी, कॉन्स्टेबल रवींद्र चौधरी यांनी संयुक्तीरित्या ही कारवाई केली.

## गोविंद महाराजांच्या जयघोषात हरिनाम कीर्तनाची सांगता

**कासोदा :** येथील हरिनाम कीर्तन सप्ताहाची सांगता 'गोविंद महाराज की जय' या जयघोषात आज दि. ७ सप्टेंबर रोजी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ वा. काकड आरतीने करण्यात आली, तर सकाळी ११ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी ६ वा. येथील महादेव मंदिरापासून पालखी मिरवणूक सोहळ्यास सुरुवात करण्यात आली तर गावातील जुने पोष्ट ऑफिस, गढी वार्ड, मारोती मंदिर गल्ली मार्गावरून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ढोल ताशांच्या गजरात लेझीम पथक व भजनी मंडळ सहभागी झाले. यावेळी शिवराय मित्र मंडळाचे शिवकन्या लेझीम पथकातील मुलींनी फेटे बांधून जगदंबा माता मंदिरापासून ते महादेव मंदिरापर्यंत डीजेच्या तालावर लेझीम खेळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हरिनाम कीर्तन सप्ताहाच्या मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून चाळीसगाव उपविभागीय पोलीस उपअधीक्षक विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश राजपूत, पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील, हवालदार समाधान तोंडे, नितीन सूर्यवंशी, योगेश पाटील यांच्यासह ११ अधिकारी, १२२ पोलीस कर्मचारी, १५ महिला पोलीस, २७ होमगार्ड व २ आर.सी.पी. प्लाटून यांच्या मदतीने चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**मुस्लिम पंच मंडळाकडून स्वागत**

सद्‌गुरु गोविंद महाराज पालखीचे आगमन मशिदीजवळ झाल्यावर मुस्लिम पंच मंडळाकडून पालखीचे श्रीफळ देऊन



स्वागत करण्यात आले.

**यांची होती प्रमुख उपस्थिती**

हरिनाम कीर्तन सप्ताहाच्या काकड आरतीला दरवर्षीप्रमाणेच जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्यासह आ. अमोल पाटील, माजी आ. चिमणराव पाटील, जि. प. चे माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले यांच्यासह अन्य मान्यवरांनी उपस्थिती दिली.


## विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुरक्षा महत्त्वाची : भागवत पाटील

### शिवकमल शैक्षणिक अन् सामाजिक संस्थेचा नावीन्यपूर्ण उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ८ सप्टेंबर**

एरंडोल तालुक्यातील उत्राण अ.ह. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा अ. ह., जि. प. उर्दू शाळा आणि माध्यमिक विद्यालय उत्राण अहिर हद्द येथील या तिघा शाळांमधील ५०० विद्यार्थ्यांना महाएनजीओ डेव्हलपमेंट असोसिएशनच्या राष्ट्रीय विद्यार्थी सुरक्षा योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे अपघाती विमा कवच मोफत प्रदान करण्यात आले आहे.

ही उपक्रमशैली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एरंडोल तालुकाध्यक्ष व एरंडोल पंचायत समितीचे माजी सदस्य भागवत भिकन पाटील यांच्या सौजन्याने शिवकमल शैक्षणिक व सामाजिक संस्था उत्राण यांच्या



पुढाकारातून हा नावीन्यपूर्ण उपक्रम साकारण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अमोल गोविंदा महाजन आणि संचालक विलास महाजन व प्रकाश कुवर यांनी प्रयत्न करून विद्यार्थ्यांना संरक्षण कवच मिळवून दिले.


गावातील मान्यवरांच्या हस्ते विमा प्रमाणपत्रांचे औपचारिक वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी सागर बियाणी होते. सरपंच आनंदा धनगर, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र महाले, डॉ. मगन महाजन, राजू पवार, दत्तू पाटील, प्रकाश कुवर, गणेश चौधरी, अमोल पाटील, सोनू कोळी, लखन लोहारे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, मुख्याध्यापक कैलास साळुंखे, अनिल पाटील, राजू पाटील, राजेश सोनवणे, युवराज वानखेडे, नितीन पाटील, भूषण पाटील व सर्व शिक्षकवृंद पालक आणि ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक अमोल महाजन यांनी केले तर प्रकाश कुवर व डॉ.मगन महाजन यांनी मनोगते व्यक्त केली.सूत्रसंचालन व आभार राजेश सोनवणे यांनी मानले.

## आर्वे शिवारात गुरचरण जमिनीवर शिक्षण संस्थेचे बेकायदेशीर बांधकाम

### तहसीलदारांना निवेदन; गुन्हे दाखल करण्याची मागणी

**पाचोरा :** लोहारी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील आर्वे शिवारातील शासकीय गुरचरण जमिनीवर तुळजाई शिक्षण संस्थेने शाळेचे बेकायदेशीर बांधकाम सुरू केले आहे. शासनाच्या खुल्या भूखंडावर अवैधरित्या बांधकाम करणाऱ्या तुळजाई शिक्षण संस्थेच्या संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ तुकाराम पाटील यांनी पाचोरा तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील लोहारी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील आर्वे शिवारातील शासनाच्या गुरचरण भूखंडावर तुळजाई शिक्षण संस्थेने बेकायदेशीर खासगी शाळेचे बांधकाम सुरु केले आहे. आर्वे गावाची लोकसंख्या विचारात घेता त्या गावात



खासगी शाळेस कोणतीही आवश्यकती बांधकाम परवानगी नसताना तुळजाई शिक्षण संस्था शासनाचा खुला भूखंड हडप करण्याचा इराद्याने या ठिकाणी खासगी शाळेने बांधकाम झपाट्याने सुरू केले आहे, असेही या निवेदनात नमूद केले आहे.

> “ तुळजाई शिक्षण संस्थेला शासनाच्या गुरचरण जमिनीवर सुरू असलेल्या बांधकामप्रकरणी नोटीस बजावली असून, त्यावर पाचोरा तहसीलदारांकडे सुनावणी सुरू आहे.
>
> **-गणेश नन्नवरे,** ग्रामसेवक, लोहारी, ता.पाचोरा

जळगाव तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com
१ जळगाव, मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५



# आपलं महानगर




## महत्त्वाचे

### कारला मोपेड धडकून महिला गंभीर जखमी

**जळगाव :** रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत अचानक वेगाने चालक महिलेने कार रोडवर आणली. यामुळे कारवर दुचाकी धडकली. दुचाकी चालक महिला रस्त्यावर पडुन जखमी झाली. शुक्रवारी (५ सप्टेंबर) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ही घटना कांताई नेत्रालयाजवळ जुन्या हायवेवर घडली. याप्रकरणी रविवारी ( ७ सप्टेंबर) तालुका पोलीस ठाण्यात कार चालक महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला. निता महेंद्र पाटील (वय ३९, रा. रेणुकानगर) या नोकरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्या मोपेड ( एमएच १९ सीए ५५९१) ने एसएमआयटी कॉलेजकडून जुन्या हायवेने घरी जात होत्या. दरम्यान कांताई नेत्रालयाजवळ भरधाव वेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत कार (एमएच १९ सीझेड ६६१०) वरील चालक महिलेने कार अचानक रोडवर आणली. त्याबरोबर मोपेड कारवर धडकली. मोपेडवरील महिला रस्त्यावर खाली पडुन जखमी झाली. त्यांच्या डोक्याला, दोन्ही पायांच्या गुडघ्यांना मार लागला. त्यांच्या दुचाकीचे नुकसान झाले. या प्रकरणी कार चालक महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक विजय निकम तपास करीत आहेत.

### शिवण क्लासला गेलेली तरुणी बेपत्ता

**जळगाव :** शिवण क्लासला जाते, असे कुटुंबियांना सांगून घराबाहेर पडलेली १८ वर्षीय तरुणी एम आयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली. रविवारी (७ सप्टेंबर) सायंकाळी चार वाजेच्या सुमारास ही घटना घडली. उशिरापर्यंत तरुणी घरी परतली नाही. त्यानंतर कुटुंबियांनी तरुणीचा सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. या प्रकरणी मिसिंग दाखल करण्यात आली. हवालदार गणेश वंजारी तपास करीत आहेत.

### अपघातात आठ जखमी

**जळगाव :** वेगवेगळ्या रस्ता अपघाताच्या घटनेत आठ जण जखमी झाले. जखमीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुष्पाबाई सोनवणे (वय ६५, रा. भोकर), छाया राजेश रणदिवे (वय ३९, भुसावळ), तुळसाबाई काशिनाथ कोळी (वय ६५, सातोड), प्रशांत गावंडे (वय ४०, रा. भुसावळ), राज जगदीश ठाकूर (वय २०, रा. कंडारी), गौरव बहाद्दुर राणा (वय २८ आग्रा), गुलाब नंदलाल लोहार (वय ४०, रा. शिवाजीनगर) यांचा जखमींमध्ये समावेश आहे.

### सर्पदंशाने तिघांना विषबाधा

**जळगाव :** वेगवेगळ्या ठिकाणी सर्पदंश होऊन तीन जण अत्यवस्थ झाले. तिघांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आकाश देविदास कोळी (वय २४, यावल), हरेंब विनोद कोळी (वय १८, रा. बेलसवाडी) आणि कडुबा दशरथ बडगुजर (वय ५०, रा. लोहारी) यांचा समावेश आहे. तिघांची प्रकृती स्थिर असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

### विषप्राशनाने पाच जण अत्यवस्थ

**जळगाव :** विषप्राशनातून पाच जणांची प्रकृती अत्यवस्थ झाली. या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या. बाधित सर्वांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुलाब सुपडू तडवी (वय १५, रा. हिवळे दिगर), अरबाज तडवी (वय १७ विवरे), रवींद्र मखराम राठोड (वय ३८, रा. कुसुंबा), गौतम भाऊलाल ब्राम्हणे (वय ४०, रा. बाह्मणे) तसेच गोकुळ रामचंद्र पाटील (वय ४५, रा. कुरंगी) यांचा बाधितांमध्ये समावेश आहे. सर्व बाधितांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क - (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# आता छत्रपती संभाजीनगर गाठा अवघ्या तासाभरात!

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

गेल्या काही दिवसापूर्वी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते विकासासंदर्भात महत्त्वाची बैठक पार पडली. यात जळगाव ते छत्रपती संभाजीनगरचा प्रवास अवघ्या १ तासात पूर्ण होईल, असा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

या बैठकीस केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार देवयानी फरांदे, मंगेश चव्हाण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दरम्यान, औट्रम घाटातील बोगदा (टनल) आणि व्हायाडक्ट या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२.७५ किमी लांबीच्या रस्त्याच्या बोगद्याचे काम हाती घेण्यात येणार असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी अंदाजे २६०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



> जळगाव ते छत्रपती संभाजीनगर महामार्गाव्दारे बसव्दारे पोचण्यास किमान दोन ते अडीच तासांचा कालावधी लागतो. त्याऐवजी चाळीसगाव औट्रम घाट बोगदा रस्ता मार्गे प्रवासाला लागणारा कालावधी अवघ्या एक तासात होणार आहे. यामुळे चाळीसगाव, खान्देश आणि मराठवाडा यांच्यासाठी हा एक क्रांतिकारी टप्पा असून या प्रकल्पामुळे अंतर कमी होईलच. यासह, वाहतूक सुरळीत होऊन आर्थिक आणि सामाजिक विकासालाही चालना मिळणार आहे.
>
> **-गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री**

समृद्धी महामार्गाला जोडणारा मार्ग जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान नाही. त्यासाठी कन्नड औट्रम घाटातून बोगदा तयार करुन छत्रपती संभाजीनगर समृद्धी महामार्गाला हा रस्ता जोडणे शक्य आहे. यासाठी गेल्या काही वर्षापासून स्थानिक आमदार मंगेश चव्हाण, खासदार स्मिता वाघ यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या बैठकीदरम्यान चर्चा होऊन या रस्ते कामाच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला औट्रम घाटातील प्रकल्प मार्गी लागणार आहे.



# बनावट कागदपत्रांद्वारे मनपाची निविदाधारकाकडून फसवणूक

## कारवाई करण्यास अधिकाऱ्यांचा कानाडोळा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

महापालिकेच्या बांधकाम विभागाने सुरक्षा रक्षक नियुक्तीसाठी निविदा प्रसिध्द केली होती. या निविदेत आठ संस्थांनी निविदा दाखल केल्या होत्या. त्यापैकी दोन संस्थांनी चक्क बनावट दाखले जोडल्याचे निदर्शनास आले होते. संबधित मक्तेदाराने महापालिका प्रशासनाची फसवणूक केलेली असतांना या प्रकरणी महापालिका प्रशासनाने कानाडोळा करीत संबधित संस्था चालकांविरूध्द अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही. दरम्यान महापालिका प्रशासनाबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

जळगाव शहर महानगरपालिका १७ मजली इमारतीत व इतर मनपा मालकिच्या मिळकतीच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे कामाची निविदा मनपाच्या बांधकाम विभागाने काढली होती. यात आठ मक्तेदारांनी आपल्या निविदा दाखल केल्या होत्या. त्यापैकी काही मक्तेदारांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्यामुळे ७ मार्च २०२५ रोजी मनपाच्या बांधकाम विभागाने शॉर्ट फॉलद्वारे कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर मे. सान्वी मल्टीसर्विसेस व सत्यनारायण सिक्यूरिटी फोर्स यांनी बनावट दाखला तसेच अनुभव सर्टिफिकेट महापालिकेला सादर केले होते. ही बाब लक्षात घेता इतर निविदाधारकांनी मे. सान्वी मल्टी सर्विसेस व सत्यनारायण सिक्यूरिटी फोर्स यांनी बोगस कागदपत्र सादर केल्याचे पत्र २७ मार्च रोजी बांधकाम विभागाला दिले होते. त्या नुसार ४ एप्रिल रोजी बांधकाम विभागाने संबधित विभागांना पत्र पाठवून मक्तेदाराने सादर केलेले दाखले खरे की, खोटे यांचा खुलासा करावा, असे आवाहन केले होते. त्या अनुषंगाने संबधित विभागांनी ते दाखले त्यांच्याकडून देण्यात आलेले नसल्याचा खुलासा केला त्यावरून मे. सान्वी मल्टीसर्विसेस व सत्यनारायण सिक्यूरिटी फोर्स यांनी सादर केलेले दाखले बनावट असल्याचे निष्पन्न झाले त्यामुळे दोन्ही संस्थांना निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात आले मात्र, महापालिका प्रशासनाची फसवणूक केल्या प्रकरणी संबधित दोन्ही संस्थांच्या मालकांवर गुन्हा दाखल करणे आवश्यक असतांना मनपा प्रशासनाने त्याकडे कानाडोळा केला. त्यामुळे महापालिका प्रशासन संबधित मक्तेदारांना पाठीशी घालत आहे की, काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### प्रशासनाच्या कामकाजावर शंका!

या संदर्भात मनपाचे शहर अभियंता योगेश बोरोले यांना विचारणा केली असता संबधित दोन्ही मक्तेदारांना बनावट कागदपत्र सादर केल्याप्रकरणी निविदा प्रक्रियेत अपात्र करण्यात आलेले आहे. तसेच यानंतर त्यांना महापालिकेच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेता येवू नये म्हणून त्या दोन्ही संस्थांना ब्लॅक लिस्ट करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. परंतु चार महिने झाले तरी, अद्याप संबधित संस्थांवर ब्लॅकलिस्ट करण्यासंदर्भात मनपा प्रशासनाने कोणतीही हालचाल केलेली दिसून येत नसल्याने मनपा प्रशासनाच्या कामकाजावर शंका उपस्थित होत आहे.



### मनपा प्रभाग रचनेवर ११ हरकती दाखल

**जळगाव :** महापालिकेतर्फे जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर आत्तापर्यंत ११ हरकती दाखल झाल्या आहेत. सोमवारी ८ सप्टेंबर रोजी माजी नगरसेवक सदाशिव ढेकळे, ज्योती बाळासाहेब चव्हाण, स्वप्नील अशोक परदेशी या तिघांनी प्रभाग बदलाबाबत हरकत दाखल केली आहे.

# केळी महामंडळ स्थापनेच्या घोषणेची अंमलबजावणी करा

## राष्ट्रवादीचे नेते आमदार खडसे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी अस्तित्वात नसलेल्या केळी विकास महामंडळासाठी १०० कोटी निधी देण्याची घोषणा केली होती. मात्र अजूनही त्याची पूर्तता नाही. ही एक प्रकारे केळी उत्पादक शेतकऱ्यांची थट्टा आहे. केळीवर वारंवार येणारे रोग, केळी उत्पादकांना कोणतीही सुविधा उपलब्ध नसणे. अचानक कमी होणारे केळीचे भाव इत्यादी बाबींचा विचार करता तात्काळ केळी विकास महामंडळ स्थापनेच्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात यावी, अशा मागणीचे पत्र राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.



राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, जळगाव जिल्हा हा महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सर्वाधितक केळी पिकवणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली, परंतु जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादकांच्या समस्यांकडे लक्ष दिले गेले नाही. याचा परिणाम केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आज एक प्रकारे फार मोठे नैराश्य निर्माण झालेले आहे. जेव्हा केळी पिकाचे उत्पादन जास्तीचे होते, तेव्हा केळीचे भाव कोलमडतात. केळी उत्पादक शेतकऱ्यांना अक्षरशः नगण्य ४०० रुपये क्विंटल भाव मिळत असल्याने शेतातील केळीची तोडणी करून ती बाजारात विक्री करण्यासाठी आणणे सुद्धा परवडत नाही अक्षरशः रस्त्यावर शेतकऱ्यांना केळी फेकून द्यावी लागत असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

### केळीवर रोगांचा प्रादुर्भाव

केळी पिकाचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर आहे. अशातच केळीवर मागील काही वर्षांपासून करपा व सी. एम. व्ही. या रोगांचा सार्वत्रिक प्रादुर्भाव होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना उभी केळीचे पिक फेकून द्यावे लागत आहे. मागील दहावर्षात शासनाने केळी विकास महामंडळ स्थापनेबाबत ४ ते ५ वेळा घोषणा केली. ३१ डिसेंबर २०१५ रोजी मुक्ताईनगर येथील सुतगिरणीच्या कार्यक्रमात आपण स्वतः महामंडळ स्थापन करणेबाबत घोषणा केली होती. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जळगांव येथे शासन आपल्या दारी या कार्यक्रमात घोषणा केली. त्यापूर्वी २६ मे २०२३ रोजी तत्कालीन कृषी मंत्री दादा भुसे यांनी महामंडळ स्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे जाहीर केले. त्यानंतर तत्कालीन फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी २१ जुलै २०२३ रोजी सभागृहात विचारलेल्या प्रश्नावर दोन महिन्यात केळी विकास महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले. मात्र आजपर्यंत त्याची पूर्तता झाली नाही. तरी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्यादृष्टीने तत्काळ केळी विकास महामंडळ स्थापनेच्या घोषणेची अंमलबजावणी करावी अशी मागणी आमदार खडसे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# शस्त्र परवानाधारक मणियार बंधूंच्या चौकशीकडे लक्ष

## आमदार चव्हाण यांचा पाठपुरावा सुरूच

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

तक्रार घेऊन आलेल्या महिलेच्या प्रकरणात नैतिकतेला सोडुन कृत्य,असा ठेवत पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना निलंबित करण्यात आले.परंतु याच प्रकरणाशी सबंधित मणियार बंधुना शस्त्र परवाना देण्यात आला आहे, त्यासंदर्भात अधिकाऱ्यांना कारवाई करावीच लागणार आहे. कारवाईत चालढकल करता येणार नाही. याकडे आपण गृह विभागाचेही लक्ष वेधले आहे,असे आ.चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे प्रशासन आता काय भूमिका घेते? याकडे लक्ष लागले आहे.

आमदार चव्हाण यांनी हे प्रकरण जाहीररित्या मांडल्याने प्रशासनाच्या कार्यपध्दतीचे वाभाडे निघाले आहे. प्रशासनात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेपच नाही तर तेच प्रशासन चालवित होते,असा खळबळजनक आरोप मंगेश चव्हाण यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केला होता. पीडित महिला एका प्रकरणी पोलीस निरीक्षकाकडे आली. त्यानंतर निरीक्षकाने तिच्याशी जवळीक साधत तिचे शोषण केले,याकामात मणियार बंधूंनी महिलेवर दबाव टाकल्याचे आ. चव्हाण यांनी सांगितले होते. तसेच या दोन्ही मणियार बंधूंचा प्रशासनात दबदबा आहे, याकडेही आमदार चव्हाण यांनी सभागृहाचे लक्ष वेधले होते.

### माघारी फिरलेल्या महिलेचे काय?

महिला एमआयडीसी पोलीस ठाण्यात आली. त्यानंतर आमदार मंगेश चव्हाण यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे गाठुन ठिय्या मांडला. पीडितेला न्याय देण्यासाठी आपण ठाम तिच्या पाठीशी आहोत, दोषी कोणी का असेना त्यांच्यावर कारवाई व्हावी,याचा आपण पाठपुरावा करु,असेही आ. चव्हाण म्हणाले होते. मी शनिवारी सकाळी येते,असे सांगुन रात्री महिला पोलीस ठाण्यातून निघुन गेली. मात्र शनिवारी ते पोलीस ठाण्यात आली नाही. महिला पोलीस ठाण्यात येऊ न शकल्याची कारणे काय? पीडितेला धाक दाखविला किंवा कसे? याबद्दल अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. आ.मंगेश चव्हाण यांनी शस्त्र परवानासंदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाची उकल प्रशासनाला करावी लागणार असुन उत्तरेही द्यावे लागतील.

### गृह विभागाकडे विचारणा करणार

या मध्यस्थी बंधुना शस्त्र परवाना दिला आहे, या बंधुना शस्त्र परवाना देण्यामागचे कारणे काय? किंवा त्यांना शस्त्र बाळगण्याची गरज का भासली?याबद्दलची पूर्तता झाली किंवा कसे? असे प्रश्न आमदार चव्हाण यांनी उपस्थित केले आहे. याप्रकरणी तत्काळ चौकशी आणि कृतीची अपेक्षा आहे.आणि तसा भरवसा आहे,असाही विश्वास आ.चव्हाण यांनी व्यक्त केला असुन गृह विभाग सचिव यांच्याकडे हा विषय मांडणार आहोतच, मुख्यमंत्री यांचीही भेट घेवुन लक्ष वेधणार आहोत,असे आमदार चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

# शेतकरी प्रश्नांवर जनआक्रोश मोर्चाची तयारी

## जळगावमध्ये उद्या समितीतर्फे नियोजन बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

निवडणुकीवेळी घोषणा केलेली सरसकट शेतकरी कर्जमाफी, फळ पीकविमा नुकसानभरपाई तत्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, कापूस, सोयाबीन, उडीद, मूग, मका आदी पिकांचा प्रधानमंत्री पीकविमा योजनेचे निकष पूर्ववत करावेत यांसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी जनआक्रोश मोर्चा समितीतर्फे जनआक्रोश मोर्चा काढण्याची तयारी केली आहे.

दरम्यान, शेतकरी जनआक्रोश मोर्चा समितीतर्फे शेतकरी जनआक्रोश मोर्चासंदर्भात चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राजकीय पक्षविरहित नियोजन बैठक बुधवारी (१० सप्टेंबर)सकाळी दहाला शहरातील अजिंठा शासकीय विश्रामगृहात घेण्यात येणार आहे, असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते गुलाबराव वाघ यांनी सांगितले. जिल्ह्यातीलच नाही तर राज्यभरातील शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. त्यात जळगाव जिल्ह्यातील कापूस, केळी, सोयाबीन व सर्व पीक उत्पादकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी, प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शेतकरी जनआक्रोश मोर्चा काढण्याचे नियोजन शेतकरी जनआक्रोश मोर्चा समितीतर्फे करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीवेळी घोषणा केलेली सरसकट शेतकरी कर्जमाफी, फळ पीकविमा नुकसानभरपाई तत्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, तसेच कापूस, सोयाबीन, उडीद, मूग, मका आदी पिकांचा प्रधानमंत्री पीकविमा योजनेचे निकष पूर्ववत करावेत, उत्पादित शेतमालाला नसलेला भाव, शासनाने कापूस पिकावर काढून घेतलेले आयात शुल्क, तसेच पावसाच्या खंडामुळे झालेले नुकसान, मागील पंधरवड्यात झालेली अतिवृष्टी यांमुळे शेतपिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी पुरता हैराण झाला आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत शेतकरी जनआक्रोश मोर्चासंदर्भात चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राजकीय पक्षविरहित नियोजन बैठक बुधवारी (१० सप्टेंबर) सकाळी दहाला शहरातील अजिंठा शासकीय विश्रामगृहात होणार आहे. बैठकीस जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी जनआक्रोश मोर्चा समितीतर्फे करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांत साखरेच्या अतिसेवनावर जनजागृतीसाठी 'नो शुगर' उपक्रम

## जिल्हा परिषद शालेय स्तरावर लावणार माहितीपर फलक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या साखरयुक्त पेय व पदार्थांच्या सेवनामुळे उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची दखल घेऊन जिल्हा परिषदेतर्फे 'नो शुगर' अभिनव व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये 'नो शुगर' फलक लावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या फलकांमध्ये विविध शीतपेयांमधील ॲडेड शुगरचे प्रमाण स्पष्टपणे दर्शविण्यात आले असून, विद्यार्थ्यांना प्रक्रिया केलेल्या साखरेचे दुष्परिणाम समजावून सांगितले जात आहेत. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रक्रिया केलेल्या साखरेपासून होणारे धोके पटवून देणे तसेच निरोगी जीवनशैलीकडे विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा आहे. साखरेचे अतिसेवन टाळल्यास मधुमेह, वजनवाढ यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. शालेयस्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये योग्य आहारशिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी 'नो शुगर' उपक्रम प्रभावी ठरणार आहे. जिल्हा परिषदेचा हा उपक्रम आरोग्यदृष्ट्या फायदेशीर, शाळांमध्ये वापरयोग्य आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी दीर्घकालीन परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.








# आठव्या वेतन आयोगासह मागण्यांसाठी जळगावात २३ सप्टेंबरला धरणे आंदोलन

## जिल्हा परिषद कर्मचारी महासंघातर्फे तयारी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

जिल्हा परिषद कर्मचारी महासंघातर्फे आठव्या वेतन आयोगासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी २३ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद इमारतीसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनाबाबतचे निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांना देण्यात आले.

जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने निवेदनात म्हटले आहे की, आठव्या वेतन आयोगाची समिती तत्काळ गठीत करून १ जानेवारी २०२६ पासून लागू करणे, पीएफआरडीए कायदा व चार कामगार संहिता रद्द करणे, कंत्राटी धोरण रद्द करून १० वर्षे सातत्याने सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करणे यांसह इतर मागण्या करण्यात आल्या आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना रुग्णालयांत मोफत उपचार मिळावेत व विनाअट अनुकंपा प्रतीक्षा यादीतील कर्मचाऱ्यांना नियुक्त्या द्याव्यात, अशा मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्यांसाठी २३ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद इमारतीसमोर कर्मचारी धरणे आंदोलन करणार असून, यासाठी नियोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष डी. एस. पाटील, सचिव सलीम पटेल, ग्रामसेवक युनियनचे नंदकुमार गोराडे, संजय भारंबे, वाहनचालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत चौधरी, प्रसिद्धिप्रमुख राजू सोनवणे पवार, आप्पा बैसाने आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंप्राळा उड्डाणपुलावरील पथदिवे बंदमुळे गैरसोय

**जळगावः** शहरातील पिंप्राळा रेल्वे उड्डाण पुलावरील पथदिवे गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

यासंदर्भात जळगाव महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (एमआरआयडीसी) आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत शाखेला पत्र पाठवून तातडीने बंद पथदिवे सुरू करावे अशी पत्राद्वारे मागणी केली आहे. पिंप्राळा रेल्वे उड्डाणपूल तयार होऊन दीड ते दोन वर्षे झाली आहेत. या पुलाची देखभाल व दुरुस्ती रेल्वे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या पुलावरील पथदिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी पुलावरून जाणाऱ्या नागरिकांना अंधारात प्रवास करावा लागत असून, अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे या पुलावर अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे....



### सार्वजनिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**जळगाव :** असोदा (ता. जळगाव) येथील सार्वजनिक विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. सर्वोदय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अनिल महाजन यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. सचिव विलास चौधरी, मुख्याध्यापक डॉ. मिलिंद बागूल, पर्यवेक्षक लालसिंग पाटील व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची प्रतिकृती साकारलेला ओम कोळी याची प्रमुख उपस्थिती होती. ओम कोळी याने विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे असणारे महत्त्व विशद केले. अनिल महाजन यांनी, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी, प्रगतीसाठी शिक्षक सतत प्रयत्नशील असतात. त्या प्रयत्नांचे आपल्या जीवनासाठी योग्य उपयोग करून घेऊन विद्यार्थ्यांनी नावलौकिक प्राप्त करावा, असे मत व्यक्त केले. लक्ष्मी जयकर, आरजू पिंजारी, श्रुतिका सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. शुभांगिनी महाजन यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मण भुगवड्या यांनी आभार मानले.



### प्रा. संजय नेवेंच्या निसर्गचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**जळगाव :** पी.एन.गाडगीळ ॲण्ड सन्स शोरूम येथील कलादालनात चोपडा येथील भगिनी मंडळ संचलित ललित कला केंद्र या अनुदानित कला संस्थेतील प्रा. संजय मनोहर नेवे यांचे 'सेरीनीटी फाउंड म्हणजे निसर्गातील शांतता' या विषयांवरील निसर्गचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन राज्य विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रा.संजय नेवे यांच्या शिक्षिका व चित्रकर्ती गुरुमाई अंजली गुलजार गवळी, इंदूर, डॉ. अमित भंगाळे, शालिग्राम भिरुड, पीएनजी गाडगीळ अँड सन्सचे व्यवस्थापक गिरीश ढेरे, प्राचार्य राजेंद्र महाजन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्योजक आशिष अरुणलाल गुजराथी, प्राचार्य सुनील बारी, प्रा.विनोद पाटील, प्राचार्य पुरुषोत्तम घाटोळ यांनी सहकार्य केले. मनोज जंजाळकर, विनोद चव्हाण, तरुण भाटे, डॉ. प्रणय वाणी, डॉ. अपर्णा वाणी, योगेश व रुपाली सुतार, जागृती नेवे, पुष्कर वाणी, भुवनेश, नचिकेत नेवे यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली. याप्रसंगी मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. कलाशिक्षक परमेश्वर रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. वसंतलाल गुजराथी, योगेंद्र भोळे, बन्सीलाल परमार, कवयित्री पौर्णिमा हुंडीवाले, कलाध्यापक जिल्हाध्यक्ष एन.ओ.चौधरी, सचिव अरुण सपकाळे, कलाशिक्षक श्याम कुमावत, वसंत नागपुरे, पंकज नागपुरे, वाय.आर.पाटील, उल्हास सुतार आदी उपस्थित होते.



### श्री सिद्धिविनायक मंदिरात गणेश चतुर्थीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**जळगाव :** श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर येथे गणेश चतुर्थीला श्री व सौ सतीश सोमाणी यांच्यातर्फे श्री गणपतीची मूर्ती देण्यात आली व त्यांच्याच हस्ते गणपतीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर सत्यनारायणाची पूजा श्री हर्षल व सौ. दीक्षा सातपुते यांच्या हस्ते करण्यात आली. आरतीसाठी माजी नगरसेवक सचिन पाटील, माजी महापौर सीमाताई भोळे, तसेच पिंटू काळे व दीपमाला काळे हे उपस्थित होते. ह्यावेळी विविध स्पर्धा व कार्यक्रम घेण्यात आले. सिद्धिविनायक मंदिरातर्फे जनरल हेल्थ चेकअप कॅम्प हे डॉ. सौ. सृष्टी जैन तारा लॅबोरेटरी यांच्यातर्फे घेण्यात आला. ५० हून अधिक महिलांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. रेल्वे कॉलनी महिला मंडळ व सुरभी महिला मंडळातर्फे श्री गणपती अथर्वशीर्ष आवर्तन करण्यात आले. शिवाजी पाटील यांच्यातर्फे महाप्रसाद देण्यात आला. श्री सिद्धिविनायक गणपती मंडळातर्फे लहान मुलांसाठी व महिलांसाठी वेगवेगळे प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले. धार्मिक प्रश्नोत्तर स्पर्धेत प्रथम मोरया ग्रुप, द्वितीय लंबोदर ग्रुप (सुरभी), तृतीय गजानन ग्रुप व उत्तेजनार्थ सिद्धिविनायक ग्रुपला बक्षीस देण्यात आले. स्पर्धेचे नियोजन रुपेश व सौ. स्वाती झवर यांनी केले. कार्यक्रमासाठी रेल्वे कॉलनी श्री सिद्धिविनायक मंडळ, सुरभी महिला मंडळ, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

### ढगांच्या लपंडावात अनुभवला खग्रास चंद्रग्रहणाचा आनंद

**जळगाव :** रविवारी झालेल्या खग्रास चंद्रग्रहणाच्या वेळी ढगांच्या लपंडावात



खगोलप्रेमींनी खग्रास चंद्रग्रहणाचा आनंद लुटला. रात्री ८ वाजून ५८ मिनिटांनी चंद्राने पृथ्वीच्या विरळ सावलीला स्पर्श केला आणि ग्रहणाला सुरुवात झाली. काही भागात ढग असायचे तर काही भागात आकाश मोकळे असायचे हा निसर्गाचा खेळ सुरु असल्याने ग्रहण बघण्यात बराच व्यत्यय येत होता. चंद्र जवळजवळ १ तास २३ मिनिटे खग्रास स्थितीत म्हणजे पृथ्वीच्या गडद छायेत होता. हे चंद्रग्रहण एकूण ५ तास २७ मिनिटे चालले. या प्रसंगी जळगाव खगोलप्रेमी ग्रुपचे खगोल अभ्यासक अमोघ जोशी, इमरान तडवी, चिन्मय बारुदवाले, किरण वंजारी, रेवती वंजारी आणि अक्षय भंडारी उपस्थित होते.



### चैतन्यनगर ज्येष्ठ नागरिक संघात आरोग्य शिबीर

**जळगाव :** चैतन्य नगर ज्येष्ठ नागरिक संघात महात्मा फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी हृदय, डोळे तपासणी, ईसीजी, बीपी, छत्रपती शाहू महाराज हॉस्पिटल, जळगाव पीपल बँक, रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट संयुक्त विद्यमाने शिबीर घेण्यात आले. यावेळी डॉ. चंदन चौधरी, डॉ. मकरंद पाटील, डॉ. अविनाश कुळकर्णी, सचिन सोनार, नर्सिंग स्टाफ राखी शिर्के, राणी मांढरे, रवी मोरे यांनी सहकार्य केले. संघाच्या ६५ सभासदांनी आरोग्य तपासणी केली. शिबीर यशस्वीतेसाठी कार्यकारिणी सदस्य यांनी परिश्रम घेतले. आरोग्य तपासणी करणाऱ्यांचा ॲड. अरुण धांडे, सचिव विकास बोरोले यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# धाविक पक्ष्यांच्या संवर्धनासाठी माळराने वाचवण्याची गरज

## 'इंडियन बर्डस्' मध्ये जळगावच्या दोन तरुणांचे संशोधन

**जळगाव, ८ सप्टेंबर :** जळगाव शहर लगतच्या माळरानावर धाविक पक्ष्यांवर वन्यजीव संरक्षण संस्थेच्या राहुल सोनवणे व प्रसाद सोनवणे यांनी दोन वर्ष संशोधन केले. त्यांचा हा अभ्यास इंडियन बर्ड्स या आंतरराष्ट्रीय पक्षी विज्ञान पत्रिकेत प्रसिध्द करण्यात आला आहे. धाविक पक्ष्यांच्या संवर्धनासाठी माळराने वाचविण्याची गरज आहे,याकडे या अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे.

भारतीय धाविक हा तसा महाराष्ट्रभर तुरळकपणे आढळणारा पक्षी. या पक्ष्याच्या जिल्ह्यात खूपच कमी नोंदी आहेत. अलिकडे भारतीय धाविक पक्षी जळगाव शहरालगत आढळून येत असून त्यांचे प्रजनन ही या भागात होत आहे. वन्यजीव संरक्षण संस्थेच्या प्रसाद व राहुल सोनवणे या पक्षी अभ्यासक जोडीने सलग दोन वर्ष या दुर्मिळ पक्ष्याच्या चार जोड्यांचा अभ्यास करुन त्यांच्या प्रजनन काळाचा अभ्यास केला. विशेष म्हणजे २ वर्षात सुरक्षित अंतर ठेवत पक्षांना बाधा होईल असे कोणत्याही प्रकारे कृत्य न करता हा शास्त्रशुद्ध अभ्यास केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर या परिक्षणाची दखल घेतली गेली. त्यांचा शोध निबंध नुकताच इंडियन बर्डस् या आंतरराष्ट्रीय पक्षी विज्ञान पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, अहिल्यानगर, दीपक घाणेकर, जमीर शेख (उपवनसंरक्षक, यावल) यांचे मोलाचे मार्गदर्शन व मयुरेश कुळकर्णी, बाळकृष्ण देवरे, ध्रुव सोनवणे, मयुरेश सोनवणे, योगेश गालफाडे, रवींद्र फालक, चेतन भावसार, सतीश कांबळे, मिलिंद दातार यांचे सहकार्य लाभले. धाविक पक्ष्याच्या प्रजनन काळाच्या अभ्यासात अंड्यांची न बदलणारी संख्या (प्रत्येक घरट्यात दोन अंडे ), नर व मादी



दोघांचा अंडी उबावण्यात तसेच पिलांचे पालन पोषण यातील सहभाग, ब्रोकन विंग डिस्प्ले, खडतर हवामानाला तोंड देण्याची क्षमता, अंडी, प्रौढ व पिल्ले यांची परिसरात बेमालूमपणे मिसळून जाणारी रंगसंगती, इतर वेळी तसा नगण्य आवाज करणारे हे पक्षी पिलांच्या संगोपनावेळी मात्र काढत असलेला विशिष्ट आवाज, पूर्णतः शुष्क माळरानावर राहून देखील पालक पक्षी पिलांसाठी करत असलेली पाण्याची सोय, सर्व घरट्यांपाशी गुरांच्या शेणाचा वापर, या पक्ष्यांच्या अस्तित्वासाठी असलेले संभाव्य धोके इ. अंगांचा या अभ्यासात समावेश आहे.

**मानवी हस्तक्षेप धोकादायक**

धाविक पक्ष्यांच्या प्रजनन सवयींच्या अभ्यासा दरम्यान अंडी उबवण्याच्या प्रक्रियेत एका जोडीला अत्यंत प्रतिकूल हवामानाला सामोरे जावे लागले. यात अवकाळी पाऊस, गारपीट, वादळ, आणि दुपारचे रखरखीत ऊन अशा टोकाच्या हवामान स्थितीचा समावेश होता. अशा खडतर स्थितीतही या पक्ष्यांनी यशस्वीरित्या आपल्या अंड्यांचे रक्षण करून पिलांना जन्म दिला. प्रतिकूल हवामानातही आपले कार्य नेटाने करण्याची काटक वृत्ती या पक्ष्यांमध्ये दिसून आली. परंतु धाविक पक्ष्याच्या एका जोडीने घरट्या लगत मानवी हालचाल सुरु झाल्यामुळे अंड्यांचा त्याग केला, म्हणजे थोडाही मानवी हस्तक्षेप या पक्ष्यांसाठी धोकादायक ठरु शकतो हे लक्षात येते.

**धाविक संवेदनशील पक्षी**

भारतीय धाविक हा खूप अधिवास संवेदनशील पक्षी असून उघडी माळराने, पडीक जमिनी, काटेरी झुडुपे, जंगले, गवताळ प्रदेश ही त्याची अधिवास क्षेत्रे आहेत. परंतु अशा जागांवर शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे ताण पडत असून धाविक पक्ष्याचा अधिवास यामुळे नष्ट होत आहे. धाविक सारख्या अधिवास संवेदनशील पक्ष्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी माळराने व गवताळ प्रदेश वाचवणे आवश्यक आहे, असे वन्यजीव संरक्षण संस्थेचे अभ्यासक राहुल सोनवणे, आणि प्रसाद सोनवणे यांनी स्पष्ट केले.

# कांताई जैन यांच्या स्मृतिदिनी ४४५ सहकाऱ्यांचे रक्तदान

### ५५० जणांना स्नेहाची शिदोरीचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांच्या पत्नी स्व. सौ. कांताबाई जैन यांच्या स्मृतिदिनानिमित्त यावर्षी ४४५ सहकाऱ्यांनी रक्तदान केले. तसेच जळगाव शहरातील सेवाभावी संस्थांमध्ये 'स्नेहाची शिदोरी' या उपक्रमांतर्गत सुमारे ५५० जणांना मिष्टान्न पाकिटांचे वाटप करण्यात आले.

स्व. सौ. कांताबाई जैन यांच्या स्मृतिदिनानिमित्त कंपनीच्या देशभरातील प्रमुख आस्थापनांमध्ये रक्तदान शिबीर घेण्यात आले होते. यात जैन प्लास्टिक पार्क येथे २१७, फूड पार्क ११७ , अलवर ४, बडोदा ९, चित्तूर २५, हैदराबाद ८, उदमलपेट येथील ६ सहकाऱ्यांनी रक्तदान केले. कंपनीचे संस्थापक भवरलालजी जैन यांनी सुरु झालेल्या सामाजिक कार्याला आजही तितक्याच जोमाने प्रवाहित ठेवले आहे. स्व. कांताबाई जैन यांच्या स्मृतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबीर हे त्याचेच एक प्रतीक होय. फूड पार्क येथील रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन विजय मुथा यांनी केले. यावेळी व्ही.पी.पाटील, सुनील गुप्ता, संजय पारख, किशोर बाविस्कर, जी. आर. चौधरी, जी.आर.पाटील आणि इतर सहकारी उपस्थित होते. फूड पार्क येथे एकूण ११७ सहकाऱ्यांनी रक्तदान केले. गोळवलकर ब्लड बँक, गोदावरी ब्लड बँकेने रक्तसंकलन केले.



**यांची होती उपस्थिती**

प्लास्टिक पार्क येथील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी रेडक्रॉस बल्ड बँकेच्या चेअरमन मंगला ठोंबरे, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, रेडक्रॉसच्या पीआरओ उज्ज्वला वर्मा, डॉ.राजकुमार वाणी, जिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर राहुल पाटील, डॉ.विद्या शिरसाठ, डॉ.कपिल पाटील, जैन इरिगेशनचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट सी.एस.नाईक, राजश्री पाटील, किशोर बोरसे, डॉ. अश्विनी पाटील, अश्विनी खैरनार के.बी.सोनार, गोरख म्हेत्रे, डॉ.अनिल पाटील, डॉ. ज्ञानेश्वर पाटील, के.एल.नेमाडे, मानव संसाधन आणि कार्मिक विभागातील सहकारी उपस्थित होते.

# बंद घरातून सव्वा लाखाचे दागिने लंपास

**जळगाव :** दरवाजाला कुलुप दिसताच चोरट्यांनी ते तोडुन आतमध्ये एन्ट्री केली. कपाटातील सामान अस्ताव्यस्त केला. सोन्याचे सुमारे १ लाख २७ हजार पाचशे रुपयांचे दागिने हाती लागताच फरार झाले. कुटुंबातील सदस्य घरी आल्यावर हा प्रकार उघडकीस आला. शनिवारी (६ सप्टेंबर) सायंकाळी साडेचार ते रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास गणराया विसर्जनाच्या धुमधामीत चोरट्यांनी ही संधी साधली. दूध फेडरेशनजवळ श्री अपार्टमेंट नारायणी पार्क, येथे ही घटना घडली.

प्रसाद शशीकांत पवार (वय ४२, रा. प्लॅट नं.६, श्री अपार्टमेंट नारायणी पार्क, दूध फेडरेशनजवळ) कुटुंबासह वास्तव्यास आहेत. ते मनपामध्ये कार्यरत आहेत. प्रसाद पवार हे नेहमीप्रमाणे ड्यूटीवर होते. दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास कुटुंबातील सदस्य साडेचार वाजता गणेश विसर्जनानिमित्त घराच्या दरवाजाला कुलुप लावून घराबाहेर पडले. हे बंद घराला चोरट्यांनी लक्ष्य करुन कपाटातील मुद्देमाल चोरुन नेला. पोलीस उपनिरीक्षक अशोक खेडकर तपास करीत आहेत.

**असा नेला मुद्देमाल**

सुमारे ४५ हजार किमतीची १८ ग्रॅम वजनाची सोन्याची लहान गंठण, ६७ हजार ५०० रुपये किमतीचे २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे एक गोल पॅन्डल असलेले मोठे गंठण, १२ हजार ५०० रुपये किमतीचे साडेतीन ग्रॅम वजनाचे काळ्या मण्यात गाठलेले सोन्याचे मनी व मंगळसूत्र, अडीच हजार किमतीचे एक ग्रॅम वजनाचे बदाम आकाराचे त्यात ओम चिन्ह असलेले पेन्डल असा एकूण १ लाख २७ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे ५० शिक्षकांचा सत्कार

## शिक्षक दिनानिमित्त राकाँ शिक्षक सेलतर्फे उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिक्षक सेल तर्फे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंती तसेच शिक्षक दिनानिमित्त ५० शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

शिक्षक सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पक्ष निरीक्षक भास्कर काळे उपस्थित होते. याप्रसंगी मनोज भालेराव व प्रवीण धनगर यांच्या महाराष्ट्रभर गाजलेल्या उपक्रमांची दखल घेत त्यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षक संजय क्षीरसागर यांनी सादर केलेल्या महाराष्ट्रगीताने झाली. त्यांना राजू क्षीरसागर व सागर चौधरी यांनी संगीत साहाय्य केले.

प्रास्ताविक शिक्षक सेलचे महानगर अध्यक्ष मनोज भालेराव यांनी केले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगर अध्यक्ष एजाज़ मलीक, प्रशासन अधिकारी खलील शेख, शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार, प्रमुख वक्ते रामचंद्र पाटील, जिल्हा समन्व्यक विकास पवार, विलास पाटील, प्रभाकर पारवे, संग्रामसिंग सूर्यवंशी, रिजवान खाटीक, अशोक लाडवंजारी, शाम ठाकरे, अजित चौधरी, गोविंदा लोखंडे, गणेश लोडते, तुळशीराम सोनवणे व दिलीप पाटील हे उपस्थित होते.

**यांनी घेतले परिश्रम**

यशस्वीतेसाठी शिक्षक सेलचे अध्यक्ष मनोज भालेराव, सचिव प्रवीण धनगर, कार्याध्यक्ष मुश्ताक भिस्ती, पंकज सुर्यवंशी, ज़िया बागवान, विजय विसपुते यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिक्षक सेलचे कार्याध्यक्ष सागर पाटील यांनी तर आभार उपाध्यक्ष मुश्ताक भिस्ती यांनी मानले.

# डोंबिवली नागरी सहकारी बँकेचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

डोंबिवली नागरी सहकारी बँकेचा ५५ वा वर्धापन दिन जळगाव येथे ६ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. हेडगेवार यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलन ग्राहकांच्या हस्ते करण्यात आले. वर्धापनदिनी शाखेत पर्यावरण पूरक वसुंधरा या विषयाचे गांभीर्य व काळजी यासंदर्भात माहिती देण्यात आली.

वर्धापनदिनी शाखेच्या व्यवस्थापकांनी बँकेच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण केले. सध्या बँकेची आर्थिक स्थिती एकूण व्यवसाय रुपये ६३५० कोटीच्या जवळपास आहे. सध्या बँकेच्या महाराष्ट्र राज्यात ६६ शाखा कार्यान्वित आहेत. लवकरच सोलापूर आणि मध्य प्रदेशातील इंदूर व उज्जैन या शहरात शाखा कार्यान्वित होत आहेत. बँकेला दी महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनच्या आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा 'रु. २५०१/- ते ५०००/- कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका' या गटातून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला.

बँक मुदत ठेव व कर्जाच्या विविध योजना राबवत असून जळगाव शहरवासीयांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती शाखा व्यवस्थापकांनी मान्यवरांना केली.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून बँकेतर्फे कुसुमताई फाउंडेशन निस्वार्थ सेवा, संस्था जळगाव शहरात गेल्या नऊ वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. दररोज सायंकाळी सातनंतर रस्त्यावरील निराधार आजी-आजोबा व गरजवंतांना जेवण देण्याचे व आजारी असल्यास औषधी देणे, जखमी असल्यसा ड्रेसिंग करणे, रुग्णालयात दाखल करणे, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देणे, आजी-आजोबांना वृद्धाश्रमात प्रवेश मिळवून देणे, जळगाव जिल्हा सामाजिक न्याय अंतर्गत विधी सेवेतर्फे महिलांना शासकीय योजनांची माहिती देणे, सापडलेल्या लहान मुलांना बालनिरीक्षणगृहात दाखल करणे. रस्त्यावरील बेवारस व्यक्तीचा मृत्यू झाल्यास पोलीस ठाण्यांतर्गत अंत्यविधी सेवा करणे इ. कार्य संस्था करते. संस्थेच्या सामाजिक कार्याचे भान ठेवून बँकेने शाखेत संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. बँकेच्या वर्धापनदिनी शाखेत भेट देऊन ग्राहक, सभासद व हितचिंतकांनी बँकेच्या भविष्यातील व्यवसाय वृद्धीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिक्षकांचे चारित्र्य निष्कलंक असावे - प्रा.संजय दहाड

## रोटरी इलाईटतर्फे शिक्षकांचा गौरव

**जळगाव, ८ सप्टेंबर**

विद्यार्थी शाळेत केवळ शिकत नसतात तर आपल्या शिक्षकांचे वर्तन - आचरण यामुळे ते प्रभावित होत असतात. त्यासाठी शिक्षकांचे चारित्र्य निष्कलंक असले पाहिजे असे प्रा. संजय दहाड यांनी प्रतिपादन केले.

मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे झालेल्या शिक्षक गौरव सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्ष संदीप झंवर, मानद सचिव हरगोविंद मणियार, वोकेशनल कमिटी चेअरमन राजीव बियाणी, प्रोजेक्ट चेअरमन मनीषा खडके यांची प्रमुख उपस्थिती होती. मायेच्या स्तरावर जाऊन जो शिकवतो तो मास्तर. विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांबद्दल डिजिटल शिक्षण प्रणालीमुळे आदर कमी होत चालला असल्याचे ते म्हणाले. ए आय - चॅट जीपीटी हे विद्यार्थ्यांचे गुरु होत असून ते केवळ शिक्षण देऊ शकतील मात्र शिक्षक आणि आई-वडील यांना आपल्या मुलांना माणुसकी शिकवावी लागेल असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन करावे असे प्रा. दहाड यांनी आवाहन केले. सूत्रसंचालन महेश झंवर व समृद्धी रडे यांनी केले. आभार मनीषा खडके यांनी व्यक्त केले.



**यांचा झाला गौरव**

सोहळ्यात प्रा. डॉ. विवेक काटदरे, संजय खंबायत, हर्षा माळी, तरुण भाटे, प्रा. दिलीप भारंबे, अजित चौधरी, रेखा पाटील, अद्वैत दंडवते या शिक्षकांना गौरविण्यात आले. प्रा. व्ही. बी. शाह, सचिन चौधरी, एम. बी. झंवर, अर्चना चौधरी, समृद्धी रडे, अश्विनी लाठी यांचा सत्कार करण्यात आला. पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे कुटुंबीय प्रतिमा काटदरे, वैशाली भाटे, मनोज माळी, लीलावती पाटील, कल्पना भारंबे यांचाही सन्मान करण्यात आला.

# संविधान सन्मान संमेलन यशस्वीतेने देश बळकट होईल

## डॉ. अब्दुल करीम सालार : जळगावात बैठकीत नियोजनांवर चर्चामंथन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ८ सप्टेंबर**

विविध जाती, धर्म, भाषा, पंथ, विचार, राज्य आणि माणसे अशा साऱ्यांना एकत्रित ठेवून एकसंध असणाऱ्या भारत देशाला जागतिक स्तरावर एक नवी ओळख संविधानानेच दिली असल्याने होऊ घातलेल्या संविधान सन्मान संमेलनाने देशाला निश्चितपणे बळ मिळेल, असे मत स्वागताध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार यांनी व्यक्त केले.

राज्यस्तरीय सन्मान संविधान संमेलनाच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. संमेलनाचे संयोजक मुकुंद सपकाळे अध्यक्षस्थानी होते. डॉ. मिलिंद बागूल यांनी प्रास्ताविक केले. जयसिंग वाघ यांनी भूमिका विशद केली.



उद्योजक संजय इंगळे, चर्मकार महासंघाचे गणेश सुरवाडे, भगवान बाविस्कर, माजी नगरसेवक सुरेश सोनवणे, ॲड. राजेश गोयर, मनोहर गाढे, भगवान बाविस्कर, हरिश्चंद्र सोनवणे, भारती रंधे, नीलू इंगळे, चेतन नन्नवरे, दिलीप सपकाळे यांनी संमेलनासंदर्भात मार्गदर्शन केले.

साहेबराव बागूल, प्रीतिलाल पवार, प्रा. किसन हिरोळे, दिनकर सोनवणे, सोमा भालेराव, सचिन बिऱ्हाडे, दत्तू सोनवणे, सुभाष सपकाळे, भीमराव अडकमोल, वाल्मीक जाधव, ॲड. अभिजित रंधे, अनिल सुरडकर यांनी संमेलनाच्या नियोजनासंदर्भात सूचना केल्या.

पितांबर अहिरे, अशोक सपकाळे, ललित महिरे, चंदन बिऱ्हाडे, महेंद्र केदारे, आनंद तायडे, बाळू ढिवरे, यशवंत घोडेश्वर, चेतन नन्नवरे, गुलाब कांबळे, विनोद रंधे यांनी संमेलनात सहभागी होणाऱ्या मान्यवरांच्या सहभागाबद्दल व नियोजनाबद्दल माहिती दिली. बापूराव पानपाटील यांनी सूत्रसंचालन केले. जगदीश सपकाळे यांनी आभार मानले. बैठकीस बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

# 'उडान'मध्ये ७० विशेष मुलांची मोफत थेरपी

## जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त उपक्रम

**जळगाव :** जागतिक फिजिओथेरपी दिवसानिमित्त रुशील मल्टीपर्पज फाउंडेशन संचलित उडान दिव्यांग पुनर्वसन केंद्रात विशेष मुलांसाठी फिजिओथेरपी ट्रीटमेंटचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमात तज्ज्ञ फिजिओथेरपिस्टांनी मुलांच्या गरजेनुसार व्यायाम, थेरपी व मार्गदर्शन केले. मुलांच्या शारीरिक क्षमतांमध्ये सुधारणा व्हावी, दैनंदिन हालचाली सुलभ व्हाव्यात यासाठी विविध थेरपी तंत्रांचा वापर करण्यात आला. तसेच पालकांना घरच्या घरी करता येणाऱ्या व्यायामांची माहिती तज्ज्ञांनी दिली. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आनंद, आत्मविश्वास आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमासाठी गोदावरी फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जयंत नागुलकर, डॉ. कृतिका काळे यांचे विशेष सहकार्य लाभले. डॉ. साक्षी भारंबे, डॉ. ऋतुजा शार्दुल, डॉ. स्नेहल पाटील, डॉ. शुभम खंडारे, डॉ. नवी अग्रवाल आणि डॉ. प्रथमेश जोशी यांनी मुलांना थेरपी दिली.

फिजिओथेरपिस्टांनी पुढेही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले. तसेच उडान दिव्यांग पुनर्वसन केंद्रात प्रत्येक शनिवारी मोफत फिजिओथेरपी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी अध्यक्ष हर्षाली चौधरी, धनराज कासट यांच्यासह केंद्रातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमात साधारण ७० विशेष मुलांना मोफत थेरपी देण्यात आली.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### काकासाहेब प्राथमिक विद्यामंदिरात शिक्षक दिन साजरा

**नंदुरबार :** शहरातील हिरा प्रतिष्ठान संचलित श्री काकासाहेब हिरालाल मगनलाल चौधरी प्राथमिक विद्यामंदिर व संस्कृती शिशुविहार यांच्यातर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक रुपेश चौधरी अध्यक्षस्थानी होते. युवराज भामरे प्रमुख पाहुणे होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत शालेय कामकाज पाहिले. मान्यवरांनी प्रतिमापूजन करुन विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. नैना सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. सतीश काटके यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमिता नाईक, भारती मोरे, रवी चौधरी, शेखर पाटील, सुधाकर ठाकूर आदींनी सहकार्य केले.




### दादाश्री ट्युशन सेंटरमध्ये शिक्षक दिन सोहळा

**नंदुरबार :** ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा अनमोल वारसा देणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी दादाश्री ट्युशन सेंटरमध्ये शिक्षक दिन सोहळा उत्साहात पार पडला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका अंगीकारून अध्यापन केले. संचालक निखिल भट, सहसंचालिका अक्षदा भट, शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत भाषणे, कविता, गाणी, नाटिका आणि विनोदी प्रयोगांमधून शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. निखिल भट, अक्षदा भट यांनी मार्गदर्शन केले. दिवसभर विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडली. शिक्षकांचा विद्यार्थ्यांनी व संस्थेने एकत्रितपणे सन्मान केला.



### पटेल विद्यालयात विद्यार्थ्यांकडून अध्यापनकार्य

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका करत अध्यापनाचे कार्य केले. विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, समन्वयक, लिपिक, शिपाई अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या सांभाळल्या. विद्यार्थी शिक्षकांच्या वेशभूषेत उपस्थित होते. प्राचार्य पी. आर. साळुंखे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. पर्यवेक्षक एस. एन. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डी. व्ही. ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. एम. एल. जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमाला बी. बी. अग्रवाल, एस. के. पाटील, एम. व्ही. पावरा, बी. जे. गायकवाड, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.



### मुकेश पटेल सीबीएसई स्कूलमध्ये प्रतिमापूजन

**शिरपूर :** तांडे (ता. शिरपूर) येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या मंजू सिंह, प्रमुख अतिथी बाळू वाफारे यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. प्राचार्या मंजू सिंह यांनी, शिक्षक हा गुरु आहे, गुरु समाजाला दिशा प्रदान करण्याचे कार्य अविरत करत असतात, असे सांगितले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत अध्यापन केले. कार्यक्रमात संगीत वाद्य व नृत्य सादरीकरण झाले.



### पाटील महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती

**नंदुरबार :** शहरातील जी. टी. पाटील महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे समन्वयक डॉ. एम. एस. रघुवंशी यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कुलसचिव सुदेश रघुवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जयंती उत्सव समन्वयक डॉ. उपेंद्र धगधगे यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन व शिक्षक दिन याविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. मनोज शेवाळे, डॉ. धनंजय पाटील व प्रा. हर्षबोध बैसाणे यांनी परिश्रम घेतले.



### के. डी. गावित शैक्षणिक संकुलात शिक्षक दिन उत्साहात

**नंदुरबार :** ठाणेपाडा (ता. नंदुरबार) येथील के. डी. गावित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संकुलात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थी शिक्षक तुषार गावित अध्यक्षस्थानी होता. प्राचार्य बी. डी. पाटील, राजेंद्र सूर्यवंशी प्रमुख अतिथी होते. शिक्षकांची भूमिका निभावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी अध्यापनाबाबत अनुभवकथन केले. शिक्षक एन. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांना डॉ. राधाकृष्णन यांचे जीवनचरित्र सांगितले. प्राचार्य बी. डी. पाटील यांनी डॉ. राधाकृष्णन यांचे कार्य व व्यक्तिमत्त्वाविषयी माहिती दिली.

### वाघाडी सीबीएसई स्कूलमध्ये शिक्षकांचा गौरव

**शिरपूर :** वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूलमध्ये



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अश्विन अमृतकर प्रमुख पाहुणे होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर आधारित कविता, गीते व नृत्ये सादर केली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापिका मेघा मुंगसे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांचा आदर करण्याची आणि शिक्षणाचे महत्त्व ओळखण्याची प्रेरणा दिली.

# जि. प. गटाच्या आरक्षणाची उत्सुकता शिगेला!

## ग्रामीण भागात चर्चांना उधाण; समस्यांची जाण असलेल्या उमेदवाराकडे कल

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), ८ सप्टेंबर**

मेथी गट हा जिल्ह्यातील इतर जिल्हा परिषद गटांपेक्षा कायमस्वरूपी चर्चेत राहिला असून, विकासाबाबत मात्र कोसो दूर राहिला, असे मत ग्रामस्थांमध्ये झाले आहे. तालुक्यातील महत्त्वाचा गट म्हणून मेथीकडे पाहिले जाते. मूलभूत सुविधांपासून वंचित राहिलेला हा गट यंदाच्या निवडणुकीत काय चमत्कार करतो, याबाबत गावागावांत चर्चामंथन होत आहे. गट अनुसूचित जातीसाठी की इतर प्रवर्गासाठी सुटतो, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. इच्छुकांची भाऊगर्दी या गटात जास्त राहण्याची शक्यता आहे; पण विकासाच्या बाजूनेच मतदान होईल, असा सूरही निघत आहे.

मेथी जिल्हा परिषद गटात मेथी गण व खर्दे गण यांचा समावेश होतो. मेथी गणात मेथी, वरझडी, देगाव, सतारे, वाडी व रेवाडी तसेच खर्दे गणात खर्दे, अंजनविहिरे, मांडळ, कर्ले व परसोळे या गावांचा समावेश होतो. जिल्हा परिषद गटात गेल्या निवडणुकीत २५ हजारांवर मतदार होते. अनुसूचित जातींची लोकसंख्या गेल्या निवडणुकीत २,५३६, अनुसूचित जमातींची ६,६९२ होती. नवीन यादी मतदार प्रकाशित झाल्यावर नेमकी किती वाढ झाली, हे दिसून येईल.

मेथी गटात अनेक समस्या आहेत. त्या सोडवण्याचा प्रयत्न जिल्हा परिषद सदस्यांनी केला. मात्र, पाहिजे तसा विकास, समस्या सोडवण्यात त्यांना यश आले नाही. अशा विविध समस्यांतून जात असलेला मेथी गट यंदा नवीन चेहऱ्याकडे आश्वासक



नजरेने पाहताना दिसून येतो. जो या समस्या सोडवेल, विकास करेल, त्यालाच मतदान करण्याच्या मनस्थितीत मतदार राजा दिसून येतो.

**जि. प. गटातील प्रमुख समस्या**

मेथी गटात कोणतीच रोजगाराची संधी सध्यातरी दिसून येत नाही; परंतु आगामी काळात मेथी परिसरात होऊ घातलेला सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प, प्रस्तावित एमआयडीसी, देगाव येथील टेक्स्टाइल पार्क यातून रोजगार उपलब्ध होईल, अशी आशा आहे. गटात सर्वच गावांमध्ये जिल्हा परिषद शाळा आहेत; पण त्यांची असलेली दुरवस्था, शिक्षकांचा असलेला अभाव, सेवा-सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा परिषदेने केलेला कानाडोळा, वर्गखोल्यांचे अपूर्ण राहिलेले बांधकाम, त्यामुळे ही स्थिती बदलण्यासाठी शिक्षित उमेदवाराला निवडून देण्याचा मानस मतदारराजा बोलून दाखवतो. गटातील दोन-तीन गावे वगळल्यास पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना वणवण करावी लागते. शेतीसाठी सिंचन तर दूरचीच गोष्ट आहे. सिंचनासाठीच्या असलेल्या योजना मंत्री जयकुमार रावल राबवत असताना गटासाठी त्यांनी प्रयत्नही केलेले आहेत, त्यांच्याकडे पाठपुरावा करणारा प्रतिनिधी निवडून देण्याचा कल सध्या दिसून येत आहे.

शेतीसाठी सिंचनाची सोय झाल्यास मेथी परिसर सुजलाम सुफलाम होईल. वाडीशेवाडी धरण याच गटात येत असून, मंत्री रावल राबवत असलेले बंदिस्त जलवाहिनी योजना या गटासाठी प्रस्तावित करून कायमस्वरूपी दुष्काळी असलेला हा गट सिंचनाखाली येण्यासाठी मोलाचा ठरणार आहे. यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज शेतकरी बोलून दाखवतो. गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी जो प्रयत्न मंत्री रावल यांनी केला, त्यात त्यांना बऱ्यापैकी यशही मिळाले. नंतर त्या रस्त्यांची झालेली दुरवस्था ग्रामस्थांना मनस्ताप देऊन जाते.

मंत्री रावल यांनी आतापर्यंत दिलेले उमेदवार या ठिकाणी विजयी झाले. त्यांनी विकासाच्या ज्या योजना आणल्या, त्या प्रभावीपणे राबवण्यात जिल्हा परिषद सदस्य कमी पडले, तरीही मंत्री रावल यांच्यावर विश्वास ठेवणारा हा गट यंदाही विकासाच्या मागेच उभा राहील, हे मात्र निश्चित.

# कापूस आयात कर रद्द करू नका

## सत्यशोधक शेतकरी सभेतर्फे केंद्र सरकारच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ८ सप्टेंबर**

भारत सरकार व डोनाल्ड ट्रम्प सरकारने कापसावरील आयात कर रद्द करुन शेतकऱ्याच्या मालावर परदेशी निर्यातीवर ५० टक्के कर लादणे रद्द करा, जनसुरक्षा कायदा रद्द करा, शेतपिकांना हमीभाव द्या, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा यांसह स्थानिक ५३ मागण्यांचे निवेदन सत्यशोधक शेतकरी सभेतर्फे नवापूर येथील तहसीलदार दत्तात्रय जाधव यांना देत केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला.

संयुक्त किसान मोर्चाने देशभर मोदी व ट्रम्प यांच्या पुतळ्याची होळी करुन शासनाला निवेदन देण्याचे किंवा आंदोलने करण्याचे आवाहन केले होते, त्याचाच एक भाग म्हणून सत्यशोधक शेतकरी सभेतर्फे तालुकास्तरावर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली येऊन कापसावरील आयात कर रद्द केल्याने कापूस, उत्पादक शेतकरी अडचणीत येणार आहेत, तसेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतावर मोठा टॅरीफ लादण्याच्या धोरणामुळे आणि उलट भारतातील विदेशी शेतीमालावर टॅरीफ रद्द करण्याच्या दबावामुळे दूध, सोयाबीन, गहू, मका व इतर शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणार असल्याने, तीव्र निषेध व्यक्त करीत आहोत. केंद्र सरकारने कापसावरील आयात कर रद्द करू नये, अमेरिकेने भारतावर लादलेला टॅरीफ कर रद्द करा, जनसुरक्षा कायदा रद्द करा, शेतपिकांना हमीभाव द्या, शेतकऱ्याचे सरसकट कर्ज माफ करा, आदिवासी वनहक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी करून कसत असलेल्या जमिनीचा ७/१२ उतारा द्या, सत्यशोधक शेतकरी सभेच्या नंदुरबार ते मुंबई पायी बिढार महामोर्चाला मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाची अंमलबजावणी करा, वनकायदा २०२३ रद्द करा, नवापूरसह नंदुरबार जिल्ह्यात शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध करा, आदिवासी बांधवांच्या विविध विभागातील रिक्त पदे ताबडतोब भरा व बोगस नावे हटवा यांसह स्थानिक ५३ मागण्यांबाबत निवेदन देत केंद्र सरकारचा निषेध केला.

या वेळी सत्यशोधक शेतकरी सभेचे कॉम्रेड करणशिंग कोकणी, कॉम्रेड आर. टी. गावित, राजेश गावित, रामदास गावित, गेवाबाई गावित, देविदास गावित, भामटीबाई गावित, रंगूबाई मावची, निबूबाई मावची, गोबजी गावित, ढेड्या गावित, विष्णू नाईक, वन्त्या गावित, सखाराम गावित, रमेश गावित, जेका गावित, जोकूबाई गावित, प्रभाकर कोकणी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिरपूरकरांच्या सेवेसाठी भाजप मजबूत करून सेवाभावी काम करूया

## चिंतनभाई पटेल : नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान

**शिरपूर :** अमरिशभाईंच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुक्याच्या सेवेसाठी भाजप मजबूत करुन सेवाभावी काम करूया, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनी केले.

माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार काशिराम पावरा, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल व मान्यवरांच्या हस्ते भाजप शिरपूर शहर व ग्रामीण, सांगवी मंडळ व थाळनेर मंडळ तसेच धुळे जिल्हा कार्यकारिणीमधील शिरपूर तालुक्यातील पदाधिकारी, सदस्यांना करवंद रोडजवळील आर. सी. पटेल फार्मसीतील एस. एम. पटेल ऑडिटोरिअम हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर आमदार काशिराम पावरा, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, शहराध्यक्ष तथा उद्योगपती चिंतनभाई पटेल, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, जिल्हा सरचिटणीस भाऊसाहेब देसले, बाजार समितीचे सभापती के. डी. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, संग्रामसिंग राजपूत, पिंटू शिरसाठ, प्रभाताई कोकणी, भैरवी शिरसाठ, कैलासचंद्र अग्रवाल, शिरपूर ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बागल, थाळनेर मंडळ अध्यक्ष वीरपाल राजपूत, जयवंत पाडवी, नरेंद्रसिंह सिसोदिया, सुरेंद्र राजपूत, वासुदेव देवरे, मिलिंद पाटील, किशोर माळी, इरफान मिर्झा, देवेंद्र राजपूत आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार पावरा म्हणाले की, भाजपमध्ये काम करणाऱ्यांची नेहमीच दखल घेतो. अपल्याला मिळालेल्या पदाचे महत्त्व मोठे आहे. पक्ष मजबूत करा, भाई व आम्ही सर्व नेतेमंडळी सर्वांसाठी नेहमीच कार्यरत आहोत. सर्वांना सुखसोयी देण्यासाठी तत्पर आहोत. सेवाभावी कामे करत आहोत, सर्वांनी पदाला न्याय मिळेल या भावनेने काम करावे.

जिल्हाध्यक्ष खलाणे, माजी जिल्हाध्यक्ष चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण शर्मा यांनी सूत्रसंचालन केले. तालुकाध्यक्ष भरत पाटील यांनी आभार मानले.

### के. डी. गावित विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**नंदुरबार :** वावद येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन दहावीची विद्यार्थिनी हर्षदा पाटील हिच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापक मनोहर साळुंके उपस्थित होते.

दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावली. विद्यार्थ्यांनी दिवसभर वर्गावर अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी त्यांना अध्यापनात आलेले अनुभवकथन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत त्यांचा सत्कार केला. स्वामिनी पाटील व भावना गवळी यांनी सूत्रसंचालन केले. सलोनी जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गोपाल शिंत्रे, नितीन पाटील, सागर पाटील, सुनील पाटील, महेंद्र पाटील, मीनाक्षी व्यास, प्रीती नाईक, अश्विनी पाटील, संजय पाटील, दीपक माळी यांनी परिश्रम घेतले.

# ध्येय ठेवून मेहनत करा, यश नक्कीच मिळेल : प्रा. दिनेश पावरा

## शहादा येथील महाविद्यालयात कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ८ सप्टेंबर**

ध्येय ठेवून मेहनत करा, यश नक्कीच मिळेल. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्राशी नाते असेल तर यशप्राप्ती लवकर होते, असे विद्याश्रम स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक प्रा. दिनेश पावरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन क्रीडासाहित्याचे पूजन व क्रीडा मंडळाचे उद्घाटन करून साजरा करण्यात आला. यानिमित्त पोलिस, सैनिक, आर्मी भरती व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांनी माल्यार्पण केले. याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. डी. सिंदखेडकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. कल्पना पटेल, क्रीडा मंडळाचे अध्यक्ष डॉ. महेश जगताप, सचिव तथा क्रीडा संचालक डॉ. अरविंद कांबळे, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. अनिल बेलदार, डॉ. प्रशांत जगताप, डॉ. खुमानसिंग वळवी, क्रीडाशिक्षक प्रा. जितेंद्र माळी, प्रा. के. एच. नागेश, डॉ. वाजीह अशहर आदी उपस्थित होते.

डॉ. अरविंद कांबळे यांनी प्रास्ताविकात मेजर ध्यानचंद सिंग यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. स्पर्धेच्या युगात यशस्वी वाटचाल करण्यासाठी प्रत्येकाने क्रीडा क्षेत्राशी गाठ जोडून पोलिस, सैनिक, आर्मी भरती आणि स्पर्धा परीक्षांचे ध्येय समोर ठेवून परिश्रम घेणे आवश्यक असल्याचे प्रमुख वक्ते प्रा. दिनेश पावरा यांनी सांगितले. मोबाइलचा वापर चांगल्या कामासाठी व गरजेपुरताच करावा व स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांनी केले.

कार्यशाळेत ३५० विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. डॉ. अरविंद कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महेश जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीशभाई पाटील, मानद सचिव कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संचालक मयूरभाई पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. गोपाल गवई, कार्यालयीन अधीक्षक सुनील भांडारकर, गोपाळ सोनार, डॉ. जगदीश चव्हाण, डॉ. सुधाकर उजगरे, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. रवींद्र माळी, डॉ. राहुल पाटील, डॉ. वाजीह अशहर, डॉ. तुषार पाटील, प्रा. मोहसीन पठाण, संजय विसावे, दिलवर ठाकरे, दिनेश बागले यांनी सहकार्य केले.



### पटेल महिला महाविद्यालयात शिक्षक दिन

**शिरपूर :** येथील एच. आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. प्राचार्या डॉ. शारदा शितोळे अध्यक्षस्थानी होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विद्या पाटील, प्राचार्यांच्या भूमिकेत विद्यार्थिनी दीव्या मोरे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी शिक्षकांच्या भूमिका साकारल्या, त्या विद्यार्थिनींचा प्राचार्या व उपप्राचार्यांनी गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. प्राचार्या डॉ. शारदा शितोळे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

शिक्षकांच्या भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थिनी दीव्या मोरे, प्रतीक्षा पानपाटील, कोमल देशमुख, रोशनी कोळी, मिनाक्षी जाधव, सलोनी कोळी, निलिमा माळी, शेवंता पावरा, वैशाली मराठे, मयुरी भावसार, शर्मिला पावरा, प्रितिका चौधरी, हर्षदा पाटील, माधुरी सोनवणे, सोनाली पाडवी, मोहिनी माळी, अश्विनी पावरा व कविता सोनवणे यांनी उत्कृष्ट कामकाज पाहिले. डॉ. विद्या पाटील यांनी प्रयत्न केले. वर्ग प्रतिनिधी कल्याणी रघुवंशी, शर्मिला पावरा, सोनाली पाडवी, नेहा माळी यांनी नियोजन केले. प्रतीक्षा पानपाटील व योगेश्वरी कोळी यांनी सूत्रसंचालन केले.



### पटेल शाळेतील विद्यार्थ्यांनी सांभाळले शिक्षकांचे कामकाज

**शिरपूर :** येथील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची भूमिका सुमित बागूल, चिन्मय वाणी या विद्यार्थ्यांनी साकारली. शिक्षकाची भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती आणि त्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. बबिता काटोले अध्यक्षस्थानी होत्या. कार्यक्रमात गार्गी सोनवणे, मुद्दा सैंदाणे, अमित माळी, मुख्याध्यापिका म्हणून रितिका बडे यांनी सांभाळलेल्या शालेय कामकाजाविषयीचे अनुभव व्यक्त केले. ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मण साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. ७० विद्यार्थ्यांनी बालवाडी ते चौथीपर्यंतच्या २० वर्गांना अध्यापनाचे कामकाज सांभाळले. विद्यार्थी शिक्षकांना शाळेतर्फे भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. अशोक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. गणेश चौधरी यांनी आभार मानले.

### नटावदकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांभाळले प्रशासन

**नंदुरबार :** शहरातील ज. ग. नटावदकर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाचे समन्वयक एस. के. चौधरी अध्यक्षस्थानी होते. दिवसभर महाविद्यालयाचे प्रशासन विद्यार्थी शिक्षकांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात (कै.) माजी राष्ट्रपती व भारतरत्न सर्वपल्ली राधाकृष्णन व माँ सरस्वतीच्या प्रतिमेस विद्यार्थिनी प्राचार्या पायल पाटील व एस. के. चौधरी यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह विद्यार्थी शिक्षकांचा सत्कार केला. विद्यार्थिनी प्राचार्या पायल पाटील, उपप्राचार्या वैष्णवी देवकते व पर्यवेक्षिका ऋग्वेदा जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशासन सांभाळताना आलेले अनुभव व शिक्षकाची भूमिका निभावताना किती समस्यांना सामोरे जावे लागते, हे त्यांनी अनुभव कथन केले. गौरी बैरागी व आश्विन पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. एस. के. चौधरी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी जेव्हा उच्च पदावर जातो, तेव्हा शिक्षकांचीही मान उंचावते व जेव्हा वाईट काम करतो, तेव्हा शिक्षकांची मान खाली जाते. त्यामुळे आयुष्यात कसे जगायचे, हे विद्यार्थ्यांना ठरवावे लागेल, असे एस. के. चौधरी यांनी सांगितले. सुहासिनी नटावदकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी जान्हवी सूर्यवंशी व जान्हवी गावित यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थिनी उपप्राचार्या वैष्णवी देवकते हिने आभार मानले. प्रा. मीनल वसावे व प्रा. सुवर्णा गिरासे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



### लायन्स क्लबतर्फे ७५ शिक्षक बंधू-भगिनींचा सत्कार

**नंदुरबार :** लायन्स क्लब ऑफ नंदुरबारतर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधून नंदुरबार शहरासह जिल्ह्यातील ७५ शिक्षक बंधू-भगिनींचा सन्मानपत्र, पुस्तक आणि पेन देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्यासाठी आरोग्य निदान शिबिरही घेण्यात आले. शिबिरात मधुमेह, उच्च रक्तदाब आणि ईसीजी काढून रोगनिदान करण्यात आले. कार्यक्रमाला झोन चेअरमन सतीश चौधरी, युवराज पाटील, कोषाध्यक्ष चेतन बच्छाव, निम्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश गोसावी, श्रीराम दाऊतखाने आणि क्लबमधील सदस्य उपस्थित होते. उद्धव तांबोळी, दीपा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. शिरीष शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सचिव दिनेश वाडेकर यांनी आभार मानले.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : ०९/०९/२०२५ **वार** : मंगळवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **ऋतू** : शरद **मास** : भाद्रपद **पक्ष** : कृष्ण **महिना** : सप्टेंबर
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१३-०२ **तिथी** : द्वितिया **नक्षत्र** : उत्तराभाद्रपदा
**योग** : गंड **करण** : तैतिल **सूर्योदय** : ६-२६ **सूर्यास्त** : १८-४५
**चंद्रराशी प्रवेश** : मिन **शुभाशुभ** : द्वितियातिथी श्राद्ध

**दैनिक राशीभविष्य**
**मेष** : अधिक खर्च करावा लागेल.
**वृषभ** : आवक अधिक होणार.
**मिथून** : सामान्य असा दिवस असेल.
**कर्क** : नवीन कार्य सुरु कराल.
**सिंह** : कामात चुका अधिक होतील.
**कन्या** : संसारीक वातावरण आनंदमय असेल.
**तुला** : शारीरिक व्यथा उत्पन्न होतील.
**वृश्चिक** : सर्व कार्यात यशस्वी व्हाल.
**धनू** : कर्तव्याची परतफेड करण्याचा दिवस.
**मकर** : आज वेळ कमी कामे जास्त असतील.
**कुंभ** : आर्थिक बचत कराल.
**मीन** : मनाप्रमाणे वागण्याचा दिवस.
**विशेष** : माता पिता यांचे नामस्मरण करावे.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु. पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

# बालकाच्या खूनप्रकरणी मूकमोर्चा

## न्याय मिळावा यासाठी सर्वधर्मीयांनी दिले तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ८ सप्टेंबर**

यावल शहरात निर्घृण खून झालेल्या सहा वर्षीय बाळाला न्याय मिळावा यासाठी सोमवारी शहरात सर्वधर्मीय मूकमोर्चा काढण्यात आला

दोन दिवसांपूर्वी यावल शहराला व संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या मनाला सुन्न करणारी घटना घडली. या घटनेत शहरातील बाबुजीपुरा येथे राहणाऱ्या एका सहा वर्षीय हनान खान नावाच्या बालकाचा एका माथेफिरु तरुणाने निर्घृण खून करून त्यास जाळल्याची अमानवीय संतापजनक घटना घडली. या बाळाचा खून करणारा शेख शाहीद शेख बिस्मील्ला या संशयित आरोपीस जलदगती न्यायालयात हा खटला चालवून कडक शासन व्हावे या मागणीसाठी आज मयत बालकाच्या घरापासून तहसीलपर्यंत सर्वधर्मीय नागरिकांच्यावतीने मूकमोर्चा काढून तहसीलदार मोहनमाला नाझिरकर यांना



निवेदन देण्यात आले. यावेळी यावलचे माजी नगराध्यक्ष अतुल पाटील, यावल पंचायत समितीचे माजी गटनेते शेखर पाटील, माजी उपनगराध्यक्ष अस्लम शेख नबी, माजी उपनगराध्यक्ष हाजी ईकबाल खान, काँग्रेस कमेटीचे यावल शहराध्यक्ष मोहम्मद हकीम शेख, अनिल जंजाळे, सामाजिक कार्यकर्ते पराग सराफ, नरेंद्र शिंदे, गोलू माळी, शिवसेना उबाठाचे हुसैन तडवी, यावलचे माजी नगरसेवक मनोहर सोनवणे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.



## शिक्षक दिनी सांगितले ‘ग्रंथांचे महत्त्व’

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), ८ सप्टेंबर**

येथील धनाजी नाना महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात शिक्षकदिन साजरा करण्यात आला. यावेळी ‘ग्रंथांचे महत्त्व’ या विषयावर भाषण झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.राजेंद्र वाघूळदे होते. त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यापीठ स्तरावर वक्तृत्वस्पर्धेत नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्व खर्च महाविद्यालय करेल असे जाहीर केले.

विद्यार्थ्यांनी शिस्तपालन करणं अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

विद्यार्थिनींनी शिक्षकदिनाचे महत्त्व सांगून मनोगते व्यक्त केली. यावेळी ग्रंथपाल गायकवाड यांचे ‘ग्रंथांचे महत्त्व’ यावर भाषण झाले. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.राजेंद्र राजपूत यांचे अतिशय अभ्यासपूर्ण भाषण झाले. विभागप्रमुख प्रा.डॉ. राजेंद्र ठाकरे यांचे प्रबोधनपर भाषण झाले.

प्रास्ताविक प्रा.नयना पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.रमेश वाघ यांनी केले. आभार श्वेता भालेराव हिने मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### बालकाच्या मारेकऱ्याला मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी

**सावदा (ता. रावेर)** : यावल येथील बालकाच्या मारेकऱ्याला मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी या मागणीचे निवेदन सोमवारी सावदा पोलीस ठाण्यात देण्यात आले. सहा वर्षाच्या हन्नानखान या मुलाची अतिशय क्रूरपणे अपहरण करून हत्या करण्यात आली. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण समाज हादरवून गेला. तरी या घृणास्पद गंभीर स्वरुपाचा गुन्हा जाणीवपूर्वक करणाऱ्या बिस्मिल्ला खलिफा दस्तगीर खलिफा याला मृत्युदंडाची शिक्षा व्हावी. यासाठी सपोनि विशाल पाटील यांना समक्ष भेटून या माध्यमातून शासन दरबारी निवदानाद्वारे महिला अन्याय अत्याचार विरोधी समितीचे पदाधिकारी फरीद शेख, युसूफ शाह, नवीन सुन्नी मुस्लिम कब्रस्तान कमिटीचे अध्यक्ष कलिम जनाब, शहीद अब्दुल हमीद स्मारक संस्थाचे अध्यक्ष शेख मुख्तार, शेख मोईन (लाला), बाबू रिक्षावाले, शेख इरफान (केजरीवाल) इत्यादींनी मागणी केली आहे. या गंभीर प्रकरणाबाबत आपल्या मागणीचे निवेदन तत्काळ शासनाकडे पाठविण्यात येईल, असे ठोस आश्वासन सपोनि निरीक्षक विशाल पाटील यांनी यावेळी निवेदनकर्त्यांना यावेळी दिले.



### भाजप जिल्हा चिटणीसपदी अजनाडचे विजय महाजन

**फैजपूर (ता. यावल)** : तापी नदीचे महाराष्ट्र प्रवेशद्वार असलेल्या अजनाड (ता. रावेर) येथील सामाजिक तथा भाजप कार्यकर्ते विजय महाजन यांची भाजपच्या जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षातील कार्य लक्षात घेता भाजपचे पूर्व जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांनी ही नियुक्ती केली आहे. याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी खडसे यांनी विजय महाजन यांचा सत्कार केला.

### नवी मुंबईत मिळणार राकेश महाजनांना पुरस्कार

**यावल** : तालुक्यातील मनवेल येथील प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आश्रमशाळेचे शिक्षक राकेश चिंधू महाजन यांना शिक्षकदिनी राज्यस्तरीय परमपूज्य सानेगुरूजी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला. नवी मुंबई येथे



कलासाधना सामाजिक संस्थेतर्फे हा पुरस्कार मिळणार आहे. राज्यभरातून ८३० जणांचे प्रस्ताव संस्थेकडे प्राप्त झाले होते. त्यापैकी ३० शिक्षकांना राज्यस्तरीय परमपूज्य सानेगुरूजी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. शिक्षक राकेश महाजन यांनी २२ वर्षांच्या सेवेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. मनवेल आश्रमशाळा संस्थेचे अध्यक्ष हुकूमचंद पाटील, उपाध्यक्ष बी.एल. देशमुख, सचिव मीरा पाटील, सहसचिव यादवराव पाटील, खजिनदार ॲड. ललित पाटील, सभासद देवीदास पाटील, सभासद मंगलराव पाटील, प्राथमिक मुख्याध्यापक संजय अलोणे, माध्यमिक मुख्याध्यापक सचिन पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतरांनी शिक्षक राकेश महाजन यांचे अभिनंदन केले.

### भजनी मंडळ अनुदान अटी शिथिल करा

**सिंगनूर (ता. रावेर)** : न्यू एकता भजनी मंडळ सिंगनूर अध्यक्ष हेमंत चांदवे व सहकारी यांनी राज्य शासनाकडून भजनी मंडळास २५ हजारांचे अनुदान देण्याची घोषणा करून कार्यवाही सुरु झाली आहे. मात्र या अनुदानासाठी शासनाने भजनी मंडळास अनेक नियम व अटींना सामोरे जावे लागत आहे. शासनाने यातील काही अटी शिथिल कराव्यात, अशी मागणी केली आहे. भजन संस्कृतीला नव संजीवनी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मात्र राज्यातील बहुतांश भजनी मंडळे नोंदणीकृत नाही. ग्रामीण भागातील भजनी मंडळांकडून अनेक सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रम होत असतात. मात्र प्रसिद्धीपासून दूर असतात. भजनी मंडळांची कागदपत्राची जुळवाजुळव करण्यासाठी दमछाक होत आहे. त्यामुळे शासनाकडे काही नियम अटी शिथिल करण्याची मागणी केली आहे.

### पंचशील नगरात जुगारावर धाड

**भुसावळ** : शहरातील पंचशील नगर, मच्छी मार्केटजवळ आडोशाला एक इसम कल्याण सट्टा जुगार नावाचा खेळ खेळत असताना मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी जुगार अड्ड्यावर छापा टाकून १३ हजार ७५० रुपये रोख व सट्टा जुगाराचे साहित्य जप्त केले. शेख नासिर दस्तगीर शेख असे संशयितांचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून रवी नरवाडे, गोपाल गव्हाळे-पाटील, विकास सातदिवे, प्रशांत परदेशी, राहुल वानखेडे यांनी ही कारवाई केली.



### ‘आपले परिवार’ वाचनालयातर्फे शोकसभा

**भुसावळ** : येथील वांजोळा रोडवरील आपले परिवार सार्वजनिक वाचनालयातर्फे ७ सप्टेंबर रोजी वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली. त्यात माजी खासदार तथा गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांच्या मातोश्री गोदावरी पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वप्रथम प्रतिमेस प्रमोद सरोदे, केवल महाजन (खडका), सेवारत्न रामचंद्र ढाके, अशोक चौधरी, लेवा सखी मंडळाच्या अध्यक्षा मंगला पाटील यांनी माल्यार्पण केले. म्हाडा कॉलनीतील आनंद सपकाळे, मंगला पाटील, प्रा.मनोज महाजन, प्रमोद सरोदे, वाचनालयाचे संस्थापक शांताराम पाटील यांनी गोदावरी आई - आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त, मुख्याध्यापिका, कुटुंब प्रमुख म्हणून मुलांवर केलेले संस्कार, त्या काळात अल्पबचत, कुटुंब नियोजन, किसान वर्ग, प्रौढ साक्षरता यात त्यांनी केलेले कार्य विशद करून त्यांची कर्म, आचार व व्यवहार निष्ठा अनंत काळ समाजाला स्फूर्ती अन् प्रेरणा देत राहील, अशा भावना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन कवयित्री संध्या भोळे यांनी केले. सभा यशस्वीतेसाठी अशोक चौधरी, मनिषा पाटील, सुषमा नेमाडे, मयुरी चौधरी, मधुकर रोटे, विद्याधर चौधरी, सुरेश कोल्हे, पराग भोळे यांनी परिश्रम घेतले.

# लोकमान्य टिळक टर्मिनस-गोमतीनगर दरम्यान विशेष उत्सव ट्रेन धावणार

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ८ सप्टेंबर**

प्रवाशांची वाढती मागणी आणि दिवाळी व छठपूजा सणांच्या कालावधीत होणारी प्रवासी गर्दी लक्षात घेऊन, रेल्वेने लोकमान्य टिळक टर्मिनस - गोमतीनगर दरम्यान विशेष साप्ताहिक उत्सव गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे.



यात गाडी क्र. ०५३२६ लोकमान्य टिळक टर्मिनस - गोमतीनगर साप्ताहिक विशेष गाडी दि.२८ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान दर रविवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ७.५५ वाजता सुटेल आणि सोमवारी सकाळी १०.४५ वाजता गोमतीनगर अशा ६ फेऱ्या होतील. तर ०५३२५ साप्ताहिक विशेष गोमतीनगर येथून दर शनिवारी गाडी रात्री क्र १२.१५ मिनिटांनी सुटेल. आणि लोकमान्य टिळक येथे रविवारी दि. २७ सप्टेंबर ते १ नोव्हेंबर या दरम्यान रविवार सकाळी ५.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे अशा ६ फेऱ्यांद्वारे पोहचेल. या गाडीला कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी जंक्शन, ओरई, कानपूर, ऐशबाग, लखनऊ सिटी आणि बादशाहनगर असे थांबे आहेत. या गाडीची बोगी रचना : १ द्वितीय श्रेणी, ३ तृतीय श्रेणी वातानुकूलित, ८ शयनयान आणि ६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅन अशी आहे. या गाडीसाठी आरक्षण ७ सप्टेंबरपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच वेबसाइटवर सुरु झाले आहे. या विशेष गाडीच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्यावी आणि प्रवाशांनी विशेष गाड्यांच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वेने केले आहे.

# आदर्श इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची तालुका खो-खो स्पर्धेत कामगिरी

**मुक्ताईनगर** : तालुकास्तरीय १७ वर्षाखालील मुला-मुलींच्या खो-खो स्पर्धा मुक्ताईनगर येथील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुला-मुलींनी उपविजेतेपद पटकावून शाळेचा मान वाढविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन तालुका क्रीडा अधिकारी नितीन जंगम यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या पूजनाने व श्रीफळ फोडून करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांमध्ये तालुका क्रीडा समन्वयक संजीव वाढे, तालुका क्रीडा कार्यालय समन्वय ज्ञानेश्वर येवले, आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक नितीन पवार, मुख्याध्यापिका सरला



पाटील, पर्यवेक्षक लीना रडे यांच्यासह तालुक्यातील मान्यवर शिक्षक उपस्थित होते.

स्पर्धेत तालुक्यातील आठ शाळांचे संघ सहभागी झाले. मुलांच्या गटात जे. ई. स्कूल मुक्ताईनगर यांनी विजेतेपद पटकावले, तर एम. एन. नारखेडे विद्यालय रुईखेडा यांनी उपविजेतेपद मिळविले. मुलींच्या गटात एम. एन. नारखेडे विद्यालय रुईखेडा विजेता ठरले, तर आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल मुक्ताईनगर उपविजेता ठरले.

खेळाडूंच्या उत्साह वर्धनासाठी व त्यांच्या कामगिरीबद्दल तालुका क्रीडा अधिकारी नितीन जंगम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन भरत काळे यांनी केले.



## खडसे महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**मुक्ताईनगर** : मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित जी. जी. खडसे महाविद्यालयात युवतीसभा अंतर्गत कार्यक्रम पार पडला.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. वंदना चौधरी उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. संगीता देशमुख होत्या. त्यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांचा स्पर्धा परीक्षेतील प्रेरणादायक प्रवास दृकश्राव्य माध्यमातून दाखविण्यात आला.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महाजन व उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे यांनी केले. प्रास्ताविक मानसशास्त्राच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. छाया ठिंगळे यांनी केले.

सूत्रसंचालन युवती सभेचे समन्वयक डॉ. सुरेखा चाटे यांनी केले. प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र चौधरी व प्रा. डॉ. संतोष थोरात यांची विशेष उपस्थिती होती.

# सतपंथ नवयुवक गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीने वेधले लक्ष

**फैजपूर (ता. यावल)** : शहरातील गणेश मंडळांच्या मिरवणुकीला दुपारी दोनला सुरूवात झाली. समारोप रात्री १२ वाजता झाला. यानंतर मूर्ती विसर्जनासाठी भुसावळ तापी नदीवर नेण्यात आल्या. शहरातील भाविकांनी लाडक्या बाप्पाला वाजतगाजत निरोप दिला. १० तास चाललेल्या मिरवणुकीत एकूण १७ सार्वजनिक मंडळांनी सहभाग घेतला. रात्री १२ वाजता सर्व मिरवणुकांचा समारोप झाला. सतपंथ नवयुवक गणेश मंडळाच्या धार्मिक पारंपरिक पद्धतीच्या विलोभनीय विसर्जन मिरवणुकीने शहरवासीयांचे विशेष लक्ष वेधत उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फेडले



मिरवणुकीत पहिला क्रमांक सतपंथ नवयुवक गणेश मंडळाचा होता. या मंडळाने पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढली. स्वतः महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांनी उपस्थिती होती. सोबतच खंडोबा देवस्थानचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर पवनकुमारदास महाराज यांचीही उपस्थिती होती. दरम्यान, उत्सव व मिरवणुकीत मोठ्या मूर्ती, डीजेचा वापर आवाज टाळावा अनाठायी खर्च सत्कारणी वापरावा असे वारंवार आवाहन पोलीस प्रशासन सह महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज, रामराज्य सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून करण्यात आले.

रामराज्यने गेल्यावर्षी याबाबत चांगली जनजागृती करून पुरस्कार सोहळा ही केला. मिरवणुकीत माजी लोकप्रतिनिधी, समाजसेवक, शांतता समिती सदस्य, गणेश मंडळ तसेच विविध राजकीय पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याप्रसंगी दर्दमंद फाउंडेशनचे संस्थाध्यक्ष शेख इलियास यांनी मंडळांचा सन्मान केला.

# सरदार पटेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर उमटविला ठसा

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ८ सप्टेंबर**

यावल तालुकास्तरीय ॲथलेटिक स्पर्धा फैजपूर येथे आयोजित करण्यात आली होती. यात सरदार वल्लभभाई पटेल इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करीत खेळाडू वृत्तीने अनेक बक्षिसे जिंकली.

या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील ८० मीटर हर्डल्स - यात सुलतान तडवी या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकाविला. १७ वर्षाखालील खेळात ट्रिपल जंपमध्ये - ईशान तडवी याने प्रथम क्रमांक मिळवून बक्षीस पटकवले. १७ वर्षाखालील वयोगटात ४०० मीटर हर्डल्स खेळामध्ये - अबू बकर या विद्यार्थ्याने दुसरा क्रमांक पटकावून स्थान मिळविले. आणि सतरा वर्ष वयोगटातील ४ बाय ४०० मीटर रिले. टीम मध्ये - सरदार



वल्लभभाई पटेल स्कूलने दुसरा क्रमांक पटकावत बक्षीस प्राप्त केले. तर १७ वर्षे वयोगटात - रेहान विनोद तडवी या विद्यार्थ्याने उंच उडीमध्ये तृतीय स्थान मिळविले व १९ वर्षे वयोगटात ४०० मीटर हर्डल्स मध्ये - रियाज कमाल तडवी या विद्यार्थ्याने व्दितीय क्रमांक मिळविला आणि १९ वर्ष वयोगटांमध्ये ट्रिपल जंप - या खेळ प्रकारात रियाज तडवी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा शिक्षक सय्यद इरतेकाज यांनी परिश्रम घेतले.

या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप माहेश्वरी व मुख्याध्यापिका शिला तायडे यांनी कौतुक केले व क्रीडा शिक्षक सय्यद इरतेकाज व सर्व शिक्षक व शिक्षकेतरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## यावल महाविद्यालयात बहिणाबाई चौधरींवर व्याख्यान

**यावल** : जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित यावल येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत प्रा. सोनाली पाटील यांच्या व्याख्यानाने पाचवे पुष्प गुंफण्यात आले.

‘मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री : बहिणाबाई चौधरी’ या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या व्याख्यानास उपप्राचार्य डॉ. एच.जी.भंगाळे यांच्यासह प्रा.डॉ. आर.डी. पवार विचारपीठावर उपस्थित होते. प्रा. सोनाली पाटील यांनी आपल्या व्याख्यानात बहिणाबाई चौधरींना अक्षर ओळख नसूनही त्या जे दिसेल त्याचे निरीक्षण करून कविता रचायच्या. त्यांनी खान्देशी भाषेत आष्टाक्षरी छंदातून कविता रचल्या. त्यांच्या कवितांना आचार्य अत्रे यांनी बावनकशी सोन्याची उपमा दिली, असे सांगितले. उपप्राचार्य प्रा.एम. डी.खैरनार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बहिणाबाई निरक्षर असूनही त्यांच्याकडे शब्दसंग्रह खूप मोठा होता आणि त्याच्या आधारावरच त्यांनी कविता रचल्यात, असे सांगितले.

सूत्रसंचालन प्रा.डॉ.वैशाली कोष्टी यांनी केले तर आभार प्रा.नरेंद्र पाटील यांनी मानले.

# भालोद महाविद्यालयात शिक्षक दिनी कृतज्ञता सोहळा

**भालोद (ता. यावल)** : पुस्तकी ज्ञानाबरोबर सामाजिक भान आणि सांस्कृतिक जाण शिक्षकांच्या मार्गदर्शनातून आणि सहवासातून मिळत असते, असे प्रतिपादन उपप्राचार्य प्रा. मुकेश चौधरी यांनी केले. भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या कृतज्ञता कार्यक्रमात ते बोलत होते.

माझ्या जीवनात आज मी जे काही साध्य केलेले आहे ते माझ्या गुरुजनांचेच देणं आहे, माझे जे काही व्यक्तिमत्व आहे ते माझ्या शिक्षकांच्या सहवासातच घडलेले आहे, अशी कृतार्थ भावना त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ. किशोर कोल्हे होते. सुरवातीला महान तत्ववेत्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. त्यानंतर विद्यार्थी विद्यार्थिनींनी महाविद्यालयातील



शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन अध्यापकांकरिता आवश्यक असणारी सेट ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल संगणकशास्त्र विभागातील शिक्षिका श्रीमती प्रा.शैलजा प्रकाश इंगळे यांचा गुणगौरव महाविद्यालय परिवाराने केला. कामिनी भालेराव, तेजेश कोळी, मोहिनी सनन्से या विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरुपात मनोगतामधून आपल्या शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

प्रास्ताविक पीयूष भावे या विद्यार्थ्याने केले तर, सूत्रसंचालन निवेदिका कोळंबे हिने केले. कामिनी मनोहर भालेराव हिने आभार मानले.

कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन प्रा. के. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दीपांशू इंगळे, पीयूष भावे, साक्षी चौधरी, मोहिनी सनान्से, कामिनी भालेराव, तेजेश कोळी यांनी केले होते.



## सेट परीक्षेतील यशस्वी पाच विद्यार्थ्यांचा फैजपुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), ८ सप्टेंबर**

येथील धनाजी नाना महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील पाच विद्यार्थ्यांचा सेट परीक्षेतील यशाबद्दल भव्य सत्कार समारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे म्हणाले की, अभ्यासातील सातत्य व कठोर मेहनतीने यश संपादन करता येते. रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डी. बी. तायडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

सेट परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नीलेश पाटील, हंसली महाजन, रोहिणी धनगर, मनीष महाजन आणि गायत्री पाटील यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या कठोर परिश्रम आणि समर्पणाने महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. पल्लवी भंगाळे यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांपैकी रोहिणी धनगर, मनीष महाजन आणि गायत्री पाटील यांनी मनोगते व्यक्त करत यशाचे श्रेय प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या सहाय्यक वातावरणाला दिले.

याप्रसंगी प्रा. डॉ. राकेश तळेले, प्रा. शेरसिंग पाडवी, डॉ.हरीष तळेले, डॉ. मच्छिंद्र पाटील, प्रा. विकास वाघुळदे, प्रा. अचल भोगे, प्रा. नाहिदा कुरेशी, प्रा. पूजा महाजन, प्रा. चैताली पाटील आणि प्रा. सुजित भाट उपस्थित होते.

प्रा. डी. बी. तायडे यांनी विभागाच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले.